
पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६ अंक ७ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ डिसेंबर २०२३



# विजय भाजपचा, की कट्टर हिंदुत्वाचा?

एकाधिकारशाहीकडे वाटचाल
**श्रीराम पवार**

विरोधी पक्षांसाठी पुढचा काळ खडतर आव्हानांचा...
**प्रमोद दिल्लीकर**

लोकसभेच्या रणसंग्रामाची पूर्वतयारी!
**सुरेश भटेवरा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार
**ॲड. वैशाली डोळस**

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६
अंक ७ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ डिसेंबर २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्


**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
प्लॉट नंबर २७३ सी, एसबीआय बँकेच्या पाठीमागे,
समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com


(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकुर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

द पीपल्स पोस्ट
8888541822

• जाहिरात विभाग संपर्क
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

• द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


**संपादकीय :** संपादकीय – उन्ह पडणारचं आहे, धुकं संपणारच आहे... – ३ / **कव्हर स्टोरी :** यश भाजपचे की कट्टर हिंदुत्वाचे? – **अनंत बागाईतकर** – ५ / वाटचाल एकाधिकारशाहीकडे – **श्रीराम पवार** – १० / विरोधी पक्षांसाठी पुढचा काळ खडतर आव्हानांचा... – **प्रमोद दिल्लीकर** – १४ / लोकसभेच्या रणसंग्रामाची पूर्वतयारी! – **सुरेश भटेवरा** – १७ / **निवडणूक विशेष :** विधानसभा निवडणूक – २०१८ मधील पक्षनिहाय प्राप्त जागा – **यशवंत भंडारे** – २० / **महापरिनिर्वाण दिन विशेष :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार – **ॲड. वैशाली डोळस** – २३ / इस्त्रोच्या चांद्रयानांची मुशाफिरी – **डॉ. संजय ढोले** – २६ / मनुस्मृती : धार्मिक व सामाजिक दहशतीचे मूळ – **बी.जी. वाघ** – ३१ / **ग्रंथ परिचय :** समतावादी तत्त्वज्ञानाचा जाहिरनामा : विनंतीपत्र – **प्रा. सुहास नाईक** – ३५ / **कोणता भारत :** म्हशी चारणाऱ्या बहिणीच्या एका पराभवात लपलेत अनेक विजय । पळून पळून थकतोय महाराष्ट्र बुवा–बाबांत रमतोय महाराष्ट्र – ३६ – **तात्या विंचू** / **कविता :** माणूस माणसात कधी येणार – भीमराव धुळूबुळू । जग घडवाया हवं... – आदिनाथ इंगोले । रिल्स बनवणाऱ्या बाया – प्रशांत वंजारे – ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# उन्ह पडणारच आहे, धुकं संपणारच आहे...





चार राज्यांच्या निवडणुकांमध्ये भाजपने तीन महत्त्वाची राज्ये आपल्या खिशात टाकली हे वास्तव आहे. या निकालाचा अर्थ लावण्यात कुणाच्या तरी अंगाखांद्यावर, मांडीवर खेळणारा गोदी मीडिया गुंतला आहे. येणाऱ्या लोकसभा निवडणुकांमध्ये निकाल कसा लागेल हेही त्यांनी जाहीर केले आहे. मोदी म्हणजे गॅरन्टी, हमी वगैरे घोषणा दिल्या जात आहेत. जो विजेता असतो तो असेच करणार यात शंका नाही. जे जे भाजपचे लाभार्थी आहेत, ती सर्व माध्यमे असेच पोवाडे रचत जाणार यात शंका नाही. भाजपने उत्तर भारतात आपली सत्ता आणली. ती आणण्यासाठी तेथील लोकांच्या मनात वसलेला प्रभू राम निवडणूक आखाड्यात उमटवला. भगवे परिधारण तयार करणाऱ्या बुवा-बाबांची फळी तयार केली. कुठे गाईचे राज्य तर कुठे त्रिशूल भूमी तयार केली. गेली अनेक वर्षे केल्या गेलेल्या पेरणीला आता अंकूर फुटत आहेत. त्यातून हिंदू राष्ट्राच्या घोषणा प्रबळ होत आहेत. आर्याची संकल्पना जगभर पसरवली जात आहे. जगातील प्रत्येक जण वंशाने आर्य म्हणजे आजचा ब्राह्मण आहे, असे उघडपणे सांगितले जात आहे. देव, धर्म, राष्ट्र, फसव्या घोषणा यांची बेमालूम केलेली सरमिसळ म्हणजे हा विजय आहे, असे कोणीही शहाणा माणूस म्हणेल. हीच मिसळ घेऊन ते चोवीसच्या लोकसभा निवडणुकीत उतरत आहेत.

त्याची तयारी कधीपासूनच सुरू झाली आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट झाली आणि ती म्हणजे उत्तर भारत विरुद्ध दक्षिण भारत ही अस्पष्ट रेषा आता स्पष्ट झाली. तीही आता मिटवायला लागली आहे. राजकारणात हे गोड वाटत असले तरी समाज आणि राष्ट्र जीवनात ती कडवट ठरणार आहे. उत्तर भारत श्रीरामाचा तर दक्षिण भारत द्रविडांचा मानला जातो. उत्तर भारत सनातनी धर्माच्या मागे जाणारा तर दक्षिण भारत त्याच्या उलट चालणारा आहे. हा फरक कमी करण्याऐवजी तो वाढवण्याचा प्रयत्न राजकारण करते आहे. चार राज्यांतील प्रचार सभेत मोदींनी स्वतः सनातन धर्म अडचणीत आणला जात आहे, त्याचे रक्षण केले पाहिजे होते, असे म्हटले आहे. सनातन धर्म कोणता, हिंदुत्वाचे टॉनिक देणारा हिंदू धर्म कोणता असा संभ्रम नागरिकांच्या मनात आहे आणि हा संभ्रम म्हणजे भाजपचे यश असते. किती तरी वर्षांपासून अनेक भिंतींवर 'कलयुग जानेवाला है और सतयूग आनेवाला है' अशा घोषणा लिहिल्या जात आहेत.

सनातन नावाने वर्तमानपत्रे चालवली जात आहेत आणि गोदी मीडिया या सर्वांच्या कुशीत जाऊन तेथील ऊब घेतो आहे. तेथे ठेवलेले लोण्याचे गोळे खाऊन बोक्याप्रमाणे गलेलठ्ठ होतो आहे. त्याला ना निधर्मीपणाची, ना विचारांची, ना निःपक्ष राहण्याची गरज आहे. लोकांची जेवढी दिशाभूल होईल तेवढी करण्याचे काम व्रतस्थ वृत्तीने माध्यमांनी चालवले आहे. मोदी आणि भाजप एवढी एकच बाजू असलेले किंवा तयार केलेले नाणे त्यांनी वापरावयाचे ठरवले आहे. एकीकडे घटनात्मक संस्थांवर सातत्याने चोची मारण्याचे काम, दुसरीकडे भ्रम पसरवण्याचे प्रयत्न आणि तिसरीकडे देव, धर्म, सनातन, मूलतत्त्ववाद, विश्वगुरु वगैरेचा वापर करून धुके पसरवण्याचे काम किती तरी वर्षांपासून चालू आहे. अशा गोष्टींना फळे कोणती येतील, हे वेगळे सांगण्याची गरज आहे. राहुल गांधींनी पनवती हा शब्द वापरला म्हणून त्यांच्या पक्षाचा पराभव झाला, असे माध्यमे सांगत आहेत. हे जर खरे असेल तर गांधींना पप्पू आणि सोनिया गांधींविषयी अपशब्द वापरणाऱ्यांचा विजय का होत होता, यावर ते भाष्य करत नाहीत. तसे केल्यास अंगलट येते यात शंका नाही.

भारतात अठ्ठावीस राज्ये आणि आठ केंद्रशासीत प्रदेश आहेत. या सर्वांची संख्या छत्तीस मानली तर भाजप किती राज्यांमध्ये आहे ते पाहू. उत्तराखंड, हरियाणा, उत्तर प्रदेश, गुजरात, गोवा, आसाम, त्रिपुरा, मणिपूर आणि अरुणाचलम या ठिकाणी भाजपची सत्ता होती. त्यात आता राजस्थान, छत्तीसगड यांची भर पडणार आहे. मध्य प्रदेश त्यांच्याकडेच आहे. याचा अर्थ बारा राज्ये त्यांच्याकडे आहेत. याशिवाय महाराष्ट्र, मेघालय आणि नागालँड येथे अन्य पक्षांच्या आघाडीबरोबर ते सत्तेत आहेत. याचा अर्थ असा लावला जातो, की लोकसभेच्या निम्म्यापेक्षा अधिक जागा या राज्यांत असल्याने भाजपचा लोकसभा निवडणुकीत सहज विजय होईल, असा दावा केला जात आहे. भाजप असा दावा करण्यात, अफवा पसरवण्यात नेहमीच आघाडीवर असतो, हे आपण पाहत आलो आहोत. तो आत्ताच सांगतोय, की लोकसभा निवडणुकीत आम्ही चारशेचा आकडा पार करू, तर महाराष्ट्रात ४८ पैकी ४२ ते ४५ जागा जिंकू. हा दावा खरा मानला तर जवळपास विरोधी पक्ष संपल्यासारखाच आहे. ५४३ पैकी चारशेहून अधिक जागा भाजपचं जिंकणार असेल आणि

उरलेल्या त्याचे मित्र जिंकणार असतील, तर विरोधी पक्ष संपल्यातच जमा. म्हणजेच विरोधी पक्षमुक्त भारत तयार होणार. हे मोदी यांचे स्वप्न सत्यात येणार. खरेच असे घडले तर देशात लोकशाहीऐवजी एकाधिकारशाही येईल. 'एक नेता, एक पक्ष आणि एक देश' या घोषणेकडे आपला देश सरकेल. लोकशाही लोप पावलेला असा देश खरंच नागरिकांना हवा आहे काय, याचे उत्तर अर्थातच नाही, असे होईल. भाजपला याच कारणासाठी लोक मतदान करत आहेत काय, याचे उत्तरही नाहीच असे येईल.

भाजपने तीन राज्यांत जो विजय मिळवला त्यामागे अनेक कारणे आहेत. राजस्थानात काँग्रेसचे प्रमुख नेते भाजपविरुद्ध न लढता परस्परांशीच लढत होते. पाच वर्षांपासून सुरू झालेली ही लढाई निवडणूक काळातही राहिली. विशेष म्हणजे, राजस्थानातील दलित, आदिवासी आणि मुस्लिम हे घटक मोठ्या प्रमाणात काँग्रेसच्या बाजूने उभे होते. मोदींनी गाजवलेल्या लाल डायरीचा त्यांच्यावर परिणाम झाला नव्हता. राजस्थानात काँग्रेसच पुन्हा येईल, असे तिचे विरोधकही सांगत होते. पण पक्षातील गटबाजीने हे भाकीत खोटे ठरवले. परस्परांचे उमेदवार पाडण्यात आणि विरोधकांना मदत करण्यात हे गट गुंतून राहिले. पक्षाचा पराभव झाला तो मोदींच्या प्रभावामुळे नाही तर काँग्रेसमध्ये उफाळून आलेल्या बेईमानीमुळे झाला, हेही आता अनेक जण बोलू लागले आहेत. पक्षांतर्गत गटात जाती होत्या, सत्तालाभ होता हेही आता लपून राहिलेले नाही. राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि ऐंशी वर्षांचे शेलार मामा असलेल्या खरगे यांनी घेतलेले कष्ट फळाला आले नाहीत. काँग्रेसला बाहेरचा शत्रू हरवू शकत नाही तर आतलाच हरवू शकतो, हे अन्य दोन राज्यांतही सिद्ध झाले आहे.

भाजपने विशेषतः मोदींनी विरोधकांच्या राज्यांत असलेल्या कल्याणकारी योजनांना रेवडी म्हणत सतत टिंगल केली आहे. रेवडी राज्यांत त्यांची गणना केली गेली आहे. पण मध्य प्रदेश गेली वीस वर्षे रेवड्या घेऊनच उभे आहे. त्याने कधी बेकारी, महागाई, भूकेचा प्रश्न सोडवला नाही. तरी मनिऑर्डर पाठवण्याचा धडाका लावला आहे. 'लाडली बहना' म्हणत वेगवेगळ्या गटातील महिलांसाठी दर महिन्याला पैसे पाठवले जातात. गोरक्षक असेल, गाई असतील, धर्मस्थळे असतील, बुवा-बाबा असतील सर्वांनाच रेवडी वाटण्याचा कार्यक्रम सुरू आहे. अशी गोष्ट जर निवडणूक काळात झाली असती आणि मते मिळवण्यासाठी मतदाराला कोणी उघडपणे पाकिट दिले असते तर तो भ्रष्टाचार झाला असता. मग आता कायद्यात बसवून सरकार पैसे वाटत असेल आणि त्याचे मतांमध्ये रुपांतर करत असेल, तर त्यास काय म्हणायचे? सर्वच पक्षांना या रेवडीचा रोग झाला आहे. मूळ प्रश्नाला हात घालून ते सोडवण्यात हे अपयशी ठरले आहेत. कोणी मोफत प्रवास, कोणी मोफत अन्नधान्य, कोणी मोफत सायकल, टी.व्ही., सिलिंडर देण्याचा प्रयत्न करते आणि त्यास कल्याणकारी राज्य म्हणते. मूलभूत गरजा भागवण्याची क्षमता कोट्यवधी लोकांत का निर्माण झाली नाही किंवा त्यासाठी प्रयत्न का केले गेले नाहीत, हा प्रश्न सतत लोंबकळतच राहतो.

भारत जर महासत्ता असेल आणि त्याचे नेते विश्वगुरू व्हायला निघाले असतील तर या देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाहीत आणि पन्नास-साठ कोटी लोक हातात थाळ्या घेऊन सरकारी धान्याची वाट का बघत असतात. या प्रश्नाला लोकांनीच आता भिडले पाहिजे. आम्हाला भिकारी नको तर स्वावलंबी नागरिक बनण्यास मदत करा, असे जेव्हा नागरिक म्हणतील तेव्हा हे रेवडीवाले काय उत्तर देतील, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. मध्य प्रदेशने सरकारी पैक्षात कोट्यवधी लोकांना जगवण्याची गॅरन्टी दिली आहे. ही गोष्ट ते मोठ्या कौतुकाने सांगत आहेत. पण अशी वेळ या लोकांवर का आली, हे कोणी सांगत नाहीत. कामधंदा न करता सरकारी भाकऱ्या मोडा अशी सवय समाज किंवा राष्ट्र घडवू शकत नाही. ते बलवान करू शकत नाही. छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणामध्येही अशाच आश्वासनांचा धुमाकूळ होता आणि डबल इंजिनचे नाव सांगत भाजप त्यात आघाडीवर होता. माणसाला स्वावलंबी बनवण्याऐवजी त्याला त्याची क्षमता वापरण्याची संधी देऊन त्याला निर्माता, सृजनशील बनवण्याऐवजी 'फुकट खा'चा मंत्र देणे घातकच आहे आणि हा खेळ भारतीय राजकारणात चालू आहे.

सत्ताधाऱ्यांच्या मांडीवर बसणाऱ्या छोट्या कुत्र्याप्रमाणे स्वतःची अवस्था करून घेतलेल्या माध्यमांनी या साऱ्या गोष्टी मांडण्यात कधी धन्यता मानली नाही, तर सत्ताधाऱ्यांचा नमो मंत्र जपण्यात ते मशगूल झाले आहेत. जनतेचा अवाज, चौथी शक्ती अशी फितूर होत असेल आणि फक्त सत्ताधाऱ्यांचा पाळणा हलवत असेल, तर त्याचे समाजावर होणारे परिणाम काही विचारायला नको. शेवटी २०२४ च्या निवडणुकीबाबतही भ्रमाचे धुके किंवा राजकीय मायाजाल निर्माण केले जात आहेत. त्यासाठी सनातनी डावपेचापासून पुराणातील कक्षांपर्यंत सर्व काही रसायन वापरले जात आहे. धुके तयार केले जात आहे. धुके म्हणजे प्रकाश नसतो पण तसा भ्रम तयार केला जातो. शेवटी भ्रम हा भ्रमच असतो. तो दीर्घायुषी नव्हे तर अल्पायुषी असतो. उन्ह तापेपर्यंत धुके टिकून राहते आणि उन्ह कडाडलं की धुके पळून जात असते. हा एका अर्थाने निसर्ग नियम असतो. वाढणारे, दाट होणारे, गडद होणारे, उन्हाप्रमाणेच चकाकण्याचा खोटा प्रयत्न करणारे धुके संपणारच असते, यावर लोकांचा विश्वास असतो. भारतीय मतदारांनी निदान आतापर्यंत तरी कुणाला एकाधिकारशहाच्या खुर्चीत बसवल्याचा इतिहास नाही. उलट ज्यांनी असा प्रयत्न केला त्याला धडा शिकवण्याचा प्रयत्न केला आहे. असे करताना नमो बिगर नमो असा फरक केलेला नाही. तो पुन्हा एकदा पाहायचा असेल, तर येत्या मेपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. भ्रम आणि वास्तव यातील फरक तोपर्यंत लोकांच्या लक्षात येईल. लोकांना पुन्हा कुठले आर्यवत नको आहे, धर्माधर्मात, जाती-जातींत भांडणे लावणारे नको आहेत, मणिपूर जळताना मौनाला जाणारे नको आहेत किंवा देवाधर्माच्या नावाने होणारे मॉब लिंचिंग घडताना डोळ्यांवर पडदा टाकणारेही नकोच आहेत.

गोदी मीडियाने पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे वर्णन सेमी फायनल असे केले होते. ते खरे मानले तरी सेमी फायनलमधील यश फायनलमध्ये टिकतेच असे नाही. विश्वकप क्रिकेट स्पर्धेतील भारतीय संघाचे सेमी फायनलमधील यशाचे उदाहरण बोलके आहे. गोदी मीडिया हे समजून घेईल, असे वाटते. ●●●

# यश भाजपचे की कट्टर हिंदुत्वाचे?



अनंत बागाईतकर

**राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनं राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि तेलंगणा विधानसभा निवडणुकी महत्त्वाच्या मानल्या जातात. यात तीन हिंदी भाषिक राज्य आहेत, तर तेलंगणा हे दक्षिणेतील राज्य आहे. भाजप आणि त्याचा पूर्वावतार असलेला भारतीय जनसंघ, त्यांची पालक संघटना रा.स्व. संघ यांचे राजकारण पूर्वीपासूनच 'हिंदी, हिंदू नि हिंदुस्थान' या त्रिसूत्रीत परंपरागतरित्या जोडलेले आहे. यात 'मोदी ब्रँड'चा वापर करून या निवडणुकीत विजय मिळवला त्याचे विश्लेषण...**

नरसिंह राव यांचा १९९६ मध्ये पराभव झाल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने देवेगौडा यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पाठिंबा दिला. त्याचे समर्थन करतानाच त्यांनी लोकसभेत बोलताना काँग्रेसच्या पराभवाची मीमांसा केलेली होती. त्यामध्ये त्यांनी भाजप आणि संघ परिवारातर्फे अनुसरल्या जात असलेल्या धर्माधारित राजकारणाचा मुख्यतः उल्लेख केला होता. भारतातील जनतेमध्ये प्रभु रामचंद्राबद्दल देवत्वाची भावना आहे आणि कुणी त्या भावना किंवा श्रद्धेला आव्हान देऊ शकत नाही; परंतु ही बाब पूर्णपणे नागरिकांच्या खासगी पातळीवरील आहे. तिचा सार्वजनिक किंवा राजकारणासाठी वारपर केला जाणे हे सर्वस्वी राज्यघटनेतील मूलभूत तत्वांशी आणि मूल्यांशी विसंगत आहे. कारण राज्यघटनेने निवडणुकीतील यशासाठी म्हणजेच निवडणुकीच्या राजकारणात धर्माच्या आधारे प्रचार करणे किंवा धार्मिक प्रतीकांचा वापर प्रचारात करण्यास मनाई केलेली आहे. कारण धार्मिक श्रद्धा या सर्वोपरि असतात. निवडणुकीशी त्यांचा संबंध जोडता येणार नाही; परंतु जर एखाद्या पक्षाने राज्यघटनेच्या विरोधात जाऊन तसा वापर करण्याचे ठरविल्यास प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांना त्याच्याशी मुकाबला करणे सर्वथा अशक्य होणारे असते. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत (६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या) भाजप आणि संघ परिवाराने काँग्रेसच्या विरुद्ध साक्षात प्रभू रामचंद्रांना निवडणूक प्रचारात उतरविले होते, असे काहीसे उपरोधाने सांगून नरसिंह राव म्हणाले होते, की जर साक्षात प्रभू रामचंद्रांना काँग्रेसच्या विरोधात उतरविले असेल, तर काँग्रेस पक्षाचा पराभव अटळपणे होणारच! त्यांच्या प्रतिपादनाचा सारांश हा होता, की भाजपतर्फे घटनाबाह्य राजकारण आणि निवडणूक प्रचार केला जात आहे. ज्याचा मुकाबला करणे धर्मनिरपेक्ष राजकीय पक्षांना अशक्य



होणार आहे. म्हणजेच राजकारणात विशिष्ट अशा लोकशाही आणि घटनात्मक मूल्यांचा अवलंब करणारे शालीन नि सभ्य राजकीय संस्कृती असणाऱ्या राजकीय पक्षांना या प्रचारापुढे टिकाव धरणे अशक्यच होणार आहे. स्वघोषित भारतीय संस्कृतिरक्षक असल्याचा दावा करणाऱ्या भाजप आणि संघपरिवाराकडे राज्यघटनेनुसार प्रचार करण्याची साधी सभ्यताही उरलेली नाही आणि बिनधास्तपणे धार्मिक प्रतीकांचा (गैर)वापर करून ही मंडळी कसलाही मुलाहिजा न ठेवता निवडणुका जिंकत आहेत.

**मोदी चेहऱ्याचा विजय :**

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल आला. मध्य प्रदेश आणि छत्तीसगढमधील भाजपचे यश काहीसे अनपेक्षित मानले जाते. राजस्थानात सत्तापरिवर्तनाचे क्रमगत चक्र असल्याने भाजपची सरशी अपेक्षित होती. तेलंगणात काँग्रेसचे झालेले पुनरुज्जीवन स्वागतार्ह आहे. मात्र मिळालेले यश टिकविण्याची जबाबदारी काँग्रेसवर आहे आणि ती ते कशी पार पडतात यावर त्यांच्या विजयी यशाचे भवितव्य अवलंबून आहे. या पाचमध्ये मिझोरम या ईशान्य

भारतातील राज्याचा समावेश आहे. राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि तेलंगणातील निवडणुका महत्त्वाच्या मानल्या जातात. यामध्ये तीन हिंदी भाषक राज्ये आहेत, तर तेलंगणा हे दक्षिणेतील राज्य आहे. भाजप आणि त्यांचा पूर्वावतार असलेला भारतीय जनसंघ आणि त्यांची पालक संघटना रा.स्व. संघ यांचे राजकारण पूर्वीपासूनच 'हिंदी, हिंदू, हिंदुस्तान' या त्रिसूत्रीशी परंपरागतरीत्या जोडलेले आहे. हा प्रामुख्याने उत्तर भारतीय राज्यांचा भाग आहे. हिंदी तेथील मुख्य भाषा आहे. त्यामुळेच या विधानसभा निवडणुकीतील राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या तीन राज्यांमधील विजय हा भाजपसाठी जीवनमरणाचा मुद्दा होता. २०२४ मधील लोकसभा निवडणुकीची रंगीत तालीम म्हणून या निवडणुकांकडे पाहिले जाते ते यामुळेच. कारण या निवडणुकांमुळे होणाऱ्या वातावरणनिर्मितीतूनच लोकसभा निवडणुकीची हवा तयार होऊ लागते. त्यादृष्टीने भाजपने ही उपांत्य फेरी जिंकली असेच म्हणावे लागेल. या निवडणूक निकालांवरून स्पष्ट होणारा मुद्दा हाच आहे, की हिंदी भाषक राज्यात अजुनही 'मोदी ब्रँड'ची चलती आढळून येते. तिन्ही राज्यात प्रादेशिक नेतृत्वाला दुय्यम किंवा सहाय्यकाचे स्थान देऊन केवळ मोदींच्या चेहऱ्यावर निवडणूक लढविण्यात आली आणि त्यात भाजपला घवघवीत यश मिळाले. त्यामुळे या तिन्ही राज्यांमध्ये नेतृत्वाचा निर्णयही मोदी करणार, ही बाब स्पष्ट आहे. मोदींच्या मुकाबल्यात काँग्रेसकडे तोलामोलाच्या चेहऱ्याचा अभाव आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. येथे काँग्रेसचा उल्लेख अशासाठी, की या तीन हिंदी राज्यांमध्ये झालेली निवडणूक ही प्रामुख्याने भाजप आणि काँग्रेसमधील होती. या निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीचा समावेश नव्हता. काँग्रेसने एकहाती केवळ स्वबळावरच ही निवडणूक लढवली होती.

**काँग्रेसला नवीन मतदार मिळवता आला नाही :**

भाजपच्या जमेच्या बाजूंमध्ये मोदींचा चेहरा, अमित शहा यांची आखणी, नियोजन आणि केंद्र सरकारच्या विकास योजनांचा आक्रमक प्रचार या गोष्टींचा उल्लेख करावा लागेल. अर्थात, हे केवळ तोंडी लावण्यापुरते मर्यादित होते. खरा मुद्दा हिंदुत्वाचा आणि बहुसंख्यक वर्चस्ववादाचा होता आणि विविध प्रतीकांच्या माध्यमातून त्याचा प्रचार केला गेला. अगदी उदाहरणच द्यायचे झाल्यास निवडणुकांची प्रक्रिया सुरू असतानाच पंतप्रधानसाहेबांनी वाजतगाजत मथुरेला भेट दिली. तेथे भाषण करताना त्यांनी मथुरेतील कृष्ण जन्मभूमीचा मुद्दा चतुराईने उपस्थित केला. अयोध्येत भव्य राम मंदिर उभारले जात आहे. वारणसीमध्ये विश्वनाथ मंदिराचा विकास करण्यात आला आहे आणि या मालिकेत मथुराही पिछाडीवर राहणार नाही, असे वक्तव्य करीत त्यांनी आडवळणाने कृष्ण जन्मभूमीबद्दल रा.स्व.संघ आणि विश्व हिंदू परिषदेच्या यासंदर्भातील भूमिकेचेच एकप्रकारे अप्रत्यक्ष समर्थन केले. हिंदी आणि हिंदू मतदारांना एवढे संकेत पुरेसे असतात. मथुरेला संत मीराबाईंच्या ५२५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या तिकिटाचे प्रकाशन मोदींनी केले आणि त्यांना श्रध्दांजली वाहिली. मीराबाई या राजस्थानातील होत्या आणि निवडणुकीच्या वेळी पंतप्रधानांना त्यांच्या भक्तीचा पुळका येणे हा योगायोग नव्हे, तर सुनियोजित निवडणूक



डावपेच आणि चलाखी आहे. त्याचबरोबर कृष्णजन्मभूमीचा सूचक उल्लेख हा प्रकार राजस्थानातील मतदारांना आकर्षित करण्याचाच डाव होता. मोदींची ही कार्यशैली आता प्रत्येक निवडणुकीत दिसून येते. तेलंगणाची निवडणूक लक्षात घेऊन त्यांनी तिरुपतीच्या वेंकटेश्वर मंदिराला भेट देण्याचा प्रकारही केला. ही उदाहरणे अशासाठी, की जवळपास प्रत्येक निवडणुकीच्या दरम्यान ते त्यांचा हिंदुत्वाचा चेहरा मतदारांपुढे उघड करीत असतात. जेणेकरुन ते त्यांना मते देतील. ही त्यांची चलाखी आता सर्वांनाच माहिती झाली आहे. त्यामुळेच या निवडणुकीत भाजपच्या मतांच्या टक्केवारीत वाढ झालेली आढळते आणि त्याची दखल विरोधी पक्षांना घ्यावी लागेल. छत्तीसगढमध्ये दोन, मध्य प्रदेशात सात, राजस्थानात तीन आणि तेलंगणातही सात टक्क्यांनी भाजपची टक्केवारी वाढलेली आढळते. याचा अर्थ हिंदुत्वाचा मुद्दा ते यशस्वीपणे लोकांपर्यंत पोहोचवित आहेत. याउलट काँग्रेसच्या मतांची टक्केवारी स्थिर आहे. याचा अर्थ काँग्रेसला नवीन मतदार आकर्षित करण्यात यश आलेले दिसत नाही. परिणामी त्यांचा जनाधार यथास्थिती म्हणजे जैसे थे राहिलेला आढळतो. तेलंगणात मात्र काँग्रेसची टक्केवारी ११ टक्क्यांनी वाढली.

**मोदी केंद्रीत राजकारण :**

ही निवडणूकही मोदी केंद्रित करण्याचा भाजपचा डाव यशस्वी झाला. यामुळे राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या तीन राज्यांमधील पक्षाचे परंपरागत प्रादेशिक नेते राहिलेले वसुंधरा राजे (राजस्थान), शिवराजसिंग चौहान (मध्य प्रदेश) आणि रमणसिंग (छत्तीसगढ) यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. कारण मतदानोत्तर पाहणी अहवालात मध्य प्रदेश आणि छत्तीसगढमध्ये काँग्रेसला अनुकूलता दाखविण्यात आली होती आणि राजस्थानात

भाजप काँग्रेसमध्ये अटीतटीची लढत असल्याचे भाकित करण्यात आले होते. मध्य प्रदेशात तर शिवराजसिंग चौहान यांच्याबद्दलची वाढती नाराजी तसेच जुने निष्ठावंत भाजप कार्यकर्ते आणि नव्याने सामील झालेली मंडळी यांच्यात संघर्ष असल्याचे सांगून कर्नाटकसारखीच स्थिती मध्य प्रदेशात असल्याचे सांगण्यात येत होते. प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. राजस्थानातही वसुंधरा राजे आणि इतर प्रादेशिक भाजप नेते यांच्यातील दुफळीबद्दलच्या बातम्या आल्या होत्या. पण हे सर्व असूनही या तिन्ही राज्यात भाजपला निर्विवाद आणि घवघवीत बहुमत मिळाले याचे श्रेय मोदींना देण्यात आले आहे. मोदींमुळे या तीन राज्यात पुन्हा भाजपला विजय मिळू शकल्याचे सांगितले जाऊ लागले. म्हणजेच मिळालेल्या विजयातील प्रादेशिक नेत्यांचे महत्त्व व वाटा चक्क नाकारण्यात आला आहे. म्हणजेच आता भावी नेता निवडीमध्येही मोदींच्याच पसंतीला प्राधान्य असेल, हे यामुळे स्पष्ट झाले आहे. थोडक्यात, भाजपची निवडणूक रणनीती दिवसेंदिवस मोदीकेंद्रित करण्यात येऊ लागली आहे आणि त्याचे कारण उघडपणे आगामी काळातील लोकसभा निवडणुका हे आहे. कारण लोकसभा निवडणुकासाठी तर मोदींचाच चेहरा प्रमुख असेल आणि त्यासाठीच त्या चेहऱ्याला या तीन राज्यातील विजयाचे वलय देण्याची भाजपची ही योजना किंवा रणनीती आहे. भाजपमध्येही रा.स्व.संघाप्रमाणेत एकचालकानुवर्तित्व प्रस्थापित झाल्याचा हा आणखी एक पुरावा आहे. म्हणजेच भाजपमध्ये प्रादेशिक नेतृत्वाचे स्थानही किती दुय्यम आणि हिणकस आहे, हेही यानिमित्ताने दाखवून देण्यात येत आहे.

**काँग्रेसच्या सॉफ्ट हिंदुत्वाला नाकारले :**

काँग्रेस पक्षात याउलट स्थिती होती. काँग्रेस पक्षाने प्रादेशिक नेत्यांवर आपली भिस्त ठेवली. परिणामी पक्षांतर्गत गटबाजीला आळा बसू शकला नाही. राजस्थानात सचिन पायलट आणि अशोक गेहलोत यांच्यातील संघर्ष चालूच राहिला. सचिन पायलट यांना काँग्रेस पक्षात मिळालेल्या वागणुकीमुळे ते आणि त्यांचे अनुयायी उदासीन राहिले. २०१८ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला गुज्जर (पायलट गुज्जर आहेत) आणि मीणा या दोन्ही समाजाची मते मिळाली होती. या निवडणुकीत या दोन्ही समाजांनी काँग्रेसकडे पाठ फिरविल्याचे चित्र आढळते. राजस्थानात निवडणुकीच्या काळातही गेहलोत व पायलट यांच्यातील धूसफूस थांबण्याची चिन्हे न दिसल्याने राहुल गांधी यांनी राजस्थानात प्रचार करण्याचे जवळपास थांबवून टाकले. तशीच गोष्ट मध्य प्रदेशात झाली. कमलनाथ यांनी एककल्लीपणाची कमाल केली. सर्व सूत्रे आपल्याच हाती ठेवण्याचा अट्टाहास त्यांना नडला. दिग्विजयसिंग हे तर खरे त्यांचे मित्र; पण त्यांनादेखील त्यांनी दुखावले. समाजवादी पक्षाने मध्य प्रदेशात काही जागा काँग्रेसकडे मागितल्या होत्या; परंतु कमलनाथ यांनी तो प्रस्ताव चक्क धुडकावून लावला. परिणामी इंडिया आघाडीतील घटक पक्षही काँग्रेसवर नाराज झाले. याच्याच जोडीला कमलनाथ यांनी हिंदुत्वाच्या आधारे प्रचार सुरू केला. भाजपधार्जिण्या बागेश्वर बाबांचे पाय धुणे, भाजपने दुर्लक्षिलेले बजरंग दल नेते विनय कटियार आणि बजरंग दलाने काँग्रेसबरोबर यावे आणि यासारख्या अनेक हिंदुत्व व हिंदूंना गोंजारणाऱ्या गोष्टी ते करू लागले. त्यांच्या स्वभावानुसार ते या सर्व गोष्टी काँग्रेस नेतृत्वाला न विचारता परस्पर



करीत होते. भाजपचे हिंदुत्वाचे अनुकरण किंवा भ्रष्ट नक्कल केल्यास मतदार आपल्याला मते देतील अशा भ्रमात कमलनाथ राहिले. परिणामी मतदारांनी नकली हिंदुत्ववाद्यांना नाकारले आणि आक्रमक किंवा कट्टरपंथीय हिंदुत्ववाद्यांना आपली पसंती दिली. कमलनाथ यांच्यासारख्या नेत्यांची ही एक समस्या आहे.

भाजपपेक्षा काँग्रेस वेगळी कशी आहे हे दाखविण्याऐवजी काँग्रेसही भाजपसारखीच कशी आहे असे दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु मतदारांना ही बाब न पटणारी असते, हे काँग्रेसला अद्याप कळलेले नाही. मतदारांच्या लेखी हिंदुत्व हे हिंदुत्व असते आणि त्यामध्ये सौम्य आणि जहाल असा फरक ते करीत नाहीत. ते जहाल पर्यायच स्वीकारतात कारण त्यात आक्रमकता आणि आकर्षकपणा असतो (भले त्यामध्ये दीर्घकालीन तोटा किंवा नुकसान संभवत असले तरी). काँग्रेसने सवलतींबाबतही भाजपचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला. गॅस सिलिंडर स्वस्तात देणे, मध्य प्रदेशात मुली आणि महिलांसाठी सवलत योजना जाहीर करणे असेही भाजपच्या 'सवलती उर्फ रेवडी संस्कृती'चे भ्रष्ट अनुकरणही काँग्रेसने करण्याचा प्रयत्न केला; परंतु सत्तेत असलेल्या आणि गेली अनेक वर्षे या सवलत योजना प्रत्यक्षात राबविणाऱ्या भाजपला मतदारांनी जवळ करणे अत्यंत नैसर्गिक होते.

**रेवंत रेड्डींवरील विश्वासाचा विजय :**

छत्तीसगढमध्ये भाजपने आदिवासी व ओबीसी समाजात हिंदुत्वाची पेरणी केल्याचे या निवडणुकीतील मतदान टक्केवारीतून आढळून येते. तसेच भूपेश बघेल यांचा फाजील आत्मविश्वासही त्यांना

नडला. तेलंगणात मात्र काँग्रेसने प्रदेश काँग्रेस आणि एकंदरीतच निवडणुकीची जबाबदारी दिलेल्या रेवंत रेड्डी यांना दिलेला मुक्तहस्त किंवा मोकळीक ही यशस्वी ठरली. मुळाच रेवंत रेड्डी यांनी काँग्रेसचे पुनरुज्जीवन करताना त्यात जे नावीन्य आणले त्याचा काँग्रेसला फायदा झाला. रेवंत रेड्डी हे विविध पक्षात प्रवास करून आलेले नेते आहेत. मूळ काँग्रेसपासून सुरुवात करून मग भाजप आणि तेलगु देशम असा राजकीय प्रवास करीत ते पुन्हा काँग्रेसमध्ये आले. तेलंगणात तेलगु देशमच्या कार्यकर्त्यांचे आख्खे जाळे ते बरोबर घेऊन आले. यामुळे काँग्रेसमध्ये जुने निष्ठावंत आणि नवे असा वाद काहीकाळ निर्माण झाला होता; परंतु मुळातच काँग्रेस पक्ष या राज्यात एवढा दुर्बळ झालेला होता, की नव्यांना होणारा विरोधही क्षीणच होता; परंतु रेवंत रेड्डी यांनी चंद्रशेखर राव यांच्या विरोधात यशस्वी प्रचारमोहिम केली. त्यांच्या राज्यकारभाराची लक्तरे वेशीवर टांगली आणि तेलंगणाला राजकीय पर्याय देण्याचे आश्वासन मतदारांना दिले. मतदारांना नावीन्याचीदेखील आवड असते. पंजाबमध्ये ज्याप्रमाणे मतदारांनी परंपरागत अकाली दल आणि काँग्रेसला नाकारून आम आदमी पार्टी (आप)ला पसंत केले. तसाच प्रकार तेलंगणात घडला.



**आता काँग्रेसवर सत्ता टिकवण्याची जबाबदारी :**

तेलंगणाची निर्मिती खरी तर काँग्रेसने केली; परंतु त्याचे श्रेय मात्र चंद्रशेखर राव यांनी घेऊन गेली दहा वर्षे तेलंगणावर राज्य केले; परंतु दहा वर्षात त्यांचे वलय निष्प्रभ झाले. के. चंद्रशेखर राव यांच्या दिवसेंदिवस ढिसाळ व अनागोंदी राज्यकारभारालाही मतदार कंटाळले होते. तेलंगणा निर्मितीच्या नुसत्या श्रेयाच्या आधारे आणि भल्यामोठ्या जाहिराती देऊन राज्यकारभार यशस्वी करीत असल्याचे चित्र निर्माण करता येत नाही. त्यासाठी ठोस अंमलबजावणीही करावी लागते, हे राव विसरले. त्याचबरोबर भ्रष्टाचार आणि घराणेशाहीचे डागही त्यांना चिकटले होते. त्यामुळेच कंटाळलेल्या मतदारांनी काँग्रेसचा पर्याय निवडला. आता मिळालेले यश पचवून ते टिकविणे आणि त्याची व्याप्ती वाढविणे तसेच आता पक्षसंघटना मजबूत करून मजबुतीने पाय रोवण्याचे काम काँग्रेसला करावे लागेल. मिळालेल्या संधीचे सोने करण्याची जबाबदारी आता काँग्रेसवर आहे. अन्यथा तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या भाजपचा धोका वाढू शकतो. तेलंगणातील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे एमआयएम हा पक्ष आणि त्या पक्षाचे प्रमुख असदुद्दिन ओवैसी यांची जागा मतदारांनी दाखवून दिली. या पक्षाला त्यांच्या परंपरागत क्षेत्राच्या पलीकडे मतदारांनी वाढू दिले नाही. म्हणजेच हैदराबाद वगळता इतरत्र असलेल्या मुस्लिम समाजाने काँग्रेसच्याच पारड्यात आपले मत टाकले.

**काँग्रेसला नवे मुद्दे द्यावे लागतील :**

या निवडणुकीत काँग्रेसने प्रचारात आणलेले मुद्दे प्रभावी ठरले नाहीत. विशेषतः मोदी-अदानी संबंधांबाबतचा मुद्दा, सांप्रदायिकता किंवा धार्मिक कट्टरतेता मुद्दा मतदारांना भावलेला आढळत नाही. जातजनगणनेसारखा मुद्दाही ओबीसी किंवा तत्सम समाजांना आकर्षित करू शकला नाही. त्याचप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा मुद्दाही फारसा पसंतीला उतरलेला आढळत नाही. त्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे काँग्रेसने भाजपच्या धर्तीवर हिंदुत्व असो किंवा सवलतींच्या मुद्याच्या आधारे मतदारांना आकर्षित करण्याचा केलेला प्रयत्न फारसा यशस्वी ठरलेला दिसत नाही. त्यामुळेच लोकसभेसाठी काँग्रेसला नव्याने रणनीती आखावी लागणार आहे.

**काँग्रेसची बार्गेनिंग पॉवर संपली :**

या सर्व निकालांच्या आधारेच लोकसभेच्या होणाऱ्या आगामी निवडणुकांचा विचार करावा लागणार आहे. कारण या निवडणुकांकडे लोकसभा निवडणुकीची रंगीत तालीम म्हणूनच पाहिले गेले. त्यामुळेच यावेळी काँग्रेसची एकंदर रणनीती जर यशस्वी ठरली नसेल, तर त्यांना त्यात बदल करावा लागणार आहे. दुसरी बाब म्हणजे भाजपच्या विरोधातील इंडिया आघाडीला काँग्रेसच्या या पराभवामुळे धक्का बसलेला आहे. कारण इंडिया आघाडीतील काँग्रेस हा प्रमुख आणि जवळपास नेतृत्व करणारा पक्ष मानला जातो; परंतु या पराभवामुळे काँग्रेसची आघाडीतील इतर राजकीय पक्षांबरोबरची राजकीय घासाघीस म्हणजेच बार्गेनिंग करण्याची क्षमता आता कमी झालेली आहे. मध्य प्रदेशात काँग्रेसने समाजवादी पक्षाला दुखावलेले आहे आणि त्यामुळेच आता लोकसभेच्या वेळी या पक्षाला चुचकारण्याखेरीज काँग्रेसला पर्याय राहणार नाही. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाबाबतही यानिमित्ताने पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काँग्रेसची ही दादागिरी त्यांना लोकसभा निवडणुकीच्या वेळी भोवल्याखेरीज राहणार नाही. ज्या राज्यात जो पक्ष बलवान तेथे त्या पक्षाला प्राधान्य देण्याचा निकष जर इंडिया आघाडीत असेल तर उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार या राज्यात काँग्रेसची पंचाईत झाल्याखेरीज राहणार नाही. त्यामुळे आघाडीधर्माचे पालन करताना प्रसंगी स्वतःकडे पडती बाजूही घेण्याचा लवचिकपणा काँग्रेसने

दाखविल्याखेरीज काँग्रेसचे भले होणार नाही. काँग्रेसच्या या एककल्लीपणामुळे ममता बॅनर्जी पुन्हा एकदा नाराज झाल्या आहेत आणि त्यांनी इंडिया आघाडीच्या बैठकीला हजर न राहण्याचे ठरविल्याचे वृत्त आहे. थोडक्यात, अपयश ही यशाची पहिली पायरी असते, हा धडा घेऊन काँग्रेसने किमान लोकसभा निवडणुकीसाठी सर्वसमावेशक भूमिका घेण्याचा मनाचा मोठेपणा आणि उदारता दाखविण्याची वेळ आली आहे. तरच भाजप राजवटीचा मुकाबला करणे त्यांना शक्य होईल. या तीन राज्यांमध्ये काँग्रेसची सरशी झाली असती तर पक्षाचे वर्तमान अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या जागी राहुल गांधी यांना पुन्हा बसविण्याचे मनसुबे काही मंडळींनी रचले होते. किंबहुना त्यामुळेच या निवडणुकांमधील प्रचारात खर्गे यांचा सहभाग नगण्य होता, ही बाब दुर्लक्षिता येण्यासारखी नाही; परंतु तीन राज्यात पराभव झाल्यामुळे या हालचालींना आपोआपच पायबंद बसलेला आहे; परंतु अजुनही काँग्रेस पक्षातील ही घराणेशाहीची जी हुजरेगिरी संपत नाही हे दुर्दैवी आहे.



**देशाची राजकीय विभागणी :**

या निकालांमुळे उत्तर भारत म्हणजेच हिंदी भाषक राज्ये आणि दक्षिण भारत किंवा बिगर हिंदी भाषक राज्ये अशी स्पष्ट विभागणी देशात निर्माण होताना दिसत आहे. उत्तर भारतातील हिंदी पट्टयात उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हरयाणा, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ भाजपने बाजी मारलेली आहे. पश्चिम भारतातील गुजरात, महाराष्ट्र व गोव्यात भाजपची सरकारे आहेत; परंतु उत्तरेतील हिमाचल प्रदेश, पंजाब आणि दिल्ली याठिकाणी भाजपला शिरकाव करता आलेला नाही. त्याचप्रमाणे कर्नाटक गमावल्याने आणि पाठोपाठ तेलंगणातही फारसे राजकीय स्थान न मिळाल्याने भाजपला दक्षिणेत कुठेही स्थान निर्माण करणे शक्य झालेले नाही. तामिळनाडू आणि केरळ या दोन राज्यात तर भाजपला स्थान मिळविण्यासाठी अजून बराच काळ थांबावे लागेल. ईशान्य भारतातील राजकारण हे केंद्रात कुणाचे सरकार आहे त्या भोवतीच फिरत असते. त्यामुळे सध्या भाजपचे सरकार केंद्रात असल्याने तेथील प्रादेशिक पक्ष भाजपबरोबर आहेत. केंद्रात बदल होताच त्यांच्या भूमिकेतही बदल होऊ शकतो. त्यामुळे तेथील राजकारणाचा देशातील सर्वसाधारण राजकारणाबरोबर विचार करता येणार नाही.

**मिझोराममध्ये युवकांनी बदल केला :**

मिझोराममध्ये झोरम नॅशनलिस्ट पार्टीने सत्ता काबीज केली. इंदिरा गांधी यांनी ज्यांना राजकारणात आणले आणि त्यांचे विश्वासू असलेले लालदुहावमा या माजी पोलिस अधिकाऱ्याने स्थापन केलेल्या या पक्षाला बहुमत मिळाले. लालदुहावमा यांची दीर्घ राजकीय कारकिर्द आहे. ते भाजपच्या फारसे निकटचे मानले जात नाहीत; परंतु मिझोराममधील युवकांनी त्यांच्या पक्षाला साथ दिल्याने त्यांना बहुमत मिळाल्याचे सांगितले जाते. त्यामुळे भाजपबरोबर असलेल्या मिझो नॅशनल फ्रंटला पराभवाचा सामना करावा लागला आहे. एकेकाळी या राज्यावर सलग सत्ता असलेल्या काँग्रेस पक्षाला केवळ एका जागेवर तर भाजपला दोन जागांवर समाधान मानावे लागले आहे. मणिपूरमधील घडामोडींचा परिणाम या राज्यातील मतदानावर होणे अपेक्षित होते आणि तसेच घडले. त्यामुळेच पंतप्रधान हे या राज्यात प्रचाराला देखील गेले नव्हते.

**हिंदी भाषिक राज्यातील हिंदुत्व :**

वरील पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीपर्यंत कायकाय घडू शकते आणि कोणते मुद्दे पुढे येऊ शकतात याचा अंदाज बांधता येऊ शकतो. हिंदी भाषक राज्यात आक्रमक हिंदुत्वाचे नाणे अद्याप चलनी असल्याचे या निवडणूक निकालांनी दाखविलेले असल्याने भाजपतर्फे अयोध्येत उभारल्या जाणाऱ्या राम मंदिराचा मुद्दा मोठ्या प्रमाणात वापरला जाईल. त्यामुळेच एका प्रचारसभेत अमित शहा यांनी राम मंदिरात दर्शनासाठी शुल्क न आकारता ते मोफत ठेवण्यात येईल असे जाहीरपणे सांगितले होते. हा प्रचार धार्मिक होता आणि निवडणूक आचारसंहितेचा भंग करणारा होता, तरीही पाळीव निवडणूक आयोगाने कारवाई केली नव्हती. खुद्द मोदींनी मथुरेत जाऊन अप्रत्यक्षपणे कृष्णजन्मभूमीचा मुद्दा छेडला होता. त्यामुळेच लोकसभेच्या निवडणुकीत मथुरा आणि काशीचे मुद्दे पुढे आणले जाऊ शकतात. याखेरीज येत्या काळात मोदी सरकार आणि दक्षिणेतील तसेच बिहार आणि पश्चिम बंगालसारखी बिगर भाजप राज्य सरकारे यांच्यातील संघर्षात वाढ होताना दिसेल. आर्थिकदृष्ट्या या राज्यांची गळचेपी करण्याचेही प्रयत्न केले जातील. यातून उत्तर विरुद्ध दक्षिण असा वादही काही कट्टरपंथी मंडळी पेटवू शकतात. त्यापासून सावधगीरी बाळगावी लागेल आणि विरोधी पक्षांच्या आघाडीला विलक्षण संयमाने या कट्टर आणि आक्रमक बहुसंख्यकधार्जिण्या राजकारणाचा मुकाबला करावा लागेल. त्यासाठी आततायी विधाने करण्यापासून विरोधी नेत्यांना संयम पाळावा लागेल. हे निवडणूक निकाल विरोधी पक्षांसाठी इशारा देणारे आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही आणि विरोधी पक्षांना परस्परांना योग्य रितीने सामावून घेण्याची भूमिका ठेवल्यास लोकसभा निवडणुकीत भाजपचा मुकाबला करणे इंडिया आघाडीला शक्य होईल. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# वाटचाल एकाधिकारशाहीकडे



श्रीराम पवार

**लोकसभेच्या २०१४ च्या निवडणुकीपासून नरेंद्र मोदी यांच्या व्यक्तिगत कामगिरीचा वाटा नाकारता येत नाही. पण आपला वाटा निर्विवादपणे प्रस्थापित केल्यानंतर आता मोदी पक्षावर संपूर्ण कब्जा करत आहेत. आपल्याला हव्या तशा राजकारणाच्या सोंगट्या फिरवत आहेत. प्रत्यक्षाहून प्रतिमा व्यापक बनलेल्या मोदींच्या प्रतिमेनं आता एकाधिकारशाहीकडे वाटचाल सुरू केली आहे. मोदींची ही एकाधिकारशाही भाजप या पक्षाबरोबरच देशाच्या लोकशाही, संविधानिक मूल्यांचा संकोच तर करणार नाही ना? अशी भीती व्यक्त होत आहे...**

पाच राज्यातील विधानसभांच्या निकालांनी खास करून उत्तर भारतातील हिंदी पट्ट्यातील तीन राज्यांचा निकाल भाजपमध्ये हायकमांड संस्कृतीचं वर्चस्व सर्वंकष बनल्याचं सिद्ध झालं आहे. या निवडणुकीत भाजपनं मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड ही तीनही राज्यं जिंकली. त्यातील दोन काँग्रेसकडून खेचून घेतली, हे त्या पक्षाचं दणदणीत यश आहे यात शंकाच नाही. या निकालंचा अर्थ पुढच्या राजकीय वाटालीवरच्या परीणामांच्या अंगानं लावला जाणं स्वाभाविक आहे. या निकालानंतर आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यात जमा आहे, असं सांगणं किंवा पिक्चर अभी बाकी है म्हणून विरोधक एकत्र लढले तर किती, कसा परीणाम होईल, याची मांडणी करणं हे ओघानच येतं. मात्र या निकालांनी हिंदी भाषक राज्यांत स्थानिक नेतृत्वाला बाजूला ठेवून प्रचंड विजय मिळवू शकतो, हे दिसल्यानंतर भाजपमध्ये हायकमांड अत्यंत बळकट झालं आहे. निवडणुकांचा निकाल मोदी यांच्या सर्वंकष वर्चस्वाचा सांगावा घेऊन आला आहे. एकाधिकारवादी नेतृत्वाला सुखावणारं असलं आणि त्यातून पक्ष जिंकतो ना बस्स, असं पक्षालाही वाटू लागलं तरी याच हायकमांडी वर्चस्वाच्या पोटात लोकशाहीची मूळ पोखरणारं रसायन तयार होऊ लागतं. नेत्यांच्या मर्जीप्रमाणे हलणाऱ्या सोंगट्या असं स्वरुप मुख्यमंत्रीपदावर बसणाऱ्यांनाही येऊ लागण्याचा धोका असतो. जो काँग्रेसच्या अव्वल सत्ताकाळात देशानं पाहिला होता. याच निवडणुकांचे निकाल असंही सांगतात, की मोदींची जादू वगैरे सारं विंध्य पर्वताच्या उत्तरेला चालतं, दक्षिणेत नाही. हीच वाटचाल सुरू राहिली तर देशातील एका राजकीय दुभंगाची ती नांदी असेल.



**तेलंगणातील यशाचं कौतुक झालं नाही :**

लोकसभेआधीचा उपांत्य समाना म्हणून गाजवलेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीत भाजपनं मध्य प्रदेशचं राज्य दोन तृतियांश बहुमतासह राखलं. छत्तीसगड आणि राजस्थान मिळवलं, तेलंगणात काँग्रेसनं बीआरएसची दहा वर्षांची सत्ता उलथवली. एवढी एकच निवडणूक झाली असती तर काँग्रेसच्या तेलंगण यशाचं कोण कौतुक झालं असतं. दक्षिणेतील आणखी एक वाट भाजपसाठी रोखणारा निकाल म्हणून त्याकडं पाहिलं गेलं असतं. ते आताही वास्तवच आहे मात्र काँग्रेसकडून उत्तरेतील दोन राज्यं भाजपनं मिळवल्यानं भाजपच्या विजययात्रेचा परीणाम स्वाभाविकच अधिक असणार. दक्षिणेतील भाजपच्या कमजोरीपेक्षा काँग्रेसनं दोन राज्यं गमावून एक राज्य जिंकल्यावर रोख भाजपच्या विजय यात्रेवर आहे. पण म्हणून सत्ता कोणाची यापलिकडं देशाच्या राजकारणासाठी हे निकाल दाखवत असलेली कहाणी बदलत नाही. मिझोराममध्ये झोरम पीपल्स मुव्हमेंट या तुलनेत नव्या पक्षानं मारलेली बाजी लक्षवेधी आहे. एनडीएचा घटक असेलल्या पण अलिकडं दुरावलेल्या एमएनएफचं सरकार

गेलं आणि काँग्रेसची अवस्था तोळामासा झाली, हे इशान्येतील प्रादेशिकांच महत्व अधोरेखीत करणारं आहे.


**भाजपचा विजय म्हणजे हायकमांड शरण :**

या निवडणुकीत एक विरोधाभास होता. सामूहिक नेतृत्वावर बोलणारा भाजप प्रादेशिक नेत्यांना बाजूला टाकून सारे निर्णय हायकमांडवर सोपवत होता. तर हायकमांड संस्कृतीसाठी कायम बोलल्या जाणाऱ्या काँग्रेसमध्ये स्थानिक नेतृत्वाला कमालीचा वाव दिला होता. इतका की काहीवेळा हायकमांडला काय वाटतं याचा विचार न करता राज्यातील नेते हवं ते करीत होते. मध्य प्रदेशात कमलनाथ, राजस्थानात अशोक गेहलोत आणि छत्तीसगडमध्ये भूपेश बाघेल यांनी प्रचारयंत्रणा त्याना हवी तशी राबवली. उमेदवार वाटपातही त्यांचं वर्चस्व होतं. भाजपनं मात्र प्रसंगी प्रादेशिक नेत्यांची राजी, नाराजी न पाहता सारी सूत्रं केंद्रीय नेतृत्वाकडं ठेवली. प्रादेशिक नेत्यांना डावलल्याच्या चर्चेकडं पूर्ण दुर्लक्ष केलं. या पार्श्वभूमीवर निवडणुकांतील यश भाजपमधील मोदी-शहा याचा सर्वाधिकार ठोस बनवणारं आहे. हा या निकालाचा राजकीय वाटचालीवरचा एक प्रमुख परीणाम तो समजून घेतला पाहिजे. मोदी याचं हे यश किमान हिंदी पट्ट्यात इंदिरा गांधी यांनी पक्ष आणि देशाच्या राजकारणावर जी घट्ट पकड मिळवली होती त्या प्रकारचं आहे. अर्थातच इंदिरा गांधी यांच्या त्या यशाचा परीणाम पक्षात हायकमांड शरण संस्कृतीला बळ देणारा होता. नेता म्हणजे पक्ष पुढं जाऊन नेता म्हणजे देशाचं प्रतिक हे वास्तव नसलेलं पण वास्तव म्हणून स्वीकारवं लागेल, असं कथन त्यातून तयार झालं. तेच मोदी यांच्या बाबतीत या निवडणुका घडवत आहेत. याचं कारण उघड आहे, मोदी गुजरातेत मुख्यमंत्री ते साधारणतः त्या काळात भाजपनं निरानराळ्या राज्यात स्थानिक जनाधार मिळवू शकणारं नेतृत्व उभं करण्यावर भर दिला होता. जी काँग्रेसहून वेगळी वाटचाल होती. तेव्हा भाजपमध्ये शीर्षस्थ नेते वाजपेयी-अडवाणी होतेच. मात्र राज्यातील नेत्यांचं महत्व डावलता येण्यासराखं नव्हतं. किंबहुना ते भाजपचं इंदिरा आणि राजीवकालिन काँग्रेसहून वेगळेपणही होतं. यातूनच मध्य प्रेदश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये शिवराज सिंग चौहान, वसुंधाराराजे आणि रमणसिंग यांच नेतृत्व पुढं आलं, ते स्थिरावलही. यातील प्रत्येक राज्याच्या राजकारणाचा पोत वेगळा आहे. मोदी किंवा या तीनही नेत्यांची शैलीही एकसारखी नाही. मात्र प्रदेशातून आलेले आणि स्थानिक राजकारणावर पकड असलेले नेते असा त्यांचा लौकिक कायम होता आणि आहे. याचा भाजपच्या वाटचालीत लाभ नक्कीच झाला.

**मोदींच्या सामर्थ्य आणि मर्यादांचाही विचार व्हावा :**

या सर्व राज्यांत काँग्रेससकडून सत्ता हिसकावणं आणि तिथं पहिल्या फळीचा पक्ष बनणं यात या नेत्यांचा आणि त्यांच्या स्थानिकांशी जोडलेलं असण्याचा वाटा आहे. मोदी राष्ट्रीय राजकारणात आल्यानंतर भाजपच्या विस्ताराच पॅटर्न बदलला. दहा वर्षांच्या काळात तो स्थिर करण्याची पावलं मोदी त्यांच्या विशिष्ट कार्यशैलीतून टाकताहेत. त्यात पक्षाला निवडणुकीची अवाढव्य यंत्रणा बनवणं आणि निर्णयप्रक्रीया संपूर्णपणे ताब्यात ठेवणं यावर भर राहिला. अशा प्रकारचं राजकारण यशस्वी करताना व्यक्तिगत करिष्मा सर्वात महत्त्वाचा घटक असतो. आपल्याकडं कार्यक्रम, धोरणं, प्रचार





कथन या साऱ्यांचं कितीही महत्त्व सांगितलं, तरी व्यक्तिगत प्रभाव हा मतदानावर पीरणाम करणारा घटक असतो. जेव्हा नेता साऱ्या पक्ष यंत्रणेच्या पलिकडं जाऊन लोकांशी थेट संवाद साधू शकतो आणि त्यांच्यावर प्रभावही टाकू शकतो, तेव्हा असा करिष्मा विजयाची गणितं उलटीपालटी करण्याची क्षमता दाखवतो. हे घडवणारे मोदी हे काही पहिले नेते नाहीत. देशात आणि राज्य पातळीवर अनेकांनी या प्रकारचं यश मिळवलं होतं. मुद्दा ज्या भाजपमध्ये कधीतरी सामूहिक नेतृत्वाचा बोलबाला होता तिथं जवळपास एकचालकानुर्तित्व रुजतं आहे. त्याचा परीणाम हिंदी भाषक राज्यांत अत्यंत स्पष्ट आहे. हा परीणाम तितक्या प्रमाणात दक्षिण भारतात दिसत नाही, हेही मोदिकालिन वास्तव आहे. पाच राज्यांच्या निवडणुकांत भाजपनं मिळवलेल्या यशाचं मूल्यमापन या मोदी करिष्म्याचं सामर्थ्य आणि मर्यादा या अंगानंही करायला हवं.

**प्रत्यक्षाहून प्रतिमा मोठी होण्याचा धोका :**

जो नेता इतरांना निवडून आणण्याइतका प्रभाव टाकू शकतो त्याचं नेतृत्व मान्य करण्याखेरीज पक्षांपुढं पर्याय नसतो. ही क्षमता जोवर गांधी घराणं दाखवत होतं, तोवर गांधी म्हणतील ती पूर्व दिशा काँग्रेसच्या राजकारणात होतीच. २०१४ च्या पराभवानंतर त्याला लक्षणीय ओहोटी लागली. त्याचवेळेस मोदी यांच्या या क्षमतेचा बोलबाला सुरू झाला. २०१४ किंवा २०१९ च्या निवणुकांतील भजाप विजयाचं विश्लेषण निरनिराळ्या रितीनं करता येणं शक्य आहे. मात्र त्यात मोदी यांच्या व्यक्तिगत कामगिरीचा वाटा नाकारता येत नाही. एकदा असा वाटा निर्विवादपणे प्रस्थापित केल्यानंतर महत्वाकांक्षी नेतृत्व पक्षावर संपूर्ण कब्जा करणं आणि आपल्याला हव्या तशा सोंगट्या राजकारणात हलवण्याचा प्रयत्न सुरू करतं. यात आपण पक्षाला विजयी करू शकतो तर पक्ष आपल्या तंत्रानं चालला पाहिजे, हा अविर्भाव असतो. तिथं आपलं कुणाशी किती जमतं यावर निर्णय होऊ लागतात. यशासारखं दुसरं काहीच नसल्यानं ते मान्य करणं इतकचं पक्ष संघटनेच्या हाती उरतं. प्रत्यक्षाहून प्रतिमा

व्यापक बनलेल्या मोदी यांनी हुळहळू पण निश्चिमतपणे पक्षातील आपल्याहून ज्येष्ठांना राजकारणातून जवळपास हद्दपार केलं. आपल्या बरोबरीचे मात्र स्वतंत्रपणे कृती करू शकणारे आवाज सिमित होत गेले. एक तर त्यांना जे नव्या स्थितीत मिळालं ते स्वीकारावं लागतं किंवा वळचणीला पडावं लागतं. एकमुखी, कणखर वगैरे विशेषणांनी नेतृत्व सजवलं जातं, तेव्हा हे अनिवार्य असतं. भाजपची वाटचाल त्याच दिशेनं आहे. पाच राज्यात निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा भजापसमोर सर्वात मोठी कसोटी होती ती राजस्थान जिंकण्याची आणि मध्य प्रदेश वाचवण्याची.

**एक नेता, एक पक्ष, एक विचारधारेकडे वाटचाल :**

काँग्रेसचा आत्मविश्वास कर्नाटकच्या मोठ्या विजयानं दुणावला होता आणि राहुल गांधी यांना 'भारत जोडो यात्रे'तून नवी राजकारणाची शैली गवसल्याचं दिसत होतं. या निवडणुकीत हिंदी भाषक तीन्ही राज्यात भाजप विरोधात काँग्रेस अशीच लढत असल्यानं त्याचा परीणाम २०२४ च्या लोकसभा निवडणुकांवर होईल, हेही उघड होतं. कोणत्याही दोन निवडणुका सारख्या नसतात आणि लोकसभेपूर्वीच्या विधानसभा निवडणुका आणि लोकसभा यातील कौल निराळे असू शकतात. याचे अनेक दाखले भारताच्या राजकारणात देता येतील. मात्र अशा निवडणुकांत एकतर्फी विजय वातावरण निर्मितीला नक्कीच हातभार लावू शकतो. त्या अर्थानं तिसऱ्या टर्मसाठी इच्छुक असलेले मोदी आणि त्यांचा भाजप विरोधात हीच वेळ भाजपला रोखण्याची असं मानून मैदानात उतरलेला काँग्रेस या दोहोंसाठी ही निवडणूक महत्त्वाची होती. त्यातील निकाल आता उघड आहेत आणि भाजपनं मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड ही तीनही राज्यं जिंकल्यानं भाजपचा आत्मविश्वास आता २०२४ ची लोकसभा निवडणुकही जिंकल्यात जमा, अशा थाटाचा झाला तर नवल नाही. निकालाचे २०२४ च्या निवडणुकीवर काय परिणाम होतील याला महत्त्व आहेच, मात्र देशाच्या वाटचालीवर 'एक पक्ष, एक नेता, एक विचारधारा' या प्रकारचं राजकारण घट्ट होण्याचा परिणाम काय, याचं महत्त्व अधिक आहे.

**मोदी की गॅरंटीचं गारूड :**

त्या अंगानं पाहता या निवडणुकीनं ज्या राज्यात भजापकडं स्वतः ची ताकद असणारं प्रादेशिक नेतृत्व आहे, तिथं या नेतृत्वाला बाजूला ठेवून मोदी विजय मिळवू शकतात, हे सिद्ध होणं म्हणजे हायकमांडचं बस्तान पुरतं स्थिरावणं. मोदी-शहा याचं भाजपच्या संघटनेवरचं वर्चस्व काही या निकालांमुळचं सिद्ध होतं असं अजिबात नाही. ते वेळोवेळी त्यांनी दाखवून दिलंच आहे. मात्र या तीनही राज्यात बलदंड प्रादेशिक नेते भजापकडं आहेत. पंतप्रधानपदासाठी तुमचा उमेदवार कोण, असं विचारून विरोधकांना कोंड्यात पकडायचा प्रयत्न करणारा भाजप या तीनही राज्यात मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार जाहीर करत नव्हता, तर मोदी हाच प्रचारातील चेहरा अशी रणनिती वापरत होता. प्रचारात 'मोदी की गॅरंटी' ही कॅचलाईन होती. तीनही राज्यात भाजपनं केंद्रीय मंत्री आणि खासदारांनाही विधानसभा लढवायला भगा पाडली. अनेकजण अनिच्छेनं ती लढले. हे केंद्रातले नेते राज्यात आल्यानं राज्यात आपलीच सद्दी, असं मानणाऱ्या नेत्यांपुढं स्पर्धकही उभे राहिले. मध्य प्रदेशात शिवराजसिंग चौहान आणि राजस्थानात




**पक्षातील लोकशाही आक्रसत जाणार!**

हिंदीभाषक राज्यातील हे अत्यंत ठळक यश भाजप कसं हाताळतो याला महत्त्व आहे. हे यश मोदींचं हे पालुपद सुरू झालं आहे ते स्वाभाविकही आहे. मात्र त्याचा परिणाम म्हणून सतत श्रेष्ठींच्या नजरेकडं पाहणारे होयबा राज्यांचे कारभारी बनू लागतील. जे नेत्यांचा अहं सुखावणारं असू शकतं. मात्र पक्षातील लोकशाही आक्रसत नेऊ शकतं. पुन्हा काँग्रेसचं उदाहरण आहेच. मुद्दा भाजप कोणता धडा घेणार?

वसुंधराराजे ही काही भाजपच्या श्रेष्ठींची त्या राज्यातील पहिली पसंती नाही. शिवराजसिगं यांचा लोकसंपर्क आणि ओबीसी नेतृत्व म्हणून असलेली पकड यामुळं पक्ष नेतृत्व त्यांच्याशी जुळवून घेत होतं. मात्र यावेळी त्यांचा चेहरा पुढं करायचा नाही, हे पक्षश्रेठींनी ठरवलंच. पण पंतप्रधान प्रचारात त्यांची कामगिरी अगदी त्यांचं नावही फारसं घेत नव्हते, हा स्पष्ट संदेश होता. राजस्थानातही वसुंधराराजे आणि पक्षनेतृत्वातील दुरावा लपणारा नव्हता. या दोन्ही नेत्यांच्या निकटच्या समर्थकांना उमेदवारीसाठी प्रतिक्षा करावी लागली. राजस्थानात अखेरच्या टप्प्यात वसुंधराराजेंना पर्यायच नाही, हे दिसू लागल्यानंतर त्यांना महत्त्व दिलं गेलं. छत्तीसगडमध्ये तर रमणसिगं तीनवेळा मुख्यमंत्री होते. त्यांनाही निवडणूक निर्णयप्रक्रीयेत भाजपन दूरचं ठेवलं होतं.


**भाजपमधील प्रादेशिक नेत्यांची संधी संपली :**

या स्थितीत भाजपला मोठं यश मिळतं तेव्हा या प्रादेशिक नेत्यांचं भवितव्य स्पष्ट असतं. त्यात बदल कधी होईल, हे तुलनेत कमी महत्त्वाचं. ते पक्षाच्या विजयात, निर्णयात नाहीत तर पंतप्रधानांचा करिष्मा निर्णायक आहे, हा संदेश पुरेसा असतो. तो तीनही राज्यात दिला गेला. खास करून मध्य प्रदेशात. या राज्यात काँग्रेसला आघाडीवर राहील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. त्याला कारणंही अनेक होती. मात्र शिवराजसिंग चौहान यांची महिलांना

मदत देणारी 'लाडली बहन' योजना आणि मोदी यांचा झंझावाती प्रचार पक्षाला नुसताच तारणारा ठरला नाही, तर तोन तृतियांश बहुमताकडं घेऊन गेला. हा धक्कादायक निकाल आहे. तसाच धक्का छत्तीसगडमध्येही काँग्रेसला बसला. मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा कारभार काही वाईट नव्हता. त्यांचा संपर्क, जातगणितं बसवण्याचे प्रयत्न, भाजपच्या हिंदुत्ववादी प्रचाराला तोंड देणारी रणनिती यातून तिथं काँग्रेसचं सरकार पुन्हा येईल, हे जवळपास नक्की मानलं जात होतं. मात्र तिथंही भाजपचा प्रचंड विजय झाला. तेव्हा आता भाजपनं रमणसिंग यांच्याकडंच नेतृत्व दिलं पाहिजे, असं नाही. नव्या पिढीचं नेतृत्व घडवण्याच्या नावाखाली या राज्यात भाजपचे नवे प्रयोग सुरू होतील. ते आता होतील किंवा लोकसभा निवडणुकीनंतर होतील. मात्र मोदींच्या हिशेबात बसतील याच बेतान राज्यांच्या पटावर सोंगट्या हलवल्या जातील याची निश्चिती निकालांनी केली आहे. आता भाजपला वसुंधराराजेंच्या लोकप्रियतेपोटी त्यांच्या पक्षश्रेष्ठींना न जुमानणाऱ्या शैलीपुढं मान झुकवलीच पाहिजे असं नाही. शिवराज सिंग याच्या लोकप्रियतेचं ओझं बाळगायचं कारण नाही आणि तीनवेळा सलग राज्य चालवणाऱ्या रमणसिगं यांचा अनुभव आणि प्रशासकीय कौशल्याची पत्रास बाळगायचं कारण नाही. गुजरातमध्ये ज्या प्रमाणं कोण मुख्यमंत्री याला महत्त्वच उरलेलं नाही. बदल तर भाजप श्रेष्ठी म्हणजे मोदी-शहा कधीही करू शकतात. तसंच या राज्यात घडवण्याची वाटचाल सुरू झाली तर आश्चर्य नाही. निकांलांनी आणलेला हा मोठा बदल असेल. असे बदल होतात तेव्हा अर्थातच पक्षांतर्गत मतमतांतरं, व्यक्त होण्याचा अवकाश आणि लोकशाही यांचा अवकाश आक्रसत जातो. नेत्याच्या आवडीनिवडी आणि त्याच्याशी जमवून घेणं हेच गुण बनायला लागतात.

**लोकसभेच्या निवडणुकीत या राज्यात भाजप अव्वलच :**

पाच राज्यांतील निवडणुकातील काँग्रेसच्या अपयाशाला सांत्वन करणारी किनार दिली आहे ती तेलंगणानं. या राज्यात काँग्रेसनं दणदणीत विजय मिळवला आहे. या राज्यातील विजयाचं एक महत्त्व म्हणजे निवडणुकीसाठी आवश्यक साधनांचा एक लक्षणीय स्रोत काँग्रेसला उपलब्ध होतो आहे. हैदराबादवरच्या वर्चस्वापोटी ही साधनं बीआरएस वापरू शकत होता. कर्नाटक पाठोपाठ तेलंगणा जिकल्यानं काँग्रेसची दक्षिण भारतातील स्वीकारार्हता अधोरेखीत झाली आहे. हिंदी भाषक राज्यात जिंकणं ही भाजपची लोकसभेसाठी तिसरी खेप. जिंकण्याचा आत्मविश्वास मिळवण्यासाठी आवश्यक बाब होती. तसंच दक्षिणेत जमेल तितका शिरकाव करणं, हीही भाजपला लोकसभेच्या यशासाठी गरेजची बाब आहे. या दृष्टीकोनातून पाहिलं तर उत्तरेतील तीन राज्यातील भाजप विजयानं काँग्रेसकडून दोन राज्यं गेली हे वास्तव असलं तरी या राज्यातील बुहतेक जागा भाजपनं २०१८ च्या लोकसभा निवडणुकीत जिंकल्याच होत्या. आताच्या विजयानं त्याची पुनरावृत्ती करायचं स्वप्न भाजप पाहू शकतो इतकंच. त्यात नवी भर पडण्याची शक्यता जवळपास नाही. काँग्रेसला या अपयशानं नाऊमेद करणं सहाजिक आहे. मात्र केवळ लोकसभेचा विचार केला तर या राज्यांत काँग्रेसच्या हाती मागच्या खेपेसही काही लागलं नव्हतंच. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमधील ६५ लोकसभा जागांपैकी काँग्रेसला केवळ तीन मिळाल्या होत्या, तर भाजपला ६१. आता विधानसभेला झालं तसंच मतदान प्रत्येक मतदारसंघात झालं तर काँग्रेसला या तीन राज्यात १८ जागा मिळू शकतात. यात नाऊमेद व्हावं असं काय आहे.



**पराभवातून काँग्रेस उभारी घेणार का?**

दुसरीकडं ज्या दक्षिणेतील राज्यात विधानसभांच्या निकालांचा परिणाम लोकसभेवर होण्याची अपेक्षा बाळगता येऊ शकते ती कर्नाटक आणि तेलंगणा ही दोन राज्यं काँग्रेसनं जिंकली आहेत. विधानसभेतील मतांचा आधार घेतला तर तेलंगणात लोकसभेसाठी काँग्रेसला नऊ जागा मिळू शकतात. देशाच्या राजकीय पटाचा विचार करता भाजपनं हिंदी राज्यात कमालीचं यश आधीच मिळवलं आहे. त्यात फार भर पडणं कठिण. दक्षिणेतील भाजपचा प्रवेश कर्नाटक आणि तेलंगणा या दोनही प्रदेशांनी नाकारला आहे. तामिळनाडू, केरळ, आंध्रात भाजपनं अपेक्षा ठेवाव्यात असं काही नाही. याउलट भाजपला पश्चिम बंगाल, बिहार आणि महाराष्ट्रात किंवा अगदी ईशान्य भारतातही मागचं यश राखण्यासाठी झगडावं लागेल. म्हणजेच बहुमताचं गणित जमवण्यासाठी भाजपला आणखी काही करावं लागेल. उत्तरेत थेट भाजपविरोधात लढत आहे तिथं काँग्रेसला बरंच काम कारंव लागेल. हे खंर तसंच उत्तरेतील यश जसंच्या तसं ठेऊन अन्यत्र जागा वाढवायच्या तर भाजपलाही बरीच मेहनत घ्यावी लागले. तेव्हा लोकसभेचा निकाल लागलाच असा थाट अनाठायी आहे. देशाच्या राजकारणाची उत्तर आणि दक्षिण अशी विभागणी होऊ लागली असेल, तर त्याची उत्तरेतील सर्वंकष वर्चस्वातून येणारा लाभ आधीच भाजपच्या पदरात पडला आहे. दक्षिणेत त्याउलट घडण्याचा फटका किती हा लोकसभेसाठी मुद्दा असेल. तसचं निवडणुका झालेल्या राज्यात काँग्रेसच्या मतांची टक्केवारी भाजपच्या जवळपास आहे. मुद्दा काँग्रेस पराभवातून किती झटपट शिकून पुन्हा उभी राहणार, असाच असेल. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# विरोधी पक्षांसाठी पुढचा काळ खडतर आव्हानांचा...

**पाच राज्यातील निवडणुकीत, मध्य भारतातील तीन राज्यातील निवडणुकीतील पराभवामुळे काँग्रेस पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांना धक्का बसला आहे. हीच भावना इंडिया आघाडीतील मित्र पक्षांच्या नेत्यांची आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत भाजपविरुद्ध एकास एक उमेदवार देऊनही विरोधी पक्षांना यश मिळेल काय? आणि हे पक्ष एकत्र राहतील काय? एकंदर विरोधकांसाठी यापुढचा काळ आव्हानांचा आणि आ-पले अस्तित्व टिकवण्याचा तसेच त्यासाठी संघर्ष करण्याचा काळ असेल, असे दिसते...**

प्रमोद दिल्लीकर

सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाचे मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमधील विधानसभा निवडणुकीतल्या विजयासाठी अभिनंदन करायला पाहिजे. कारण, गेल्या काही महिन्यांपासून मध्यप्रदेशातले जनमानस भाजपच्या शिवराजसिंह चौहान सरकारविरोधात गेले असल्याची, तर छत्तीसगडमध्ये जनतेने काँग्रेसच्या भूपेश बघेल सरकारला डोक्यावर घेतल्याचे वातावरण तयार झाले होते. तर, राजस्थानमध्ये काँग्रेसमधील अशोक गेहलोत विरुद्ध सचिन पायलट हा संघर्ष टोकाला पोहोचल्याने हे राज्य भाजपकडे जाऊ शकते यावर सर्वांची बऱ्यापैकी सहमती होती. त्यातूनच, मोदींचा करिष्मा ओसरू लागल्याची मांडणी तयार झाली होती. मतदानानंतर आलेल्या एक्झिट पोलमधूनदेखील कमी अधिक फरकाने तिन्ही राज्यांबद्दल हेच चित्र समोर आले होते. परंतु, फासे उलटे पडले. तिन्ही राज्यांमध्ये काँग्रेसच्या वाट्याला दारुण पराभव आला. मोदींची प्रतिमा, केंद्राच्या योजना, संघाच्या पाठिंब्याच्या आधारे झालेला सुसंघटीत प्रचार आणि या जोडीला अर्थातच धार्मिक ध्रुवीकरणाचे चलनी नाणे या जोरावर भाजपने सहजगत्या विजय मिळवला. आपण जिंकण्यासाठी प्रयत्न करायला हवेत याऐवजी लोकच आता भाजपला हरविणार असल्याने आपला विजय निश्चित आहे, या फाजील आत्मविश्वासात गर्क असलेल्या काँग्रेसला दणका बसला. काँग्रेसला फक्त तेलंगाणामध्ये विजय मिळवता आला. आम्ही दगड जरी उभा केला तरी तो निवडून येईल असे कधीकाळी सांगणाऱ्या काँग्रेस पक्षाचे अस्तित्व हा पक्ष आता उत्तर भारतात हिमाचल प्रदेश सारख्या लहान राज्यात उरले. आता तेलंगाणामध्ये सत्ता आल्याने कर्नाटक आणि तेलंगाणा या दोन राज्यांमुळे काँग्रेसची ताकद आता दक्षिण भारतापुरता मर्यादीत झाल्याचे दिसते आहे. याचा मानसशास्त्रीय दबाव केवळ काँग्रेसवरच नाही तर भाजपला टक्कर देण्यासाठी एकजुटीने उभे राहू पाहणाऱ्या इंडिया आघाडीवरही आहे. कारण, या आघाडीत काँग्रेस हा सर्वात मोठा आणि देशभरात अस्तित्व असलेला पक्ष आहे. या आघाडीतील समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, संयुक्त



जनता दल यासारख्या पक्षांची ताकद अतिशय मर्यादित स्वरुपाची किंबहुना प्रादेशिक स्वरुपाचीच आहे.

**काँग्रेसची मतांची टक्केवारी वाढली :**

राजस्थानच्या निवडणुकीत काँग्रेसने ६९ जागा जिंकताना ३९.५३ टक्के मते मिळवली. २०१८ च्या निवडणुकीमध्ये काँग्रेसने राजस्थानात ३९.३ टक्के मते मिळविली होती. म्हणजे काँग्रेसला ०.२ टक्केच नव्या मतदारांना आकर्षित करता आले. तर भाजपने २०१८ मध्ये मिळालेल्या ३८.७७ टक्के मतांपेक्षा तीन टक्के वाढीव मते मिळविली. भाजपने ४१.६९ टक्के मते मिळवून ११५ जागा खिशात घातल्या आणि सरकार स्थापन केले. मध्यप्रदेशात काँग्रेसला २०१८ आणि २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत अनुक्रमे ४०.९ टक्के मते आणि ४०.४ टक्के मते मिळाली. तर भाजपला मिळालेली मते २०१८ मध्ये ४१.०२ टक्के होती. ती २०२३ मध्ये ४८.५५ टक्के झाली. ही वाढ सात टक्क्यांची आहे. त्यातुलनेमध्ये, छत्तीसगडच्या निवडणुकीत काँग्रेसला २०१८ मध्ये ४३ टक्के मते मिळाली होती. ती २०२३ मध्ये घटून ४२.२३ टक्के झाली. तर भाजपची मते २०१८ मध्ये ३३ टक्के होती ती २०२३ मध्ये १३ टक्क्यांनी वाढून ४६.२७ टक्के झाली. तेलंगाणामध्ये मुख्य मुकाबला काँग्रेस

आणि के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समिती या दोघांमध्ये होता. तर भाजप आणि एमआयएम हे पक्षही लढत होते. तेलंगाणामध्ये काँग्रेसला २०१८ मध्ये २८.४ टक्के मते मिळाली होती. ती २०२३ मध्ये ३९.४० टक्के झाली. भारत राष्ट्र समितीला (आधीच्या तेलंगाणा राष्ट्र समितीला) २०१८ मध्ये ४६.०९ टक्के मते मिळाली. तर २०२३ मध्ये ३७.३५ टक्के मते मिळाली होती. भाजप आणि एमआयएमला २०२३ मध्ये मिळालेली मते १३.९ आणि २.२२ टक्के होती. मतांची ही टक्केवारी पाहिली तर भाजपने सर्व राज्यांमध्ये (मिझोरम यामध्ये गृहित धरलेले नाही) यशस्वीपणे नवे मतदार जोडले. तर काँग्रेसला तेलंगाणा सोडून इतर राज्यांमध्ये नवे मतदार फारसे जोडता आले नाहीत. खरे तर विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप आणि काँग्रेसला मिळालेल्या एकूण मतांमध्ये तब्बल नऊ लाख मतांचा फरक आहे. काँग्रेसला या चार राज्यांमध्ये मिळालेली एकूण मते ४.९० लाख मते मिळाली. तर भाजपला मिळालेली मते ४.८१ लाख आहेत. काँग्रेसच्या मतांची संख्या जास्त असली तरी आमदारांच्या संख्येचा आणि सत्ता असलेल्या राज्यांचा देखील संकोच झाला आहे.




**चिंताजनक आव्हानांची मालिका :**

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, या विधानसभा निवडणुकांकडे २०२४ च्या लोकसभा निवडणुकांची सेमीफायनल म्हणूनही पाहिले जात होते. साहजिकच, सेमीफायनल भाजपने जिंकल्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या फायनलचे आव्हान विरोधकांपुढे आहेत. लोकसभेमध्ये ५४३ पैकी जवळपास निम्म्या जागांवर भाजप विरुद्ध काँग्रेस असाच सामना होणार आहे. २०१९ च्या निवडणुकीत लोकसभेच्या ५४३ पैकी २०९ मतदार संघांमध्ये काँग्रेसच्या उमेदवारांना भाजपकडून ५० हजार आणि त्याहून कमी मतांच्या फरकाने पराभूत व्हावे लागले होते. त्यातील ११९ जागा गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगाना या राज्यातल्या होत्या. त्यात कर्नाटक आणि तेलंगाणा वगळता उर्वरित राज्यांमध्ये काँग्रेस सत्तेपासून दूर आहे. त्यापार्श्वभूमीवर, ज्यापद्धतीचा कौल विधानसभा निवडणुकांमध्ये आला आहे ते पाहता टिना फॅक्टर (देअर इज नो अल्टरनेटिव्ह - मोदींखेरीज दुसरा पर्याय नाही) प्रबळ झाला आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत आम्हाला ७५ जागा मिळाल्या तर ते आमचे अत्यंत मोठे यश ठरेल, ही निकालानंतरची काँग्रेसच्या एका नेत्याची प्रतिक्रिया बोलकी म्हणता येईल.

सोप्या शब्दात सांगायचे झाले तर काँग्रेस पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांसाठी हा धक्का मोठा आहे. हीच भावना काँग्रेससोबत असलेल्या इंडिया आघाडीतल्या मित्रपक्षांचीही झाली आहे. त्यामुळे इंडिया आघाडीतले मित्रपक्ष काँग्रेसच्या लढण्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला तयार आहेत काय?, समजा तसा विश्वास ठेवला आणि भाजपविरुद्ध एकास एक लढत देऊनही विरोधी पक्षांना यश मिळेल काय?, सत्तेसाठी तडजोड अपरिहार्य मानणारे लहान पक्ष या संकटकाळात एकत्र राहतील काय? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. महत्त्वाचे म्हणजे, भाजपसाठी लोकसभेचा मार्ग खरोखरीच सुकर झाल्याचे गृहित धरले तर विरोधकांसाठी यापुढचा काळ आव्हानांचा आणि आपले अस्तित्व टिकविण्याचा आणि त्यासाठी संघर्ष करण्याचा काळ असेल. कारण यातील आव्हाने ही केवळ राजकीय स्वरुपाची नव्हे तर सामाजिक स्वरुपाचीही असतील. एक म्हणजे भाजपने मतदारांचे हिंदूकरण केले असल्याने काँग्रेसने देखील पक्षाला सौम्य हिंदुत्वाचा सहारा घेतला होता. जो अर्थातच मतदारांनी स्वीकारला नाही. काँग्रेससारख्या पक्षाची ही अवस्था असेल तर डावे पक्ष वगळता इतर विरोधी पक्षांना हिंदुत्ववादी राजकारणावर कितपत बोलतील. त्यामध्ये धार्मिक बहुसंख्यांकवाद वाढीस लागण्याची आणि पर्यायाने अल्पसंख्यांकांमध्ये, वंचित घटकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होण्याची भीती आहे. याची चाहूल उत्तर प्रदेशातल्या विधानसभा निवडणुकीत ८० टक्के विरुद्ध २० टक्के या प्रचारातून लागली होती. सर्व समाज घटकांमधील सलोखा आणि परस्पर संवाद हे लोकशाहीचे मुलभूत मूल्य आहे, जे बहुसंख्यांकवादापुढे कोमेजू शकते. आधीच मोदी सरकारला राजकीय विरोधकांशी संवादाचे वावडे राहिले आहे. समन्वय अथवा संवाद न साधता निर्णय रेटून नेणे आणि तसे करण्यातून कणखर नेतृत्व ही प्रतिमा जनमानसात ठसविणे हे भाजपचे वैशिष्ट्य असल्यामुळे अधिक आक्रमकपणे एकतर्फी निर्णय घेतले जातील, मग ते कायद्याच्या स्वरुपातील असो किंवा घटनादुरुस्तीच्या स्वरुपातील असो. याचे प्रमुख आव्हान विरोधकांपुढे असेल.

**प्रचारात महागाई-बेरोजगारीची चर्चा झाली नाही :**

निवडणूक प्रचारामध्ये विरोधकांनी कोणत्या रणनितीचा वापर केला होता. याकडे पाहिले, तर विरोधी पक्षांच्या टिका पंतप्रधान मोदींच्या व्यक्तिगत पातळीवर अधिक होत्या आणि मोदी सरकारच्या धोरणांवरील टिका त्यात कमी होती. मोदी-अदानी संबंध या प्रचाराला माध्यमांमध्ये चांगली प्रसिद्धी मिळत असली तरी मतदारांवर याचा फारसा प्रभाव पडला नाही. भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड हा मुद्दा भाजपने प्रचारात ठेवला होता. अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकाची असो अथवा तिसऱ्या क्रमांकाची होवो महागाई, बेरोजगारीचा प्रश्न कायम असताना त्याची चर्चा निवडणुकीत फारशी झाली नव्हती. चर्चा झाली ती ८१ कोटी लोकांना पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेतून मोफत पाच किलो प्रतिव्यक्ती धान्य देण्याच्या घोषणेची. आता हे मोफत धान्य पाच वर्षे मिळणार आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, की देशात ८१ कोटी लोकांना सरकारने मोफत अन्न पुरवले नाही तर त्यांना खायला मिळणार नाही. सामाजिक न्यायासाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या जातनिहाय जनगणनेचा मुद्दा विरोधी

पक्षांनी निवडणुकांमध्ये लावून धरला होता. यापुढेही ते लावून धरतील देखील.परंतु तो मतदारांच्या हिंदूकरणाच्या लाटेत प्रभावी राहील काय, आणि ओबीसी केंद्रीत राजकारण करणाऱ्या पक्षांचा प्रभाव पुसण्यासाठी, आरक्षणातील वर्गीकरणाचा पर्याय सुचविणाऱ्या रोहिणी आयोगाचा अहवाल सरकारने स्वीकारला तर पुढे काय होणार हे प्रश्नदेखील विरोधी पक्षांपुढे असतील.

सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शन योजनेची मागणी जोरकसपणे लावून धरली होती. काँग्रेसची सत्ता राजस्थानात असताना जुन्या पेन्शन योजनेला पाठिंबा मिळाला होता. तत्कालिन गेहलोत सरकारने अर्थसंकल्पात या योजनेला मान्यता दिल्यानंतर पंजाब, दिल्ली, तामिळनाडू, झारखंड, छत्तीसगड, तेलंगाणा, बिहार यासारख्या राज्यांनी जुन्या पेन्शन योजनेची री ओढली होती. या मुद्द्यावरील सरकारी कर्मचाऱ्यांचा रोष निवडणुकांमध्ये भाजपला महागात पडेल असा कयास होता. परंतु तसे काही झाले नाही. त्यामुळे हा विषय महत्त्वाचा असला तरी देखील तो किती काळ चालेल हा प्रश्न उरतोच. शिवाय, अयोध्येतील राम मंदिरानंतर काशी, मथुरा बाकी है ची घोषणा भाजपने गुंडाळून ठेवलेली नाही. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये राज्यपालांची कामगिरी ही संघर्षाचे कारण ठरली आहे. तामिळनाडू, पंजाब, पश्चिम बंगाल, केरळ, झारखंड आणि दिल्ली ही राज्ये त्याची उदाहरणे राहीली आहेत. या राज्यांमध्ये स्थानिक सरकार विरुद्ध राज्यपाल असे वाद सातत्याने दिसून आले होते. दिल्लीमधील आम आदमी पक्षाचे सरकार आणि नायब राज्यपाल यांच्यातही वादाच्या फैरी बऱ्याचदा झडल्या आहेत. या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारांच्या संघर्षाची तीव्रता आगामी काळात आणखी वाढली तर आश्चर्य वाटू नये.

**इंडिया आघाडीत समन्वयाची गरज :**

ही सर्व आव्हाने समोर असल्याने विरोधी पक्षांना एकत्र राहण्याशिवाय आणि एकजुटीने लढण्याशिवाय पर्याय नाही. तरी देखील विरोधकांच्या इंडिया आघाडीमध्ये एकवाक्यता आहे हा संदेश नेमका समोर आलेला नाही. इंडिया आघाडीची शेवटची बैठक १ सप्टेंबर २०२३ रोजी झाली होती. त्यात लोकसभा निवडणुकीसाठी जागा वाटप हा मुद्दा अग्रक्रमावर ठेवण्यात आला होता. त्याखालोखाल संयुक्त सभा, पत्रकार परिषदा यासारख्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. यातला जागावाटप हा कळीचा मुद्दा पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीपर्यंत पुढे ढकलण्यात आला. एवढेच नव्हे तर मध्यप्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये संधी असूनही इंडिया आघाडी एकजुटीने लढत असल्याचा संदेश काँग्रेस आणि मित्रपक्षांना देता आला नाही. कारण, काँग्रेसने मध्यप्रदेशात समाजवादी पक्ष, संयुक्त जनता दल यासारख्या पक्षांना एकही जागा सोडण्यास नकार दिला होता. एवढेच नव्हे तर, इंडिया आघाडीची संयुक्त सभा भोपाळमध्ये घेण्याचा प्रस्तावालाही केराची टोपली दाखविली होती. यातून ऐक्यावर जो काय व्हायचा तो परिणाम झालाच. एका अध्ययनानुसार काँग्रेसने मित्रपक्षांना सोबत न घेतल्यामुळे राजस्थानात ३० जागांचे नुकसान झाले. काँग्रेसच्या या वर्तनामुळे मित्रपक्षांनी जाहीरपणे निराशा व्यक्त केली होती. आता कुठे पराभवानंतर काँग्रेसने पुन्हा इंडिया आघाडीवर लक्ष केंद्रीत केले आहे. आता आवश्यकता आहे ती योग्य समन्वयाची. ती जबाबदारी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना पार पाडावी लागणार, असे दिसते आहे. ●●●

**(लेखक दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट



www.peoplespost.in

डिजीटल स्वरुपात!

नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय दैनंदिन विषयांवर नामवंत साहित्यिक, लेखक, विचारवंत यांचे भाष्य!

# लोकसभेच्या रणसंग्रामाची पूर्वतयारी!



सुरेश भटेवरा

**पाच राज्यांच्या निवडणुका या लोकसभेच्या सेमी फायनल आहेत, अशी चर्चा प्रसार माध्यमांनी व्यापक प्रमाणात घडवली असली, तरी भारतात प्रत्येक निवडणूक वेगळी असते, हे लक्षात घ्यावे लागते. काँग्रेसला या पाचपैकी तीन राज्यात सत्ता येईल, असे वाटत होते. त्यांचा पराभव झाला असला, तरी काँग्रेसचा परफॉरमन्स अगदी वाईट होता, असेही म्हणता येणार नाही. आता काँग्रेसने अधिक जिद्दीने इंडिया आघाडीला मजबूत करून जोमाने चढाई करण्याची गरज आहे.**

राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोरम या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल रविवारी लागले. मतदान होण्याआधी सलग दोन महिने, मध्यप्रदेश, छत्तिसगड आणि काही प्रमाणात तेलंगणात, काँग्रेसच्या विजयाचे स्पष्ट संकेत प्राप्त होत होते. राजस्थानात उभय पक्षात चुरशीची लढत आहे, असे मानले जात होते. तथापि, निकालाच्या पूर्वसंध्येला एक्झिट पोलच्या अंदाजांचे कल भलत्याच दिशेने वळले. कोणीही सहजासहजी ते मान्य करायला तयार नव्हते. प्रत्यक्ष निकालात हिंदी भाषक 'गाय पट्ट्यात', तीनही राज्यांची सत्ता भाजपने काबीज केली. सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. दक्षिणेत कर्नाटकाच्या विजयापाठोपाठ तेलंगणात (केसीआर यांच्या भारत राष्ट्र समितीचा पराभव करीत) आणखी एक राज्य काँग्रेसने जिंकले. ईशान्येकडे सीमावर्ती मिझोरम राज्यात (एनडीएचा घटक पक्ष) मिझो नेशनल फ्रंट (एमएनफ) ने सत्ता गमावली. ४० सदस्यांच्या विधानसभेत झोरम पीपल्स मुव्हमेंट (झेडपीएम) ने २७ जागा जिंकल्या आणि स्वबळावर बहुमत मिळवले.



लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२४ च्या एप्रिल महिन्यात आहेत. त्यापूर्वी संपन्न झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांना अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले होते. निवडणूक निकालांकडे साऱ्या देशाचे लक्ष होते. भाजपने सर्व राज्यात मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार घोषित करण्याचे टाळले. त्याऐवजी थेट पंतप्रधान मोदींचा चेहरा मतदारांपुढे सादर केला. काँग्रेसने अधिकृतरित्या मुख्यमंत्रिपदाच्या दावेदारांची घोषणा केली नसली, तरीही राजस्थानात अशोक गहलोत, मध्यप्रदेशात कमलनाथ, छत्तीसगडात भूपेश बघेल, तेलंगणात रेवंथ रेड्डी हेच प्रमुख दावेदार आहेत, याची मतदारांसह सर्वांनाच कल्पना होती. उभय प्रतिस्पर्धी पक्षांनी आपापल्या प्रचार मोहिमा अत्यंत कसोशीने राबवल्या. अंततः काहीसे अनपेक्षित निकाल सामोरे आले.

**केसीआरच्या एकाधिकारशाहीला धक्का :**

या निवडणुकीत काँग्रेसचे भवितव्य नेमके काय? असा प्रश्न दोन महिन्यांपूर्वी कोणी विचारला असता तर काँग्रेसच्या विजयाची सर्वाधिक शक्यता छत्तीसगडमधे आणि सर्वात कमी तेलंगणात, असे उत्तर साधारणतः सामोरे आले असते. तथापि, निवडणूक प्रचाराचा ज्वर जसजसा वाढत गेला, प्रचाराच्या अंतिम टप्प्यात नाट्यपूर्ण परिवर्तन घडत गेले आणि काँग्रेस सत्तेत येण्याची सर्वाधिक प्रबळ शक्यता तेलंगणात आहे, असे चित्र दिसू लागले. गेल्या निवडणुकीत

चंद्रशेखर राव यांच्या तत्कालीन (टीआरएस) आणि आताच्या बीआरएसने ४२ टक्के मते प्राप्त केली होती. ११९ पैकी ८८ जागा या पक्षाने मिळवल्या होत्या. काँग्रेसला मात्र २८ टक्के मते आणि अवघ्या १९ जागा मिळाल्या होत्या. दोन पक्षात जवळपास १४ टक्के मताधिक्क्याचे अंतर होते. यंदा काँग्रेस ते पार करू शकेल, यावर कोणाचाही विश्वास नव्हता. तेलंगणाच्या सत्तेत केसीआर सलग १० वर्षे होते. शेतकऱ्यांसाठी रयतू बंधू, दलितांसाठी दलित बंधू अशा प्रमुख योजनांसह अनेक लोकप्रिय योजना त्यांनी राबवल्या. तथापि, सरकार विरुद्ध घराणेशाही आणि भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले.





**केसीआर–भाजप युतीला नाकारले :**

रयतू बंधू योजनेचा सर्वाधिक लाभ मुख्यत्वे मोठ्या शेतकऱ्यांनी उठवला. अल्पभूधारक शेतकरी त्यामुळे नाराज होते. दलित बंधू योजनेत स्थानिक आमदारांनी घोटाळे केल्याचे आरोप झाले. केसीआर यांचा मुलगा, मुलगी, भाचा असा सारा कौटुंबिक गोतावळा, सत्तेच्या केंद्रस्थानी घरातच एकवटला होता. याखेरीज राष्ट्रीय राजकारणात भूमिका वठवण्याची केसीआर यांची प्रबळ महत्वाकांक्षा होती. राज्य कारभारावरची पकड त्यामुळे सुटत गेली. अनेक अधिकार प्राप्त झालेले आमदार उन्मत्त झाले. संसदेत भाजपच्या प्रत्येक अडचणीच्या प्रसंगाला बीआरएस ठामपणे मदतीला उभा राहिला. तो एनडीएचा घटक पक्ष नसूनही, भाजपशी त्याची निकटता स्पष्टपणे दिसू लागली. बदल्यात केसीआर आणि त्यांच्या कन्येवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांना, मोदी सरकारने शीतगृहात टाकले. भाजप आणि बीआरएसची ही अभद्र युती तेलंगणाच्या मतदारांना अजिबात पसंत नव्हती. दुसरीकडे रेवंथ रेड्डीच्या रुपात, काँग्रेसला अचानक एक आक्रमक नेता गवसला होता. गगनभेदी भाषणे करीत, केसीआरच्या विरोधात सारे राज्य त्याने पिंजून काढले. राहुल आणि प्रियांका गांधींच्या सभांमधे लक्षावधी लोकांचे जत्थे जमू लागले. तेलंगणाचे जनमत काँग्रेसच्या दिशेने झपाट्याने वळते आहे, असे चित्र दिसताच, कर्नाटकच्या काँग्रेस नेत्यांच्या मदतीचा हात, भक्कमपणे रेड्डींच्या पाठीशी उभा राहिला. सुरुवातीला आक्रमक वाटणाऱ्या भाजपने ही निवडणूक अचानक बीआरएस साठी जणू सोडून दिली. केसीआर सत्तेत आले तर अंतत: त्यांच्याशी हातमिळवणी करायची आणि हा प्रादेशिक पक्ष आपल्या दावणीला बांधायचा, असा भाजपचा मनसुबा होता. तेलंगणाच्या निकालांनी मात्र सर्वांचेच अंदाज चुकवले. काँग्रेसच्या मतांमध्ये १४ टक्क्यांची घसघशीत वाढ झाली, जी नि:संशय अभूतपूर्व होती. काँग्रेसला ६४ जागांसह निर्विवाद बहुमत प्राप्त झाले. सत्ताधारी बीआरएसला ३९ जागा मिळाल्या. भाजपला अवघ्या आठ जागांवर समाधान मानावे लागले. कर्नाटकनंतर आणखी एक महत्वाचे राज्य काँग्रेसच्या पदरात पडल्यामुळे, दक्षिण भारतातले भाजपचे बस्तान बऱ्यापैकी ओसरले. एकप्रकारे दक्षिणेतील मतदारांनी भाजपला जणू हद्दपार केले.

**राजस्थानात काँग्रेसला अनपेक्षित धक्का :**

राजस्थानचा गेल्या तीस वर्षांचा इतिहास पाहिला तर दर पाच वर्षांनी भाजप आणि काँग्रेस या दोन पक्षांच्या हाती, इथले मतदार आळीपाळीने सत्ता सोपवतात. प्रत्येक निवडणुकीत इथे हमखास सत्ता परिवर्तन घडते. जानेवारी २०२३ च्या सुमारास, राजस्थानात अशी स्थिती होती की वर्षअखेरीला होणाऱ्या निवडणुकीत, गहलोतांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसला २५ देखील जागा मिळणार नाहीत, असे लोक बोलायचे. मात्र अवघ्या दहा महिन्यांच्या कालावधीत, मुख्यमंत्री गहलोतांनी प्रचंड मेहनतीने अशा काही लक्ष्यवेधी योजना राज्यात राबवल्या, की राजस्थानात काँग्रेस पुन्हा सत्तेत येवू शकते, अशी शक्यता सर्वांनाच जाणवायला लागली. त्या तुलनेत भाजपची अवस्था अत्यंत विखुरलेली होती. माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजेंवर पंतप्रधान मोदींचा अजिबात विश्वास नव्हता. राजेंना शह देण्यासाठी त्यांनी काही केंद्रीय मंत्री आणि विद्यमान खासदार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. राज्यात भाजपची सत्ता आली तर मुख्यमंत्रीपदाच्या दावेदार राजे यांना हमखास बदलणार, याचे संकेत नरेंद्र मोदी, अमित शाह आणि पक्षाध्यक्ष नड्डा यांनी वारंवार दिले होते. कारण मोदींना आपल्या स्वतःच्याच प्रतिमेचे वर्चस्व या राज्यात निर्माण करायचे होते. जाहीर सभेत राजेंचा नामोल्लेख टाळणे, प्रचार मोहिमेची सूत्रे त्यांच्याकडे न सोपवणे, असे अनेक अपमानजनक प्रयोग, या काळात या तिघांनी राजेंवर केले. दरम्यान, पक्षाच्या सर्वेक्षणानुसार राजस्थानात भाजपकडे वसुंधरा राजे याच एकमेव लोकप्रिय नेत्या आहेत, त्यांच्याशिवाय पर्याय नाही, असे स्पष्ट झाले. मग मोदी आणि शहा यांना पडते घ्यावे लागले. तिसऱ्या यादीत राजे समर्थक ४० आमदारांना पुन्हा उमेदवारी द्यावी लागली. रणमैदानात तरीही काँग्रेसचे पारडे जडच होते. मतदारांमध्ये गहलोतांची व्यक्तिगत प्रतिमा अतिशय चांगली होती. सरकार विरुद्ध ANTI INCUMBANCY नव्हती. गहलोतांनी चांगले काम केले आहे असे बहुसंख्य मतदार उघडपणे मान्य करीत होते. चिरंजीवी योजने द्वारा ५० लाखांपर्यंतचा आरोग्य विमा, जुनी पेन्शन योजना, सर्वांसाठी इंग्रजी माध्यमाच्या सरकारी शाळा, अशा काँग्रेसच्या ७ प्रमुख योजना, लोकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचल्या होत्या. गहलोत आणि सचिन पायलट यांच्यातील मतभेद मिटवण्यात काँग्रेस अध्यक्षांना यश

आल्यामुळे, तो विषय निवडणुकीत मागे पडला होता. सरकारविषयी लोकमत चांगले होते. तरीही काँग्रेसच्या काही आमदारांबाबत त्यांच्या मतदारसंघात मात्र नाराजी होती. स्पर्धा परीक्षांचे पेपर लीक प्रकरणही चर्चेत होते. दुसरीकडे भाजपने धार्मिक विद्वेष पसरविणाऱ्या जाहिरातींद्वारे आपल्या प्रचारात निकृष्ठ पातळी गाठली होती. तिजारा सारखे निवडक मतदारसंघ वगळता, हिंदू मुस्लिम मतदारांचे धार्मिक धृविकरण करण्यात भाजपला फारसे यश मिळाले नाही. यंदाची निवडणूक अटीतटीची आहे, सर्वांनाच याची कल्पना होती. तरीही भाजपच्या ११५ च्या तुलनेत काँग्रेसचे संख्याबळ ६९ पर्यंत खाली घसरेल, हे सर्वांना अनपेक्षितच होते.



**'लाडली बहेना'ने तारले :**

मध्यप्रदेशची निवडणूक यंदा काँग्रेस सहज जिंकेल, असे वातावरण दोन महिन्यांपूर्वी होते. कारण भाजपच्या १८ वर्षांच्या प्रदीर्घ सत्तेला लोक कंटाळले आहेत, अशी जनमानसात धारणा होती. भाजपची सत्ता राज्यात २००३ पासून आहे. (काँग्रेसच्या कमलनाथ सरकारचा १७ महिन्यांचा कालखंड वगळता) शिवराजसिंग चौहान २००५ पासून २०२३ पर्यंत मुख्यमंत्रीपदी सलगपणे विराजमान आहेत. तरीही यंदा भाजपने मुख्यमंत्रीपदाचा चेहरा इथेही घोषित केला नाही.

भाजपच्या पदाधिकाऱ्याने मध्यंतरी आदिवासी मुलाच्या चेहऱ्यावर लघवी केल्याची घटना घडली. एका व्हिडीओद्वारे ती सर्वांसमोर आली. मध्यप्रदेशात आदिवासींवर गेल्या १८ वर्षात अनेक अत्याचार झाल्याचे आरोपही आहेत. सरकारी नोकऱ्यांमध्ये ५२ जणांचे बळी घेणाऱ्या व्यापम घोटाळ्यांसह राज्य सरकारवर भ्रष्टाचाराचे विविध आरोप आहेत. पुरेसा हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी सरकारवर नाराज होते. २०१८ सालच्या निवडणुकीत, मतदारांनी राज्याची सत्ता काँग्रेसकडे सोपवली होती. पण धनशक्ती आणि सक्तवसुली संचालनालयाच्या दहशतीच्या जोरावर, भाजपने काँग्रेसचे आमदार फोडले. ज्योतिरादित्य शिंदेसह त्यांचा गट भाजपमधे सामील झाला. राज्यात भाजपने बळजबरीने सत्ता स्थापन केली, त्याचा संताप लोकांच्या मनात होताच. याखेरीज मोदी आणि शिवराजसिंह यांच्यात दीर्घ काळापासून वैमनस्य अथवा दुरावा असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. यंदा या पार्श्वभूमीवर सत्तेत परिवर्तन घडेल; मध्यप्रदेशची सत्ता हमखास काँग्रेसच्या हाती पुन्हा येईल, असे वातावरण सर्वत्र दिसत होते.

तरीही प्रचाराच्या अंतिम टप्प्यात आणि निकालानंतर, महिलांना दरमहा १२५० रुपये देणारी शिवराजसिंह चौहान यांची 'लाडली बहेना' योजना अतिशय लोकप्रिय ठरल्यामुळेच ८० टक्के महिला मतदारांचा पाठिंबा भाजपला मिळाला, असा प्रचार जाणीवपूर्वक घडवण्यात आला. मोदींच्या दृष्टीने खर तर ही 'रेवडी' योजना. पण निवडणुकीत जर ती इतकी परिणामकारक ठरू शकते तर राजस्थानात सर्व समाज घटकांचा समावेश असलेल्या, गहलोत यांच्या सात हमी योजनांचा दृश्य परिणाम मतदानात का दिसत नाही? याचे तर्कशुद्ध उत्तर कोणाकडेही नाही. मध्यप्रदेशचे निकाल अगदीच अनपेक्षित लागले. भाजपला घसघशीत १६४ जागा आणि दोन तृतीयांश बहुमत प्राप्त झाले. काँग्रेसला अवघ्या ६५ जागा मिळाल्या. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात भाजपने नेमकी कोणती कलाकुसर केली? मतदानात इतके व्यापक बदल कशामुळे घडले? याबद्दल सर्वांनाच आश्चर्य वाटते आहे. निकालानंतरच्या मंथनाद्वारे आता कमलनाथ यांचा अतिआत्मविश्वास व उद्दामपणा काँग्रेसला नडला. काँग्रेस सत्तेवर येणारच आहे या घमेंडीत कमलनाथ आणि दिग्विजयसिंग या जोडगोळीने ३५/४० मतदारसंघात, चुकीच्या उमेदवारांना तिकिटे वाटली. निवडून येण्याची शक्यता असलेल्या तरुण आणि ज्येष्ठ उमेदवारांना डावलले. निवडणुकीच्या व्युव्हरचनेबाबत दोघांनाही योग्य समन्वय साधता आला नाही, अशी चर्चा कानावर येते आहे. तरीही निकालातल्या प्रचंड तफावतीच्या वास्तवाची ही कारणे सहजासहजी पटत नाहीत.

**आदिवासींनी काँग्रेसला टाळले :**

छत्तीसगडचे कथानक तर अधिक धक्कादायक आहे. काँग्रेसचे भूपेश बघेल सरकार राज्यात पुन्हा हमखास सत्तेवर येईल, असे भाकीत वृत्तवाहिन्यांचे तमाम विश्लेषक, निवडणुकीच्या रणमैदानात प्रत्यक्ष हिंडणारे असंख्य पत्रकार, बहुतांश सर्वेक्षणांचे निष्कर्ष, गेल्या दोन महिन्यांपासून सातत्याने व्यक्त होत होते. मोदी व अमित शहांच्या प्रचार सभांना फारसे लोक जमत नव्हते. भाजपच्या प्रचार यंत्रणेने काँग्रेसपुढे जणू शरणागती पत्करली होती. देशात बूथ स्तरापर्यंत काँग्रेसची मजबूत संघटनात्मक बांधणी उभारण्यात, फक्त भूपेश बघेल देशात यशस्वी ठरले होते. पंतप्रधान मोदींना थेट आव्हान देण्याचे धाडसही बघेल यांनीच वारंवार दाखवले होते. राज्यात शेतमालाला योग्य हमीभाव देणे, अनेक लोककल्याणकारी योजना यशस्वीपणे राबवणे, याचे श्रेय उघडपणे इथले मतदार बघेल यांनाच देत होते. काँग्रेस राजवटीत एका यशस्वी राज्याचे चित्र लोकांसमोर उभे राहिले. काही शहरी भाग वगळता, छत्तीसगडमधे भाजपची अवस्था अतिशय केविलवाणी होती. काँग्रेसच्या तुलनेत भाजपची संघटनात्मक स्थिती कमजोर असल्याचे बोलले जात होते. (उर्वरित पान २२ वर..)

# कोणत्या समाजाने कुणास केले मतदान!

देशातील पाच राज्यांमध्ये मतदान संपल्यानंतर वेगवेगळ्या संस्थांनी एक्झिट पोलचे अंदाज व्यक्त केले. काही संस्थांचे अंदाज बऱ्यापैकी जुळले तर काहींचे अंदाज सपशेल खोटे ठरले. मतदारांनी मतांच्या आधारे आपले उमेदवार नि राजकीय पक्षांना असलेला पाठिंबा व्यक्त केला. मध्य भारताने काँग्रेसची साथ सोडून केवळ भाजपला जवळ केल्याचं बोललं जातंय. कारण मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळालंय. हा मजकूर लिहिपर्यंत मतदानाचे सूक्ष्म आकडे मिळाले नव्हते. पण एक्झिट पोल केलेल्या संस्थांनी मात्र कोणत्या समाजानं कोणत्या राजकीय पक्षाला मतदान केलं, याचा अंदाज व्यक्त केला. त्यावरून कोणत्या राजकीय पक्षाचा कोणता समाज मतदार आहे, असे स्पष्ट करण्यास मदत होऊ शकते. त्याबाबतची माहिती अशी –

## राजकीय पक्षांना झालेल्या मतदानाची संभाव्य टक्केवारी

**राजस्थान :**

| समाज | भाजप | काँग्रेस |
|---|---|---|
| १) ब्राह्मण | ५३ | २६ |
| २) राजपूत | ४७ | २९ |
| ३) अनुसूचित जाती | ५८ | ३६ |
| ४) अनुसूचित जमाती | ३६ | ४६ |
| ५) मुस्लिम | ०७ | ८३ |
| ६) ओबीसी | २८ | ४८ |

**मध्यप्रदेश :**

| समाज | भाजप | काँग्रेस |
|---|---|---|
| १) ब्राह्मण | ५४ | २८ |
| २) राजपूत | ४७ | ३८ |
| ३) अनुसूचित जाती | ४५ | ४१ |
| ४) अनुसूचित जमाती | ४६ | ३९ |
| ५) मुस्लिम | ०८ | ८४ |
| ६) ओबीसी | ४७ | ३१ |

**छत्तीसगढ :**

| समाज | भाजप | काँग्रेस |
|---|---|---|
| १) अनुसूचित जाती | ३७ | ५४ |
| २) अनुसूचित जमाती | ३८ | ५१ |
| ३) ओबीसी | ४० | ४२ |

**तेलंगणा :**

| समाज | भाजप | काँग्रेस | बीआरएस |
|---|---|---|---|
| १) उच्च जातीय | २० | ३६ | ३३ |
| २) अनुसूचित जाती | ०८ | ४९ | ३५ |
| ३) अनुसूचित जमाती | ०९ | ४४ | ३६ |
| ४) मुस्लिम | ०३ | ४३ | ४२ |
| ५) ओबीसी | १८ | ३७ | ३४ |

## पक्षनिहाय प्राप्त जागा : डिसेंबर – २०२३ निवडणूक

**● मध्यप्रदेश**
भाजप – १६३
काँग्रेस – ६६
इतर – ०१
**जागा–२३०**
**बहुमत–११६**

**● राजस्थान**
भाजप – ११५
काँग्रेस– ६९
इतर – १५
**जागा–१९९**
**बहुमत–१००**

**● छत्तीसगढ**
भाजप – ५४
काँग्रेस – ३५
इतर – ०१
**जागा –९०**
**बहुमत –४६**

**● तेलंगणा**
भाजप – ०८
काँग्रेस – ६४
बीआरएस – ३९
एमआयएम – ०७
सीपीआय – १
**जागा– ११९ बहुमत–६०**

**● मिझोराम :**
जेडपीएम – २७ (+१९)
एमएनएफ – १० (–१८)
भाजप – ०२ (+१)
काँग्रेस – ०१ (–४)
**एकूण जागा – ४०, बहुमत – २१**
- झोराम पीपल्स मुव्हमेंट (जेडपीएम)
- मिझोनॅशनल फ्रंट (एमएनएफ)

### हेही वाचा :

- **देशात २८ राज्ये, ८ केंद्रशासित प्रदेश.**
- २०१७ मध्ये भाजपशासित आणि मित्रपक्षांची मिळून देशाच्या ७८ टक्के भूभागावर सत्ता होती, तर ६९ टक्के लोकसंख्येवर ते राज्य करत होते. तर विरोधी पक्षाची २२ टक्के भूभागावर आणि ३१ टक्के लोकसंख्येवर सत्ता होती.

### काँग्रेसच्या ताब्यातील ३ राज्ये :

१) हिमाचल २) कर्नाटक ३) तेलंगणा

**काँग्रेसची मित्र पक्षांसोबत असलेली राज्ये :**

१) झारखंड : जेएमएम+काँग्रेस+आरजेडी+एनसीपी(एपी)+सीपीआय(एमएल)एल.

२) बिहार : जेडीयू+आरजेडी+काँग्रेस+सीपीआय(एमएल)एल+सीपीआय(एम)+सीपीआय.

### मित्रपक्षांसोबत भाजपची सत्ता असलेली राज्ये :

- पूर्व भारतातील मेघालय, नागालँड आणि सिक्कीममध्ये भाजपची मित्र पक्षांसोबत सरकारं आहेत. तसेच महाराष्ट्रातही भाजपचे शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटासोबत आघाडी सरकार आहे.

### विरोधी पक्षाची सरकारे असलेली राज्ये :

१) आंध्र प्रदेश – वायएसआरसीपी
२) दिल्ली – आप ३) पंजाब – आप
४) केरळ – सीपीआय (एम) ५) ओरिसा – बीजेडी
६) पश्चिम बंगाल– तृणमूल काँग्रेस
७) तामिळनाडू – डीएमके+काँग्रेस+व्हीसीके+सपीआय+सीपीआय (एम).

### भाजपच्या ताब्यातील १२ राज्ये :

१) उत्तर प्रदेश २) गुजरात ३) उत्तराखंड
४) हरियाणा ५) गोवा ६) आसाम
७) त्रिपुरा ८) मणिपूर ९) अरूणाचल प्रदेश
१०) मध्यप्रदेश ११) राजस्थान १२) छत्तीसगढ



- सध्या डिसेंबर २०२३ मध्ये देशात भाजपची ५८ टक्के भूप्रदेशावर सत्ता आहे, तर ५७ टक्के लोकसंख्येवर ज्यांचे राज्य आहे. विरोधी पक्षांची सत्ता ४१ टक्के भूभागावर आहे, तर ४३ टक्के लोकसंख्येवर विरोधकांची सत्ता आहे.
- ३ डिसेंबर २०२३ रोजी निकाल लागलेल्या मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ आणि तेलंगणात लोकसभेच्या ८२ जागा आहेत. तर हिंदी पट्ट्यातील मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढ या तीन राज्यात लोकसभेच्या ६५ जागा आहेत. या ६५ पैकी ६२ जागा भाजपच्या ताब्यात आहेत, तर ३ काँग्रेसच्या. यापूर्वी छत्तीसगढ, राजस्थानात काँग्रेसची सत्ता असताना काँग्रेसला या राज्यातून लोकसभेच्या जादा जागा मिळाल्या नाहीत.
- या पाच राज्यातील निवडणुकीनंतर आप हा पक्ष तिसरा सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरला आहे.

# विधानसभा निवडणूक – २०१८ मधील पक्षनिहाय प्राप्त जागा

| मध्यप्रदेश : एकूण जागा – २३० | | | | |
|---|---|---|---|---|
| राजकीय पक्ष | विजयी उमेदवार | एकूण मतांची टक्केवारी | पक्षनिहाय मतांची टक्केवारी | |
| १) काँग्रेस | ११४ | – ४१ टक्के | | |
| २) भाजप | १०९ | ८ टक्के वाढ | | |
| ३) बीएसपी | ०२ | ४१ टक्के घट | | |
| ४) सपा | ०१ | | | |
| ५) अपक्ष | ०४ | | | |

विधानसभा मतदारसंघ – १) जनरल–१४८, एससी–३५, एसटी–४७

| राजस्थान : | | | | |
|---|---|---|---|---|
| पक्ष | प्राप्त जागा | मतांची टक्केवारी | वाढ/घट | प्राप्त मते |
| काँग्रेस | १०० | ३९.३० | ६.२८ वाढ | १३,९३५,२०१ |
| बीजेपी | ७३ | ३८.८ | ६.३७ घट | १३,७५७,५०२ |
| बसपा | ०६ | ०.६३ | | |
| अपक्ष | १३ | १.२९ | | |

**राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्ष – ०३ – १२.४ टक्के, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया – ०२ – १.२ टक्के, भारतीय ट्रायबल पार्टी – ०२ – ०.७ टक्के, राष्ट्रीय लोकदल – ०१ – ०.३ टक्के.**

| छत्तीसगढ : एकूण जागा – ९० | | | | |
|---|---|---|---|---|
| पक्ष | प्राप्त जागा | मतांची टक्केवारी | वाढ/घट (जागा) | प्राप्त मते |
| काँग्रेस | ६८ | ४३ | २९ वाढ | ६१४३८८० |
| भाजप | १५ | ३३ | ३४ घट | ४७०६८३० |
| जेसीसी | ०५ | ७.६ | ---- | १०८६५१४ |
| बसपा | ०२ | ३.९ | | |
| | | | | |

| तेलंगणा : एकूण जागा – ११९ | | | | |
|---|---|---|---|---|
| पक्ष | प्राप्त जागा | मतांची टक्केवारी | प्राप्त मते | |
| काँग्रेस | १९ | २८.४ | ५८८३१११ | |
| बीआरएस | ८८ | ४६.९ | ९७००४७९ | |
| एमआयएम | ०७ | २.७ | ------ | |
| भाजप | ०१ | ६.९८ | ------ | |
| तेलगू देसम पार्टी | ०२ | २.५१ | ------ | |
| भाकप | ०१ | २.५१ | ------ | |
| अपक्ष | | ०१ | --- | ------- |

| मिझोराम : एकूण जागा – ४० | | | | |
|---|---|---|---|---|
| पक्ष | प्राप्त जागा | | | |
| काँग्रेस | ०५ | | | |
| भाजप | ०१ | | | |
| एमएनएफ | २६ | | | |
| अन्य | ०८ | | | |





# पाच राज्यातील विधानसभा निवडणूक : डिसेंबर – २०२३ – एक्झिट पोलचे अंदाज

| मध्यप्रदेश : एकूण जागा – २३० बहुमतासाठी ११६ ची गरज | | | |
|---|---|---|---|
| राजकीय पक्ष | भाजप | काँग्रेस | इतर |
| २०१८ तील प्राप्त जागा | १०९ | ११४ | ०७ |
| १) इंडिया टुडे–ॲक्सीस | १४०–१६२ | ६८–९० | ०३ |
| २) रिपब्लिक मॅट्रीझ | ११८–१३० | ९८–१०७ | ०२ |
| ३) एबीपी–सी वोटर | ८८–११२ | ११३–११७ | २–८ |
| ४) टीव्ही–९–पोल स्ट्रीट | १०६–११६ | १११–१२१ | ०६ |
| ५) टाईम्स नाऊ–ईटीजी | १०५–११७ | १०९–१२५ | १३–२१ |
| ६) जन की बात | १००–१२३ | १०२–१२५ | ०५ |
| ७) न्यूज२४–चाणक्य | १३९–१६३ | ६२–८६ | १–९ |

| राज्यस्थान : एकूण जागा – १९९ बहुमतासाठी १०० ची गरज | | | |
|---|---|---|---|
| राजकीय पक्ष | भाजप | काँग्रेस | इतर |
| २०१८ तील प्राप्त जागा | ७३ | १०० | २७ |
| १) इंडिया टुडे–ॲक्सीस | ८०–१०० | ८६–१०६ | ९–८ |
| २) एबीपी–सी वोटर | ९४–११४ | ७१–९१ | ९–१९ |
| ३) जन की बात | १००–१२२ | ६२–८५ | १४–१५ |
| ४) टाईम्स नाऊ–ईटीजी | ५६–७२ | १०८–१२८ | १३–२१ |
| ५) न्यूज २४–चाणक्य | १०१–१७७ | ८९–११३ | ८–१५ |
| ६) टीव्ही–९–पोल स्ट्रीट | १००–११० | ९०–१०० | १–१५ |
| ७) रिपब्लिक मॅट्रीझ | ११८–१३० | ९७–१०७ | ०२ |

| छत्तीसगढ : एकूण जागा – ९० बहुमतासाठी ४६ ची गरज | | | |
|---|---|---|---|
| राजकीय पक्ष | भाजप | काँग्रेस | इतर |
| २०१८ तील प्राप्त जागा | १५ | ६८ | ०७ |
| १) इंडिया टुडे–ॲक्सीस | ३६–४६ | ४०–५० | १–५ |
| २) एबीपी–सी वोटर | ३६–४८ | ४१–५३ | ०–४ |
| ३) जन की बात | ४२–५३ | ३४–४५ | ०–३ |
| ४) टाईम्स नाऊ–ईटीजी | ३२–४० | ४८–५६ | १–५ |
| ५) न्यूज २४–चाणक्य | २५–४१ | ४९–६५ | ०–० |
| ६) टीव्ही–९–पोल स्ट्रीट | ३५–४५ | ४०–५० | ०–३ |
| ७) रिपब्लिक मॅट्रीझ | ३४–४२ | ४४–५२ | ०–२ |

| तेलंगणा : एकूण जागा – ११९ बहुमतासाठी ६० ची गरज | | | | |
|---|---|---|---|---|
| राजकीय पक्ष | भाजप | काँग्रेस | बीआरएस | इतर |
| २०१८ तील प्राप्त जागा | ०१ | १९ | ८८ | ११ |
| १) एबीपी–सी वोटर | ५–१३ | ४९–६५ | ३८–५४ | ५–१५ |
| २) जन की बात | २–१२ | ४८–६४ | २४–४२ | ४–७ |
| ३) टाईम्स नाऊ–ईटीजी | ०–० | ६०–७० | ३७–४५ | ५–१५ |
| ४) न्यूज २४–चाणक्य | २–१२ | ६२–८० | २४–४२ | ५–११ |
| ५) टीव्ही–९–पोल स्ट्रीट | ५–१० | ४९–५६ | ४८–५८ | ६–८ |
| ६) रिपब्लिक मॅट्रीझ | ४–९ | ५८–६८ | ४६–५६ | ५–७ |

| मिझोराम : एकूण जागा – ४० बहुमतासाठी २१ ची गरज | | | | |
|---|---|---|---|---|
| राजकीय पक्ष | भाजप | काँग्रेस | एमएनएफ | झेडपीएम |
| १) इंडिया टुडे–ॲक्सीस | ०–२ | २–४ | ३–७ | २८–३५ |
| २) जन की बात | ०–२ | ५–९ | १०–१४ | १५–२५ |
| ३) टाईम्स नाऊ–ईटीजी | ०–२ | ०९–१३ | १४–१८ | १०–१४ |
| ४) रिपब्लिक मॅट्रीझ | १–२ | ७–१० | १७–१२ | ७–१२ |
| ५) सी वोटर | ०–० | २–८ | १५–२१ | १२–१८ |

**(माहिती संकलन : यशवंत भंडारे)**

(पान १९ वरून) मतदानोत्तर चाचणीत, काँग्रेसला ५५ ते ६० जागा मिळतील, असे भाकीत तमाम वृत्तवाहिन्यांच्या एक्झिट पोलने ठामपणे वर्तवले होते. अंतिम निकालात मात्र भाजपला ५४ तर काँग्रेसला अवघ्या ३५ जागा मिळाल्या. परंपरागत आदिवासी मतदारांनी काँग्रेसला साथ दिली नाही, असे चित्र निकालातून सामोरे आले. अंतिम निकालात हा चमत्कार अचानक कसा घडला? याचे कोडे अद्याप उलगडलेले नाही.



**भ्रष्टाचाराच्या खोट्या आरोपांची राळ :**

छत्तीसगडमधे मोदी सरकारच्या इशाऱ्यावर, ऐन प्रचार मोहिमेच्या काळात, सक्तवसुली संचलनालयाच्या अनेक अधिकाऱ्यांनी अक्षरश: उच्छाद मांडला होता. महादेव ऐपने मुख्यमंत्री बघेल यांना ५०८ कोटींची लाच दिल्याचे आरोप झाले. आरोप करणाऱ्या एजंटला अटक करण्यात आली. त्याच्या कबुली जबाबाचा व्हिडिओ व्हायरल करण्यात आला. जाहीर सभांमधून मुख्यमंत्र्यांच्या विरोधात पंतप्रधान मोदींनी याच प्रकरणाच्या आरोपांचा वारंवार पुनरुच्चार केला. अंतत: सारे प्रकरण तद्दन बोगस व खोटे असल्याचे गौडबंगाल सामोरे आले. दबाव व दहशतीखाली आपण सारे आरोप केले, असे आरोप करणाऱ्याने स्पष्ट केले. राज्यात सात तारखेला मतदान होते. आरोपीच्या खुलाशापर्यंत ते होऊन गेले, त्यामुळे व्हायचे ते नुकसान झालेच. मोदी सरकारच्या विविध यंत्रणा विरोधकांना नामोहरम करण्यासाठी, कोणत्या थराला जावू शकतात, त्याचे हे ज्वलंत उदाहरण ! छत्तिसगडमधे नेमके काय झाले? निकाल उलट दिशेने कसे फिरले? याचे कवित्व आणखी काही काळ होत राहील. सत्य कधीतरी लोकांसमोर येईलच. तथापि, या घटनांवरून देशातली लोकशाही व्यवस्था किती निम्न स्तरावर पोहोचली आहे, याची कल्पना नक्कीच सर्वांना आली आहे. निवडणुकांचा फार्स यापुढे असाच चालू रहाणार आहे काय? असा प्रश्नही सर्वसामान्यांच्या मनात आहेच.

**मिझोरामचा भाजपला इशारा :**

मिझोरममधेही सत्ताबदल झाला. या सीमावर्ती राज्यातले सहा छोटे पक्ष आणि काही नागरी संस्थांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या 'झोरम पीपल्स मुव्हमेंट' (झेडपीएम) या पक्षाने ४० पैकी २७ जागा जिंकल्या. स्वबळावर या पक्षाला निर्विवाद सत्ता प्राप्त झाली आहे. मणिपूरच्या हिंसाचारानंतर, ईशान्य भारतातील छोट्या राज्यांमधले सारेच वातावरणच बदलले आहे. मणिपूरला सलग ६ महिन्यांहून अधिक काळ हिंसाचाराने वेढले. त्याचे पडसाद मिझोरममधे उमटले नसते तरच नवल! पंतप्रधान मोदी ना मणिपूरला गेले ना मिझोरममधे! या राज्यात मिझो नेशनल फ्रंट हा एनडीएचा घटक पक्ष सत्तेवर होता. त्याच्या मुख्यमंत्र्यांनी मोदींच्या व्यासपीठावर आपण जाणार नाही, असे स्पष्ट केले. पंतप्रधांना आपला दौरा रद्द करावा लागला. मिझोरम मधे काँग्रेस पक्ष सलग १० वर्षे सत्तेवर होता. झेडपीएमच्या तुलनेत इथल्या जनतेने काँग्रेसला देखील नाकारले. फक्त एका जागेवर काँग्रेसला समाधान मानावे लागले. मिश्र वस्तीत भाजपला दोन जागा मिळाल्या. चार राज्यांच्या तुलनेत, प्रसार माध्यमांनी मिझोरामच्या निवडणुकीला फारसे महत्व दिले नाही. तरीही ईशान्येकडील छोट्या राज्यांमधे, मोदी सरकारच्या विरोधात मोठा असंतोष आहे, हा संदेश या निकालातून नक्कीच ध्वनित झाला आहे.

**आता विरोधकांना जोमाने लढावे लागेल :**

पाच राज्यांच्या निवडणुका या लोकसभा निवडणुकीच्या सेमी फायनल आहेत, अशी चर्चा प्रसार माध्यमांनी व्यापक प्रमाणात घडवली. वस्तुत: भारतात प्रत्येक निवडणूक वेगळी असते. २००३ मध्ये भाजपने गाय पट्ट्यातील तिन्ही राज्ये जिंकली. हाच कौल लोकसभा निवडणुकीत आपल्याला मिळेल, या आशेने वाजपेयी सरकारने २००४ साली सहा महिने अगोदर लोकसभा निवडणुका घेतल्या. त्या निवडणुकीत वाजपेयी सरकारला सत्तेतून पायउतार व्हावे लागले. २०१८ मध्ये मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तिसगड अशी तिन्ही राज्ये काँग्रेसने जिंकली. २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत मात्र याच राज्यातल्या मतदारांनी मोदी सरकारच्या बाजूने कौल दिला. अशी उदाहरणे आहेतच. म्हणून पुढल्या निवडणुकांचे भाकीत राज्यांच्या निकालावरून वर्तवणे योग्य नाही.

या निवडणुकीत, काँग्रेसला पाच पैकी किमान तीन राज्यात सत्तेवर येण्याची आशा होती. कारणे काहीही असोत, प्रत्यक्ष निकालांनी ती धुळीला मिळवली. तरीही काँग्रेसचा निवडणुकीतील परफॉरमन्स अगदी वाईट होता, असे नक्कीच म्हणता येणार नाही. आता लोकसभेच्या रणसंग्रामासाठी, देशव्यापी पक्ष म्हणून अधिक जिद्दीने इंडिया आघाडी मजबूत करण्याची जबाबदारी काँग्रेसवर आहे. काळाचे गांभीर्य ओळखून, काँग्रेससह सर्व प्रादेशिक पक्षांनाही परस्परांमध्ये अधिक विश्वासाचे वातावरण लवकरात लवकर तयार करावे लागणार आहे. देशात भाजपच्या विरोधात किमान ३५० जागांवर एकास एक उमेदवार देण्याचे विरोधी पक्षांनी एकमताने ठरवले तर इंडिया आघाडीबद्दल जनतेचाही विश्वास निर्माण होईल आणि चित्र हमखास बदललेले दिसेल. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक आहेत.)**


# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार



ॲड. वैशाली डोळस

**ब्रिटिश, फ्रान्स नि अमेरिकेतील स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून आंदोलनं करावी लागली. त्या भांडल्या, झगडल्या, त्यांनी त्या हक्कासाठी अवहेलना सहन केली. आम्हा भारतीय स्त्रियांना मात्र नागरिक म्हणून दर्जा देतानाच मतदानाचा हक्कही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून दिला. आम्ही कुठचं मोर्चे घेऊन गेलो नाही, की हक्क मागितलाही नाही. तरीही तो हक्क आम्हाला मातृहृदयी बाबासाहेबांनी दिला. म्हणून कदाचित आज बायकांना त्याची किंमत वाटत नाही...**

भारतीय संस्कृतीत मनुस्मृती या ग्रंथाला अनन्यसाधारण महत्त्व होते. एवढे की भारतीय समाजजीवन मनुस्मृतीलिखित कायद्याच्या चौकटीतच चालायचे. भृगू ऋषीने लिहिलेला हा ग्रंथ होता. अनिल सूर्या आपल्या 'भारतीय नारी' या पुस्तकात लिहितात, की बौद्धकाळातील समतेनंतर पुष्यमित्र शुंग याने मौर्यांचा शेवटचा राजा बृहद्रथ याच्या काळात मनुस्मृतीचं लिखाण झालं. मनुस्मृतीचे कायदे हे वर्णव्यवस्थेनुसार काम करणारे कायदे होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र याखालीही दोन वर्ण येतात. याचा उल्लेख करण्याची गरजही ग्रंथकारास किंवा तत्कालीन समाजास वाटत नाही, ते म्हणजे अतिशूद्र व स्त्रिया हे या चार वर्णांच्याही खालचे मानले जातात. मनुस्मृती वर्णानुसार काम देताना ब्राह्मणांना विद्यादानाचा अधिकार, त्याचबरोबर क्षत्रियाने शस्त्र धारण करणे, वापरणे व सर्वांचे संरक्षण करण्याचं काम करायचं. वैश्याने व्यापार करायचा आणि शूद्र वर्णाच्या लोकांनी सेवा करायची. यात अतिशूद्र व स्त्रिया यांचाही ओघाने धर्म आला सेवा करण्याचा. वरच्या सर्व वर्णांची विनामूल्य, विनामान तसेच धर्म म्हणून न कुरकुरता सेवा करणे हीच या खालच्या तीन लोकांची कामं होती.



**स्त्रिया अवर्णच :**

यात स्त्रियांना तर या मनुस्मृतीप्रणित व्यवस्थेने अवर्ण ठरवलं, असं डॉ. आ.ह. साळुंके सर म्हणतात. कारण ब्राह्मण मुखातून जन्मला, क्षत्रिय बाहुतून जन्मले, वैश्य मांडीतून जन्मले आणि शूद्र पायातून जन्मले असं मनुस्मृती सांगते. पण स्त्रियांचा जन्म कसा झाला हे सांगत नाही. म्हणजे ती तेवढी दखलपात्रही नाही. तसेच मनुस्मृतीने स्त्रियांवर अत्यंत कडक बंधनं घातली. मुलीचा जन्मच मुळी अशूभ असतो. तिला शिक्षण, रोजगार नाकारणारीच काय; पण तिचं स्वातंत्र्य नाकारणारी अनेक वचनं मनुस्मृतीत पानोपानी पहायला मिळतात. मुलीचं लग्नं वयात यायच्या आतच केलं पाहिजे. तिने बालपणी पित्याच्या, तरुण वयात नवऱ्याच्या व म्हातारपणात मुलाच्या आज्ञेत रहावं. तसंच शहाण्या माणसानं एकट्या स्त्रीच्या सान्निध्यात राहू नये. स्त्रियांचा संपत्तीत वाटा नाही. तिला घटस्फोटाचा, पुनर्विवाहाचा हक्क नाही. एकंदरीतच काय, मनुस्मृतीबरहुकूम कायदे म्हणजे स्त्रियांना नियंत्रित करणारा तुरुंगच. ब्राह्मणी व्यवस्थेचा डोलारा हा स्त्री-शोषणावर आणि स्त्री, शूद्र, अतिशूद्राच्या कष्टावर उभा राहिला, हे वास्तव नाकारता येत नाही.

मनुस्मृतीप्रणित व्यवस्थेला सुरूंग लावण्याची सुरुवात म. फुल्यांनी १ जानेवारी १८५१ ला मुलींची पहिली शाळा पुण्यात काढून केली होती. सतीप्रथा, केशवपन, विधवा पुनर्विवाह, विधवा माता या प्रश्नांवर म. फुलेंनी आक्रमक भूमिका घेऊन त्यावर भरीव कामही केलं.

**बाबासाहेबांनी स्त्रियांना माणूस म्हणून दर्जा दिला :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा उच्चशिक्षित म्हणून भारतीय समाजकारणात प्रवेश करतात, तेव्हा म. फुल्यांचं काम, राजर्षीशाहू महाराजांचे संस्थानातील स्त्री-सुधारणांचे प्रयोग त्यांच्यासमोर आहेत. बाबासाहेबांचं उच्चशिक्षण परदेशात झालं. त्यामुळे एक व्यापक जग त्यांनी अनुभवलं होतं. शिवाय माणूस म्हणून माणसाचं जगणं कसं असावं, त्याला माणूस म्हणून कोणते अधिकार पाहिजेत. जगातल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व्यवस्था प्रत्येक ठिकाणी अशा सामान्य माणूस आणि स्त्री यांच्या शोषणावर उभ्या आहेत, याचा बाबासाहेबांचा अभ्यासही होता आणि म्हणून बाबासाहेबांनी स्त्री प्रश्नांकडे पाहताना तिच्यावर दया करायची किंवा ती बिचारी आई असते, बहीण असते, मुलगी असते म्हणून तिला काहीतरी दिलं



**मुंबईतील चैत्य भूमी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून आलेल्या महिलांचा ५ डिसेंबर २०२३ रोजी मध्यरात्री आबासाहेब थोरात यांनी काढलेला फोटो.**

पाहिजे किंवा तिचा विचार केला पाहिजे, एवढा संकुचित विचार बाबासाहेब करताना दिसत नाहीत, तर समाजजीवनात स्त्री-पुरुष हे दोघेही माणूस म्हणून जगताना त्यांना कोणते हक्क असावेत, यावर ते विचार करताना दिसतात.

बाबासाहेबांनी स्त्रियांना जर काय दिलं असेल, तर भारतीय स्त्रियांना कायदेशीर माणूस म्हणून दर्जा देण्याचं काम त्यांनी केलं, जे या देशाच्या ब्राह्मणी पितृसत्तेने नाकारलं होतं. ते बाबासाहेबांनी भारतीय संविधानात एका फटक्यात उखडून टाकलं. भारतीय संविधानातील कलम १४, १५, १६ ने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने नागरिक म्हणून उभं केलं. बाबासाहेबांनी भारतीय स्त्रियांना माणूस केलं, असं मी म्हणेन.

**बाबासाहेबांनी स्त्रियांत चेतना जागवली :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात मनुस्मृती वाचून जाळली. या देशातील विषमतेला तिलांजली देत समतेचा प्रवास जणू काही या महामानवाने सुरू केला. या कार्यक्रमाला महाराष्ट्रभरातून पुरुष जसे आले होते, तसेच स्त्रियासुद्धा आल्या होत्या. त्या स्त्रियांसमोर भाषण देताना बाबासाहेब म्हणतात, ‘‘स्त्रियांनो, आपली जात ओळखू येईल असा पोशाख करणं सोडा, सवर्ण स्त्रियांसारख्या साड्या घाला, कथलाचे खूप दागिने घालण्यापेक्षा एखादाच पण सोन्याचा दागिना घाला.’’ पुढे ते म्हणतात, ‘‘ब्राह्मण स्त्रीच्या पोटी जन्माला आलेल्या मुलांना सन्मानाने जगता येतं. पण तुमच्या पोटी जन्माला आलेल्या मुलाला मात्र समाज स्वीकारत नाही, सन्मानाने जगता येत नाही, याचा तुम्ही विचार केला पाहिजे. यासाठी तुम्ही काम केलं पाहिजे. यावर उपाय काय. एक तर तुम्ही मुलं जन्माला घालणं बंद करा. ते शक्य नाही. मग त्यांना सन्मानाने जगता आलं पाहिजे यासाठी यांसारख्या आंदोलनात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झालं पाहिजे. घरातले प्रश्न जसे तुम्ही स्त्री-पुरुष मिळून सोडवता तसेच समाजाचे प्रश्नसुद्धा तुम्ही मिळून सोडवले पाहिजे.’’ बाबासाहेबांच्या या भाषणाचा परिणाम उपस्थित स्त्रियांवर झाला. नंतर बाबासाहेबांच्या सामाजिक आंदोलनात स्त्रियांचा सहभाग उत्तरोत्तर वाढत गेलेला आपल्याला दिसतो. खोती प्रश्नावरचं आंदोलन, काळाराम मंदिराचा सत्याग्रह अशा अनेक आंदोलनांमध्ये स्त्रियांचा सहभाग आपल्याला मोठ्या प्रमाणात दिसतो. मीनाक्षी मून आणि ऊर्मिला कांबळे यांनी बाबासाहेबांसोबत काम करणाऱ्या स्त्रियांच्या मुलाखती घेऊन एक पुस्तक लिहिलं. ते पुस्तक म्हणजे ‘आम्हीही इतिहास घडवला’.

**वर्णवर्चस्ववादी संविधान :**

बाबासाहेब मनुस्मृतीचं दहन करून थांबले नाहीत, तर वर्णवादी, वर्चस्ववादी, विषमतेवर उभ्या असलेल्या आणि पित्तृसत्तेचं समर्थन करून स्त्रियांना माणूस म्हणून जगणं नाकारणाऱ्या मनुस्मृतीला नाकारून बाबासाहेबांनी पर्यायी समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सार्वभौमत्व यांवर उभं अरणारं भारतीय संविधान आपल्याला दिलं. कोणताही महामानव एक सशक्त पर्याय उभा करत असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने तो सशक्त पर्याय आपल्याला संविधानातून दिला.

संविधान आमलात आलं. बाबासाहेब साऱ्या देशाचे कायदामंत्री झाले. बाबासाहेबांचं म्हणणं होतं, की भारतीय संविधान राजकीय

समानता प्रदान करतं. पण आर्थिक समानतेचं काय? भारतीय संविधानाने स्त्रियांना समानता दिली. पण शिक्षण, नोकरी, संपत्ती यात वाटा मिळाला नाही तर या समानतेचा काय उपयोग? म्हणून बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल लिहिलं. यानुसार स्त्रियांना वारसा हक्क म्हणून भावाबरोबर संपत्तीत समान वाटा मिळाला पाहिजे. नवऱ्याने सोडून दिलेल्या स्त्रियांना पोटगीचा हक्क मिळाला पाहिजे. मनुस्मृतीनुसार स्त्रियांना मूल दत्तक घेण्याचा हक्क नव्हता, तो तिला मिळाला पाहिजे, अशा हक्कांसाठी हिंदू कोड बिल प्रचंड आजारी असताना बाबासाहेबांनी तयार केलं.

**मनुस्मृतीवाल्यांचा स्त्रियांच्या हक्कांना विरोध :**

सनातन्यांनी आवई उठवली, की डॉ. बाबासाहेब आंबेडकर आमचा धर्म भ्रष्ट करत आहेत. या विरोधात रान पेटवलं गेलं. बाबासाहेबांना विरोध करणाऱ्या सभा भरवल्या गेल्या. बाबासाहेबांना संसदेतल्या मंत्र्यांचा, सनातन्यांचाच काय पण स्त्रियांचाही या हिंदू कोड बिलाला विरोध होता. असं एक शिष्टमंडळही बाबासाहेबांना भेटायला गेलं. त्यातल्या स्त्रियांना बाबासाहेबांनी विचारलं, तुम्ही हे बिल वाचलं आहे का? तर त्यातील एकीने सांगितलं, आम्हाला ते माहीत नाही. पण माझा नवरा म्हणाला, तू मोर्चात नाही गेलीस तर ती तुला सोडून देईन. असाही विरोध होता लुळा, पांगळा. शंकराचार्यांनी तर एका अत्यंजाने लिहिलेली स्मृती/कायदा म्हणजे गंगेचं पाणी मोरीत टाकल्यासारखं होईल, ते कसं स्वीकारायचं, अशी गलिच्छ भाषा केली. स्वामी करपात्री यांनीही हिंदू कोड बिलाला विरोध केला.

**स्त्रियांच्या हक्कासाठी मंत्रीपदाचा राजीनामा :**

मंत्रिमंडळातील पंजाब-हरियाणाचे मंत्री तर बोलायचे, की आमच्या जमिनी अत्यंत सुपीक आहेत, त्यात आम्ही बहिणींना वाटा कसा द्यायचा? एकंदरच काय, बाबासाहेबांना स्त्रियांना हक्क मिळवून देण्यासाठी कुणीही साथ दिली नाही. संसदेत बिल मांडण्याची परवानगीही मिळाली नाही. परिणामस्वरूप बाबासाहेबांनी कायदामंत्रीपदाचा राजीनामा दिला. पत्रकार परिषदेत बोलताना बाबासाहेब म्हणाले, ''माझी मुलं मेली तेव्हा जेवढं दुःख मला झालं नव्हतं तेवढं दुःख आज मला हे बिल संसदेत मांडता आलं नाही व ते मंजूर होऊ शकत नाही म्हणून झालेलं आहे.'' पोटची मुलं गमावल्याचं दुःख कुणाला होत नाही. पण स्त्रियांच्या अधिकारावर साधी चर्चा करावी ही मानसिकता जनतेच्या प्रतिनिधींचीच नाही, ही बाब बाबासाहेबांना प्रचंड वेदना देणारी ठरते. नंतरच्या काळात हेच बिल काही बदलासह आज अनेक कायद्यांत रुपांतरीत झालंय. आज स्त्रियांना हे सर्व हक्क मिळालेत.

**बाबासाहेबांनी दिली बाळंतपणाची रजा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूरमंत्री असताना ते एका खाणीची पाहणी करायला गेले. तेव्हा एक गर्भवती स्त्री खानीच्या आत जमिनीत खोलवर काम करताना त्यांनी पाहिली. त्यांना प्रचंड संताप आला. त्यांनी तात्काळ तिला बाहेर काढायला सांगितलं. या घटनेने त्यांना हेलावून सोडलं आणि भारतात १९४२ लाच 'मॅटर्निटी लिव्ह'चा कायदा आला. म्हणजे गर्भवती स्त्रियांना सव्वीस आठवड्यांची भरपगारी रजा देणारा हा कायदा. आता पुरुषांनाही बायकोच्या बाळंतपणाची सुट्टी मिळते. किती पुरुष बायकोची व मुलांची सेवा, सुश्रुषा करण्यासाठी व त्यांची काळजी घेण्यासाठी ही सुटी वापरतात, यावर एक संशोधन व्हायला हरकत नाही.

भारतीय संविधानाने स्त्रियांना मताचा हक्क पुरुषाबरोबर लगेच दिला. अगदी सुधारित देशात म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इथल्या स्त्रियांनी मताचा हक्क मिळावा म्हणून आंदोलनं केली आहेत. त्या भांडल्या, झगडल्या, त्यांनी या हक्कासाठी अवहेलना सहन केली. आम्हा भारतीय स्त्रियांना मात्र नागरिक म्हणून दर्जा व मताचा हक्क बाबासाहेबांनी भारतीय संविधानातूनच दिला. आम्ही कुठेच मोर्चे घेऊन गेलो नाही, की हक्क मागितलाही नाही. तरी तो आम्हाला मातृहृदयी बाबासाहेबांनी दिला. म्हणून आज कदाचित बायकांना त्याची किंमत वाटत नाही. कारण २०१९ च्या निवडणुकीमध्ये भाजपला मिळालेल्या मतात स्त्रियांचं मतदान ३५ टक्के इतकं आहे, हे निखिल वागळे यांनी त्यांच्या चॅनलवर सांगितलं. म्हणजे स्त्रिया खातात फुले, शाहू, आंबेडकर, शिवरायांचं आणि गातात स्त्रियांना दासी मानणाऱ्यांचा वारसा चालवणाऱ्या भाजपचं. मणिपूरची घटना भाजपशासित राज्यात घडली. हजारो पुरुष दोन स्त्रियांची नग्न धिंड काढतात, त्यांच्या शरीराशी चाळे करतात, तेही जगजाहीर. केंद्रातील मोदी सरकार मुख्यमंत्र्यांचा राजीनामाही घेत नाही. किती भयानक आहे हे? किती किळसवाणं, अन् लाजिरवाणं आहे हे. हे उदा-हरण म्हणजे शासनकर्त्यांच्या मानसिकतेचा आरसा आहे. तरी स्त्रिया यावर विचारच करणार नसतील तर काय? या देशातल्या ब्राह्मणी व्यवस्थेचे, मनुस्मृतीचे समर्थक मनुस्मृती परत आणायची भाषा करतात. मणिपूरची घटना, मध्य प्रदेशातील अकरा वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून खून करणं या घटना मनुस्मृती जीवंत असल्याचा भास निर्माण करायला लागल्यात. याचं भान आपण सर्वांनीच बाळगायला हवं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, की समाज किती प्रगत आहे याचं मोजमाप मी त्या समाजातील स्त्रियांची किती प्रगती झाली यावर ठरवतो. आजच्या समाजाचं मोजमाप आपण काढायला हवं. स्त्रियांना किती प्रमाणात शिक्षणात, नोकरीत संधी मिळाल्या, संपत्तीत किती वाटे मिळाले, किती पोषक वातावरण आपण तयार करू शकलो या सर्वांसाठी. स्त्री स्वतंत्रपणे विहार करू शकावी यासाठी आपण किती सुरक्षित वातावरण करू शकलो? समाजाच्या जीवन जगण्याच्या मूल्यात आपण किती बदल करू शकलो? मनुस्मृतीची मूल्ये नाकारून भारतीय संविधानाची मूल्ये समाजात रुजवायला परत बाबासाहेब येणार नाहीत. ती जबाबदारी अनुयायी म्हणून आम्हालाच घ्यावी लागणार आहे. त्याला आम्ही तयार आहोत का? की धर्मांधांच्या राजकारणात वाहून जायचं हे ठरविण्याची वेळ आलीय.

एक शायर असं म्हणतो,

**ए नादान हुकमरानो**
**इमान पर चलो।**
**बुवा बापू छोड कर, विग्यान पर चलो।**
**एक दिन अमरिका से भी आगे होगा भारत।**
**शर्त ए है, की**
**मेरे भीम जी के संविधान पर चलो।** ●●●

**(लेखिका विधिज्ञ असून प्रसिद्ध वक्त्या आहेत.)**

# इस्रोच्या चांद्रयानांची मुशाफिरी



डॉ. संजय ढोले

**भारतीय आवकाश संशोधनाची मोठी परंपरा आणि इतिहास आहे. ५ ऑगस्ट १९६९ रोजी विक्रम साराभाई यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या भारतीय आवकाश संशोधन केंद्राच्या म्हणजेच इस्रोच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने आवकाश संशोधनाला गती मिळाली. आता भारताने चंद्रावरील चांद्रयान-३ मोहिम यशस्वी करून आवकाश संशोधनात जगाला चकीत केलं आहे. भारताच्या आंतराळ संशोधनाचा मनोरंजक, शास्त्रीय विज्ञान आणि प्रगती याचा धांडोळा घेणारा लेख...**

२३ ऑगस्ट २०२३ ची सकाळच एका वेगळ्या उत्साहात उगवली होती. भारतीय अवकाश संशोधन केंद्रात वेगळीच लगबग होती. शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि सर्वच कर्मचारी उत्साहात होते. शास्त्रज्ञ मात्र चिंतेत नसले, तरी आतुर मात्र होते. १४० कोटी भारतीयांचं ओझं त्यांच्यावर होतं. म्हणूनच एक प्रकारचं दडपणही जाणवत होतं. कारण आज सायंकाळी ६ वाजून चार मिनिटांनी भारताची महत्त्वकांक्षी मोहिमे अंतर्गत असलेला चांद्रयान-३ चंद्रावर अलगदपणे उतरणार होता. आणि महत्त्वाचं म्हणजे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार असल्याने शास्त्रज्ञांमध्ये बरीच चलबीचल होती. कारण चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत हा पहिला देश ठरणार होता. आतापर्यंत इतर देश अयशस्वी झाले होते.. किंबहुना भारतही चांद्रयान-२ च्या निमित्ताने अपयशी ठरला होता. पण आता जिद्दीने चांद्रयान-३ मोहिमेच्या निमित्ताने पुन्हा उभे राहिले होते. वातावरणाचा अभ्यास करून ही मोहीम पुढे ढकलण्याचीही इस्रोची योजना होती. पण दुपारी बाराच्या सुमारास इस्रोने अधिकृतरीत्या जाहीर केले की नियोजित वेळीच आज ६:०४ वाजता चांद्रयान-३ चे अवतरण होणार आहे आणि त्या दृष्टीने शेकडो शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांची नियंत्रण कक्षेत उपस्थिती दिसत होती. मुख्य शास्त्रज्ञ नियंत्रण कक्षेत संगणकावर चांद्रयान-३ ची इत्यंभूत माहिती आणि स्थितीचे अवलोकन करीत होते.

**इस्रोचे यश आवकाश कवेत घेणारे :**

इस्रोने अधिकृतपणे जाहीर करताच,भारतीयच नव्हे तर जगातील सर्वच राष्ट्रे, अगदी पाकिस्तान सुद्धा सजग झाले होते. जशी वेळ समीप येत होती तशी उत्सुकता शिगेवर पोहोचत होती. साधारण पाच वाजेपासूनच सर्व शाळा, महाविद्यालय-विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षकच नव्हे तर सामान्य नागरिक सुद्धा घरातील टीव्ही समोर बसले होते... शाळा कॉलेजमध्ये तर मोठ्या पडद्यावर प्रक्षेपणाचे आयोजन केले होते.. जे बाहेर होते ते मोबाईलच्या संपर्कात होते.. नियंत्रण कक्षेत समालोचन होत होते.. दोघेही स्त्री पुरुष इत्यंभूत माहिती देऊन खिळवून ठेवत होते.. साधारण पाच वाजेपासूनच रस्त्यावर शुकशुकाट झाला होता. एरव्ही भारत-पाकिस्तान क्रिकेट मॅचच्या वेळी ही अशी स्थिती येत होती.. पण एका विज्ञान घटनेला



लोकांनी पाठबळ दिलं होतं. भारतीय शास्त्रज्ञांचा हा खरंतर बहुमान होता. इस्रोतील प्रत्येक शास्त्रज्ञ या घटनेने स्तिमीत झाला होता. मुख्य पडद्यावरील बिंदू सरकत होता. चांद्रयान-३ पासून लँडर वेगळा झाला होता.. आणि तो चंद्राच्या पृष्ठभागाकडे झेपावत होता. क्षणभर थांबून अवलोकन करीत होता.. आणि पुन्हा प्रवास करीत होता. प्रत्येकाने श्वास रोखून धरला होता. जसेही सहा वाजले तसे विक्रम लँडर पृष्ठभागाच्या अगदी समीप येऊन ठेपला होता. काही किलोमीटर उंचीवर तो होता. तो थबकला. पुन्हा त्याने अवलोकन केले. जागा पाहिली आणि हळूहळू झेपावत सहा वाजून चार मिनिटांनी लँडर पृष्ठभागावर अवतरताच, नियंत्रण कक्षेतील शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांनी एकमेकांना आलिंगन दिले होते. आणि याच वेळी सर्व राष्ट्रातील प्रत्येक जण एकमेकांशी हस्त आंदोलन करून भेट घेऊन अभिनंदन करीत होते. भारत यशस्वी झाला होता. यावेळी अगदी उत्स्फूर्तपणे भारताच्या पंतप्रधानांनी सर्व राष्ट्राला संबोधले होते. यात ते सूचक

म्हणाले, की हे यश शास्त्रज्ञांचे तर आहेच पण सर्व भारतीयांचेही आहे. चंदामामा दूरचे असे आपण म्हणतो. पण शास्त्रज्ञांमुळे तो आता एक दुरिपर आला आहे. अशा शास्त्रज्ञांचा आपल्या सर्वांना अभिमान आहे..  पुढे लँडर मधून यशस्वीपणे प्रज्ञान रोवर बाहेर पडले आणि प्रत्येकाने निश्वास टाकला... चांद्रयान-३ च्या निमित्ताने भारत दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला राष्ट्र ठरला होता.

**चंद्राचे आकर्षण कायमच :**

सकाळी उठल्या उठल्या ठळकपणेदिसणारी निसर्गातील एकमेव वस्तू सूर्य जरी असली, तरीही रात्रीच्या निरव आणि नितळ शांततेच्या या अंधारमय अवकाशाच्या पार्श्वभूमीवर चंद्र मात्र मन मोहूनघेतो. अमावस्येनंतर उठणारी चित्तवेधक चंद्रकोर, पौर्णिमेच्या दिवशी टपप्याटप्प्याने पूर्ण दिसतो आणि त्यावरील डागआकर्षित करून जातात. चंद्र तसा स्वयंप्रकाशित नाही. तो सूर्याची किरणे परावर्तित करतो. त्यामुळे त्याचे अस्तित्व रात्रीच्या वेळी आपल्याला ठळकपणे जाणवते. ही परावर्तित किरणे मात्र मानवी डोळ्याला आणि मेंदूला सुखावह वाटतात. म्हणूनच चंद्र हा प्रत्येकाच्याच साथीला असतो. रात्रीच्या वेळी चंद्र प्रकाशात परिसर अगदी उत्साहवर्धक असतो आणि त्याचवेळी परिसरात रहस्यमयता ही निर्माण करतो. एखाद्या तळ्यात चंद्राचे प्रतिबिंब पडून मोहकता निर्माण करते.  म्हणूनच कदाचित कवी, साहित्यिक, गीतकारांपासून ते शास्त्रज्ञांपर्यंत चंद्राचं एक आकर्षण राहिलं आहे.

कुसुमाग्रजांनी एक अत्यंत सुंदर कविता चंद्रावर लिहिली असून मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये चंद्राशिवाय परिपूर्णताच येत नाही. असंख्य गीते आणि कविता आज चंद्राचा आधार घेऊन लिहिली गेली आहेत. प्रेमी युगलांना तर चंद्र हा हक्काचा वाटतो. आणा-भाका घेताना त्याचा संदर्भ येतो. याशिवाय चंद्रप्रकाशात प्रेमीयुगलांची भेट म्हणजे निसर्गाचा एक सुंदर अविष्कार वाटतो. यामुळेच चंद्राचे अढळ स्थान मानवीमनामध्ये आहे आणि यापुढेही कित्येक वर्षे राहणार आहे. अशा या चंद्राचे स्थान जरी मानवी मनामध्ये आहे तसेच पृथ्वीसाठीही आहे. वसुंधरेला निश्चितच त्याचं कोडकौतुक आहे. म्हणूनच पृथ्वीचा हा नैसर्गिक उपग्रह मानवाला कळल्यापासून म्हणजेच अश्मयुगापासून आकर्षण वाटत आलेले आहे. टप्प्याटप्प्याने युगे बदलत गेली आणि आज आपण एकविसाव्या शतकातील आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात असताना चंद्राचे स्थान अढळ राहिलेले आहे. फक्त विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे चंद्र अगदी जवळून निरखता नि जोखता आला. त्यामुळे त्यावरील रहस्य उलगडायला मदत झाली.

**आंतराळ संशोधनातील उत्साह :**

आज भारतही चांद्रयानाच्या माध्यमातून चंद्रावर आपली मोहरउमटवून आला आणि त्याच्या अंतरंगाविषयी जाणून घ्यायचा प्रयत्न होऊ लागला आहे. तत्पूर्वी चंद्र ते चांद्रयान पर्यंतचा रोमांचकारी प्रवास आपण अनुभवायलाच हवा. तसे पाहता एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी मूलभूत सैद्धांतिक तसेच प्रायोगिक विज्ञानाने बऱ्यापैकी प्रगती करायला सुरुवात केली होती. इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, न्यूट्रॉनच्या शोधामुळे अणुला आकार मिळाला होता. नाभीकीय आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्राची घोडदौड सुरू झाली होती. अतिसूक्ष्म तरंगावर





आधारित तंत्रज्ञानयाचा काळात येऊन, अवकाशात झेप घेण्याचा प्रयत्न होऊ लागला होता नि मानव अंतराळात जाण्यासाठी उत्सुक होऊन गवसणी घालू लागला होता. रशिया अर्थात पूर्वीचे सोविएत युनियन हा देश अंतराळशास्त्राच्या संशोधनामध्ये आघाडीवर होता आणि १९५० नंतर तसे त्यांचे प्रयत्नही चालू होते. दुसऱ्या महायुद्धात अतिसूक्षमतरंगावर आधारित तंत्रज्ञान आणि अवकाश दळणवळण कमालीचे सिद्ध झाले होते. याचाच परिपाक म्हणून स्पुटनिक-२ या रशियन यानातून लायका नावाची कुत्री हा जिवंत प्राणी १९५७ मध्ये अवकाशात सोडण्यात आला. परतीच्या प्रवासाची कुठलीही तरतूद न केल्याने लायकाला मात्र प्राण गमावावे लागले होते. शिवाय अवकाशात प्राण गमावणारी ती पहिलीच ठरली. तद्नंतर १९६० मध्ये स्पुटनिक-५ च्या माध्यमातून 'बेल्का' आणि 'स्ट्रेल्का' या कुत्र्या तसेच काही उंदीर वनस्पतींसह अवकाशात सोडण्यात आले. त्यांना पृथ्वीवर सुखरूपही आणण्यात आले. याच आत्मविश्वासाच्या बळावर रशियाने १९६० मध्ये यूरी गागारीन या अंतराळवीराचे पृथ्वीभोवती १०४ मिनिटे यशस्वी भ्रमण घडवून आणले आणि या ऐतिहासिक भ्रमणामुळे मानवासहित अवकाश मोहिमांचे नवे युग सुरू झाले होते. मानवी जीवनातील आणि अंतराळशास्त्रातील ही उत्साहवर्धक घटना होती. मानव जातीने तिचे स्वागतच केले होते.

दुसऱ्या महायुद्धानंतरही रशिया आणि अमेरिका या दोन महासत्तांमध्ये प्रत्येक क्षेत्रात कमालीची चढाओढ होती. युरी गागारीन अवकाशात जाऊन आल्यानंतर अमेरिकेनेही मानवसहित अंतराळ मोहिमांचा कार्यक्रम हाती घेतला आणि लागलीच म्हणजे १६  जुलै १९६९ रोजी नील आर्मस्ट्रॉंग, एडविन ऑल्ड्रिन आणि माइकल कोलिन्सया तिघांना घेऊन अपोलो-११ हे यान चंद्राकडे झेपावले आणि २१ जुलै रोजी नील आर्मस्ट्रॉंग यांनी चंद्रावर प्रथम पाऊल ठेवले. मानवीसृष्टीतील ही भव्यदिव्य घटना होती. तद्नंतर ऑलड्रीननेही पावलं उमटविलीत आणि काही तास तेथे घालवून २४ जुलै रोजी ते तिघेही खडकांचे आणि मातीचे नमुने घेऊन पृथ्वीवर परतले. पृथ्वीवर आल्यानंतर मात्र खडकांच्या नमुन्यांचा अभ्यास केला गेला. त्यातून माहिती मिळू लागली. विश्वाची उत्पत्तीची मुळे १४.५ अब्ज वर्षांपूर्वी झाल्याचे मानले जाते. तद्नंतर १० अब्ज वर्षानंतर पृथ्वीचा जन्म झाला आणि त्याचवेळी चंद्राचीही निर्मिती झाल्याचे वेगवेगळ्या सिद्धांतावरुन मानले गेले. म्हणजे चंद्राची निर्मिती ही ४.५ (........?) अशा वर्षापूर्वी झाली आहे. चंद्राच्या निर्मितीबद्दल खगोलशास्त्रज्ञांमध्ये अनेक मतभेद आहेत. यात काही प्रचलित सिद्धांत आहेत. फिशन यांच्या थिअरीनुसार चंद्र हा पृथ्वीपासून तुटून वेगळा झालेला तुकडा असल्याचे मानले गेले, तर कॅप्चर थिअरीमध्ये चंद्राची निर्मिती ही इतरत्र कोठेतरी झाली आणि तो पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या क्षेत्रात आला. को-फार्मेशन

थिअरीमध्ये सूर्यमालेच्या निर्मितीच्या वेळी पृथ्वी आणि चंद्राची एकाच ठिकाणी उत्पत्ती झाल्याचे शास्त्रज्ञ मानतात. महत्त्वाचे म्हणजे जायंट इम्पॅक्ट थिअरीनुसार साधारण मंगळाच्या आकाराची थिया नावाची वस्तू ही पृथ्वीवर धडकल्याने पृथ्वीवर पुरेसे पदार्थ पृथ्वीच्या भोवती विखुरले गेले आणि त्यापासूनच नंतर चंद्राची निर्मिती झाली.



**चंद्रावरील सूक्ष्म जीवांचे अस्तित्व :**

इंग्लिश खगोलशास्त्रज्ञ थॉमस हॅरिऑट (१५६०-१६२१) यांनी प्रथमतः दुर्बिणीचा आधार घेऊन चंद्राविषयी निरीक्षणे नोंदविली. म्हणजेच गॅलिलिओ यांच्या एक महिन्या आधी जुलै १६०९ रोजी ही नोंद करण्यात आल्याने, चंद्राच्या शोधाचे खरे श्रेय थॉमस यांना जाते. चंद्राचे नाव ग्रीक यांनी 'सेलेन' तर रोमन यांनी 'लुना' असे ठेवले. चंद्रावरील खडकांमध्ये सूक्ष्म जीवांचे अस्तित्व आणि त्यांचे संकेत ३.७ अब्ज वर्षांपूर्वीचे आहेत असे मानले जाते. चंद्र हा पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह असून, आकारमानाने सूर्यमालेतील पाचवा मोठा उपग्रह आहे. पृथ्वी आणि चंद्रामधील अंतर ३ लाख ८४ हजार ४०० कि.मी. आहे, तर व्यास ३ हजार ४७६ कि.मी. एवढा आहे. याचाच अर्थ चंद्राचे वस्तूमान हे पृथ्वीच्या २ टक्के आहे, तर गुरुत्वाकर्षण शक्ती पृथ्वीच्या सुमारे १७ टक्के इतकी आहे. चंद्राला पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा घालण्याकरिता २७.३ दिवसांचा कालावधी लागतो. चंद्राने खऱ्या अर्थाने बऱ्याच वर्षांपासून पृथ्वीला लघुग्रहांपासून संरक्षण दिले आहे.


चंद्राला स्वतःभोवती फिरण्यास लागणारा वेळ हा पृथ्वीसारखाच असल्याने, चंद्राची कायम एकच बाजू (सन्मुख) पृथ्वीच्या दिशेला असते. चंद्राची दुसरी बाजू (विन्मुख) ही अंधारात असते. चंद्रावरील पृष्ठभागाचे तापमान हे उणे १६९ ते १२२ अंश सेल्सिअस एवढे आहे. चंद्र निर्माण होतांना लाव्हाच्या वेगवेगळ्या स्फटीकरणामुळे चंद्राचे अंतरंग तीन भागात विभागले गेले आहे. बाहेरचा भाग म्हणजेच क्रस्ट हा मुख्यत्वे ऑक्सिजन, सिलिकॉन, मॅग्नेशियम, कॅल्शियम, लोह, एल्युमिनियम, क्रोमियम, टिटॅनियम, मॅग्नीज या अशा विविध संयुगांनी आणि खनिजांनी बनलेला आहे. तर दुसरा भाग म्हणजेच मँटल हा काही प्रमाणात वितळलेल्या लाव्हांमुळे निर्माण झालेल्या मायरा म्हणजेच डागात आहेत आणि तिसरा भाग हा गाभा असून मुख्यत्वे त्यात लोहाचे प्रमाण आहे. चंद्रावरील गुरुत्वाकर्षण हे तेथील असणाऱ्या विवरांमुळे कमी अधिक प्रमाणात असते. विशेषतः पृथ्वीपेक्षा क्षीण आहे. शिवाय चंद्राचे बाह्य चुंबकीय क्षेत्र हे सुमारे १ ते १०० नॅनोटेसला इतकी आहे. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राच्या १०० पटीने ते कमी ताकदवर आहे. महत्त्वाचे म्हणजे चंद्र हा पृथ्वीप्रमाणे दोन ध्रुवांचा चुंबक नसून चुंबकीय क्षेत्र हे पूर्णतः क्रस्टमध्ये असणाऱ्या घटकांमुळे तयार झालेले आहे. चंद्रावरील वातावरण हे विरळ आहे. ते फक्त १०,००० कि.ग्रॅ. एवढे आहे आणि ते मुख्यत्वे सोडिअम, पोटॅशिअम, रेडॉन, पोलोनीअम, ऑर्गन, हेलिअम, ऑक्सिजन, तसेच मिथेन, नायट्रोजन, कार्बनमोनॉक्साईड आणि कार्बन डाय-ऑक्साइड या वायूचे बनले आहे.

मानवाने प्रत्यक्षात पाऊल ठेवले अशी एकमेव खगोलीय वस्तू म्हणजे आजच्या घडीत चंद्र हाच आहे. मानव प्रत्यक्षात अजूनही कुठल्याही ग्रहावर गेलेला नाही. रशियाचे लुना-१ हे अंतराळयान पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणातून सुटून चंद्राच्या जवळून जाणारी पहिली वस्तू ठरली होती. आणि रशियाचेच लुना-२ हे अंतराळयान प्रथम चंद्राच्या पृष्ठभागावर प्रत्यक्षात धडकले होते आणि लुना-३ यानाने चंद्राच्या दुसऱ्या बाजूचे छायाचित्र सर्वप्रथम पाठविले होते. हे तीनही अंतराळयान सोवियत संघाने १९५९ मध्ये पाठवली होती. पुढे १९६६ मध्ये चंद्राच्या पृष्ठभागावर प्रत्यक्षात उतरणारे लुना-९ हे अंतराळयान पहिले होते. त्यानंतरच्या लुना-१० ने प्रत्यक्षात चंद्राला प्रदिक्षिणा घातल्या होत्या. पुढे त्याच्याच साह्याने मानवाने चंद्रावर पाऊल ठेवण्याचा विक्रम केला आणि तो आजतागायात अमेरिकेच्या नावावरच आहे. सध्यातरी ती एकमेव मोहीम ठरली आहे.

**भारतीय शास्त्रज्ञाचे योगदान :**

याच दरम्यान भारतातही अंतराळ शास्त्राची मुहूर्तमेढ रोवली जाऊ लागली होती... डॉ. होमी भाभा यांच्या नेतृत्वाखाली भारतातील अणुऊर्जा प्रकल्पांनी जोर धरला होता आणि जगाच्या नकाशावर ठसा उमटवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्याच कळपात डॉ. विक्रम साराभाई हा तरुण शास्त्रज्ञ सामील झाला होता आणि भाभांनी त्याला भारताच्या अंतराळ धोरणाची मुभा आणि मोकळीक दिली होती. त्याचाच प्रयत्न म्हणून १९६२ मध्ये थुंबा येथे अवकाशतळ उभारण्याचा प्रयत्न इंडियन नॅशनल कमिटी ऑफ स्पेस रिसर्च या संस्थेने घेतला. त्याची धुरा अध्यक्ष म्हणून विक्रम साराभाईंना देण्यात आली होती. विक्रम साराभाईंच्या सोबत आता अब्दुल कलाम, वसंत गोवारीकर सारखे तज्ज्ञ सामील झाले होते. थुंबा जगाच्या नकाशावर आणण्याचे श्रेय हे खरे तर विक्रम साराभाईंचेच आहे. १९७१ मध्ये विक्रम साराभाई निर्वतल्या नंतर मात्र पुढे थुंबा प्रक्षेपक केंद्राचे नामकरण विक्रम साराभाई अंतरिक्ष

केंद्र करण्यात आले. आणि इस्रोच्या संचालक पदाची धुरा शास्त्रज्ञ प्रा. डॉ. सतीश धवन यांच्याकडे आली. शिवाय अंतरिक्ष आयोगाची स्थापना करून निष्णात शास्त्रज्ञ डॉक्टर ब्रह्मप्रकाश हे विक्रम साराभाई अंतरिक्ष केंद्राचे संचालक झाले. पुढे प्रा. सतीश धवन यांच्या नेतृत्वाखाली इस्रोने आर्यभट्ट या कृत्रिम उपग्रहाची स्वतः निर्मिती करून रशियाच्या साह्याने १९७५ मध्ये अंतराळात प्रक्षेपित केला आणि दळणवळण क्षेत्रात क्रांती घडवून आणली. पुढे इस्रोने मागे वळून पाहिलेच नाही. जी माधव नायर, यु. आर. राव, कस्तुरीरंगन, राधाकृष्ण, किरण कुमार, सिवन, व आता डॉ. सोमनाथ सारखे अध्यक्ष लाभून त्यांच्या नेतृत्वाखाली भास्कर-१, भास्कर-२, रोहिणी, पल दूरसंचार आणि हवामान अंदाज दर्शविणारे उपग्रह यशस्वीपणे सोडण्यात आले. शिवाय १९८२ पासून इन्सॅट साखळीतील एकूण २१ उपग्रह अंतराळात विविध उपयोगांसाठी सोडवण्यात आले. आजही त्यातील बरेच उपग्रह कार्यरत असून भारतीयांना सेवा देत आहेत.



**भारतीय आवकाश संशोधन :**


भारताच्या अवकाश संशोधनास मोठी परंपरा आणि इतिहास आहे. पूर्वी आर्यभट्ट, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त, वराहमिहिर सारख्या खगोल आणि गणिती तत्ववेत्यांनी सैद्धांतिकरीत्या अवकाश संशोधनात मोठे योगदान दिलेले आहे. ती सैद्धांतिक परंपरा एकोणिसाव्या शतकापर्यंत आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत चालू राहिली. पण खऱ्या अर्थाने भारताच्या प्रायोगिक अवकाश संशोधनाला चालना मिळाली ती ५ ऑगस्ट १९६९ रोजी विक्रम साराभाई यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या भारतीय अवकाश संशोधन केंद्राच्या म्हणजेच इस्रोच्या माध्यमातून. इथूनच खऱ्या अर्थाने संशोधनाला वेग मिळायला सुरुवात झाली होती. तद्नंतर सहाच वर्षांनी १९ एप्रिल १९७५ रोजी स्वतंत्रपणे निर्माण केलेला आर्यभट्ट हा पहिला उपग्रह रशियाच्या प्रक्षेपण केंद्रातून प्रक्षेपित करण्यात आला. पुढे पाचच वर्षांनी १८ जुलै १९८० रोजी भारताने सॅटेलाइट लाँच व्हेईकल-३ ची यशस्वी चाचणी केली आणि त्याच्याच माध्यमातून इस्रोने रोहिणी हा उपग्रह पृथ्वीच्या कक्षेत स्थापन केला. तीन वर्षांनी लागलीच म्हणजे ३० ऑगस्ट १९८३ रोजी दूरसंचार, दूरदर्शनप्रसारण आणि हवामान अंदाज यासाठी इन्सॅट-१ बी चे प्रक्षेपण करण्यात आले. दहा वर्षांच्या कालावधीनंतर मात्र २० सप्टेंबर १९९३ रोजी पोलर सॅटेलाइट लाँच व्हेईकल (पी.एस.एल.वी.)ची यशस्वी चाचणी होऊन त्याच्या मदतीने आतापर्यंत ५० पेक्षा जास्त यशस्वी उड्डाणे करण्यात आली आहेत. पुढे बराच काळ गेला आणि महत्त्वकांक्षी प्रयोग आणि मोहिमांना सुरुवात झाली. २२ ऑक्टोबर २००८ रोजी इस्रोने पुढचे ऐतिहासिक पाऊल टाकून, ३८० किलो वजनाचे चांद्रयान-१ अवकाशात यशस्वीपणे सोडले. त्यानंतर सहाच वर्षांनी इस्रोने २४ सप्टेंबर २०१४ रोजी मंगलयान मंगळ ग्रहाच्या कक्षेत स्थापन केला आहे. भारत पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहास गवसणी घालण्यास यशस्वी ठरला. असे करणारा भारत हा चौथा देश ठरला होता. नंतर मात्र पाचच वर्षांनी २२ जुलै २०१९ रोजी दुसरी चांद्रयान मोहिमेतील चांद्रयान-२ चे प्रक्षेपण केले. पण चंद्रावर उतरण्यास अयशस्वी ठरले. यातूनच चुकांचा बोध घेत पुन्हा इस्रोने जिद्दीने चांद्रयान-३ ची निर्मिती करून १४ जुलै २०२३ रोजी यशस्वी प्रक्षेपण केले. लागलीच २३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३ सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरले आणि जगात भारताने इतिहास रचला. भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. भारताचे अवकाश संशोधन हे मुळात इतरांशी स्पर्धा करण्याचे नसून, स्वसंरक्षण आणि संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी आहे, असा संदेश जगाला देण्यात आला.

**भारतीय चांद्रयान मोहिम :**

अटल बिहारी पंतप्रधान असतांना १९९८ मध्ये पोखरण येथे अणुचाचणी करण्यात आली आणि सर्व जगाने भारतावर निर्बंध लादले. यामुळे एक मात्र झाले. भारतातील शास्त्रज्ञ स्वयंप्रेरित होऊन, प्रत्येक घटकाची निर्मिती भारतातच करू लागले आणि त्याचाच परिपाक म्हणून शास्त्रज्ञांनी श्रीहरीकोटा येथे अवकाश स्थळ उभारून स्व-प्रक्षेपित केंद्र उभारले आणि यशस्वीपणे चांद्रयान १,२,३ व मंगळयानाचे प्रक्षेपण करून भारत महासत्तांच्या ओळीत जाऊन बसला आणि जगाला भारताची दखल घेण्यास भाग पाडले. याचे मुख्य कारण म्हणजे इस्रो ही संस्था आणि त्यातील शास्त्रज्ञांची कष्ट, शिस्तबद्ध कार्यप्रणाली कारणीभूत ठरली. त्यामुळेच चंद्राच्या अतिशय अवघड अशा दक्षिण ध्रुवावर आपली मोहर उमटविणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. चांद्रयान १,२,३ ची प्रगती कशी झाली हे पाहणे निश्चितपणे रोचक ठरेल. चांद्रयान कार्यक्रम हा भारताचा प्रभावशाली कार्यक्रम होता. चंद्रयानाचे नामकरण संस्कृतमधून करण्यात आले. चंद्र म्हणजे चांद्र आणि यान म्हणजे वाहन किंवा क्राफ्ट. या कार्यक्रमात चांद्र परिभ्रमण, प्रभावक, सॉफ्ट लँडर आणि रोव्हर अंतराळयानाचा समावेश आहे. प्रत्येकी दोन ऑर्बिटर, लँडर आणि रोव्हरसह मोहिमा झालेल्या आहेत. दोन ऑर्बिटर यशस्वी झाले असताना चांद्रयान-२ मोहिमेचा भाग असलेले लँडर आणि रोव्हर चंद्राच्या पृष्ठभागावर कोसळले. दुसरे लँडर आणि रोव्हर मात्र चांद्रयान-३, २३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्रावर यशस्वीरित्या उतरले आणि दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे अंतराळयान उतरणारा भारत पहिले

राष्ट्र बनले व चंद्रावर उतरणारा चौथा देश बनला.

तसे पहता भारताचे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी चांद्रयान-१ प्रकल्पाची घोषणा केली होती आणि ही मोहीम खऱ्या अर्थाने भारताच्या संशोधन आणि कार्यक्रमास मोठी चालना देणारी होती. या मोहिमेची सर्वप्रथम कल्पना १९९९ साली इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसच्या बैठकीत मांडण्यात आली आणि पुढे मात्र २००० मध्ये ॲस्ट्रॉनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाने ही कल्पना पुढे नेऊन पाठपुरावा केला. तद्नंतर लगेचच भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोने राष्ट्रीय चंद्र मोहीम टास्क फोर्सची स्थापना करून निष्कर्ष काढला, की भारताकडे पुरेसे कौशल्य आणि ज्ञान आहे. पुढे २००० मध्ये अवकाश विज्ञान, पृथ्वी विज्ञान या क्षेत्रातील १०० हून अधिक भारतीय शास्त्रज्ञ, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, खगोल भौतिकशास्त्र, अभियांत्रिकी आणि दळणवळण विज्ञानावर सखोल चर्चा केली आणि मोहिमेला टास्क फोर्स ने मान्यता दिली. लागलीच सहा महिन्यानंतर वाजपेयी सरकारने या मोहिमेला मंजुरी दिली.



एकदा मंजुरी मिळाल्यानंतर मात्र इसरोतील शास्त्रज्ञ अहोरात्र ५-६ वर्ष मेहनत करून झटले आणि महत्त्वकांक्षी चांद्रयान-१ ची निर्मिती केली. यामध्ये ऑर्बिटर आणि इम्पॅक्टरचा समावेश होता. उड्डाणासाठी आता ते तयार होते. लागलीच भारताने २२ ऑक्टोबर २००८ रोजी पी.एस.एल.व्ही.एक्स.एल. रॉकेट वापरून आंध्रप्रदेशमधील श्रीहरीकोटा या सतीश धवन अंतराळ केंद्रातून चांद्रयान-१ यशस्वीपणे प्रक्षेपित केले. यामध्ये भारतीय शास्त्रज्ञांनी चंद्राचा पृष्ठभागाचा शोध घेण्यासाठी स्वदेशी आणि स्वयंचलित तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यामुळे अंतराळ कार्यक्रमाला मोठीच चालना मिळाली होती. पुढे ८ नोव्हेंबर २००८ रोजी हे चांद्रयान-१ चंद्राच्या कक्षेत प्रवेशित झाले. पुढे १४ नोव्हेंबर २००८ रोजी मून इम्पॅक्ट प्रोब चांद्रयान-१ ऑर्बिटर पासून वेगळे झाले आणि अतिशय काटेकोरपणे नियंत्रित करीत दक्षिण ध्रुवावर धडकले आणि शिवाय प्रोबशॅकलेटन क्रेटर जवळ आढळून या ठिकाणाला जवाहर पॉईंट म्हणून नाव देण्यात आले. या मोहिमेमुळे इसरो ही चंद्राच्या पृष्ठभागावर पोहोचणारी पाचवी राष्ट्रीय अवकाश संस्था बनली.

या प्रकल्पाला अंदाजी ४००कोटी रुपयांचा खर्च आला होता. या दोन वर्षाच्या कालावधीत चंद्राच्या पृष्ठभागाचे सर्वेक्षण करणे, पृष्ठभागावरील रासायनिक रचने सोबतच त्रिमिती स्थलवृत्तिचा नकाशा तयार करणे, हाही एक हेतू होता. हे ध्रुवीय प्रदेश विशेष सारस्यपूर्ण असून, तेथे पाण्याचा बर्फ असू शकतो असा कयास आहे. शिवाय चंद्राच्या मातीत पाण्याचे रेणू असावेत असेही शास्त्रज्ञांना वाटत आहे. जवळजवळ एका वर्षानंतर ऑर्बिटरमध्ये अनेक तांत्रिक समस्या निर्माण होऊ लागल्याने, २८ ऑगस्ट २००९ रोजी त्याचे संप्रेषण थांबविण्यात आले आणि इस्रोने अधिकृतपणे चांद्रयान-१ मोहीम संपल्याचे जाहीर केले. तसे पाहता चांद्रयान-१ हे साधारण एक वर्षच चालले. पण पाण्याचा शोधासह इतर बहुतेक उद्दिष्टे चांद्रयान-१ या मोहिमेने साध्य केले होते, एवढे मात्र निश्चित.

चांद्रयान-१ ही मोहीम बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाली होती. बऱ्यापैकी चंद्राची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न झाला होता. शिवाय दक्षिण ध्रुवावर प्रोबही धडकवला होता. त्यामुळे इस्रोतील शास्त्रज्ञांचा हुरूप आणि उत्साह वाढला होता. त्यामुळे लागलीच चांद्रयान-२ या मोहिमेची आखणी होऊ लागली. चांद्रयान-२ खूपच महत्त्वकांक्षी प्रकल्प होता. कारण यावेळी प्रत्यक्षात लँडर दक्षिण ध्रुवावर भारताला उतरावयाचे होते. कारण जेथे आजपर्यंत कुठलेही राष्ट्र आपले आंतराळ यान उतरू शकले नव्हते. ही मोठीच अवघड बाब होती. पण भारतीय शास्त्रज्ञांनी हे आव्हान स्वीकारले होते. चांद्रयान-२ या मोहिमेत ऑर्बिटर, लँडर आणि रोव्हरचा समावेश होता. खरे तर, चांद्रयान-१ ऑर्बिटरच्या अपयशानंतर चांद्रयान-२ ऑर्बिटरने इस्रोला आधुनिक कॅमेरे आणि उपकरणांसह सक्षम केले होते. या मोहिमेची प्राथमिक उद्दिष्टे चंद्रावरील मऊ जमिनीवर रोव्हर चालविणे हा असला, तरी त्यासोबतच चंद्राचा पृष्ठभाग त्याचे बाह्य मंडल, खनिजे आणि पाण्याचा, बर्फाचा अभ्यास करणे हाही होता. मुख्य म्हणजे या मोहिमेतच ऑर्बिटर सोबत असलेल्या लँडरचे नाव विक्रम साराभाई यांच्या स्मरणार्थ विक्रम ठेवण्यात आले होते, तर रोव्हरला प्रज्ञान हे नाव ठेवले होते. ऑर्बिटर, लँडर आणि प्रज्ञान हे तिघे मिळून साधारण ३,८५० कि.ग्र. एवढे होते. याशिवाय ऑर्बिटरने दोन उपकरणांसह इतर आठ उपकरणे की जे भूपृष्ठाचा अभ्यास करतील, असे वाहून नेले होते. ऑर्बिटर, लँडर आणि प्रज्ञान हे घन तसेच द्रव इंधनावर स्वयंचलित होते, तर प्रज्ञान या रोव्हरमधील उपकरणे ही सौर ऊर्जेवर अवलंबून स्वयंचलित होती. लँडर आणि रोव्हर दोघांनाही एका चंद्र म्हणजेच पृथ्वीचे १४ दिवस एवढ्यासाठी चालू करणे अपेक्षित होते. कारण त्यांच्याकडे कुठलेही किरणोत्सारी उष्णप्रवाहित करणारी यंत्रणा नव्हती हे संपूर्ण ऑपरेशन सौरऊर्जेवरच अवलंबून होते.

हे चांद्रयान-२, १४ जुलै २०१९ रोजी प्रक्षेपित करण्यात आले आणि विविध लंबवर्तुळाकार टप्पे ओलांडत २० ऑगस्ट २०१९ रोजी त्यांने चंद्राची कक्षा गाठली. पुनश्च परिभ्रमण कमी केल्यानंतर २ सप्टेंबर २०१९ रोजी विक्रम वेगळे करण्यात आले आणि त्याने अंतिम कक्षा (९५ कि.मी. ÷११९ की.मी.) गाठली. पुढे विक्रमची शक्ती क्षती टप्पा ७ सप्टेंबर २०१९ रोजी सुरू करण्यात येऊन उतरताना आणि लँडिंग करताना ऑनबोर्ड संगणकाचे विक्रम लँडरवर पूर्णतः नियंत्रण होते. नियोजित वेळेत आणि उद्दिष्टांनुसार उतरणी यावेळी गंभीर ब्रेकिंग प्रक्रिया घडत असतांनाच २.१ कि.मी. उंचीवर पोहोचल्यावर विक्रम लँडर विचलित झाला. त्यानंतरच्या क्रॅश लँडिंगनंतर त्याचा पृथ्वीवरील इस्रोच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटला. तो क्षण खूपच निराशदायक होता. अवघा भारत हळहळत होता.

(उत्तरार्ध पुढील अंकात...)

# मनुस्मृती : धार्मिक व सामाजिक दहशतीचे मूळ



बी.जी. वाघ

**मनुस्मृतीत प्रत्येक अपराध्यास कठोर शिक्षा आहे; परंतु ती फक्त शूद्र अतिशूद्रांना. ब्राह्मण या व्यवस्थेतत अनघ्या आहे. मनुस्मृतीने वंशहत्येचे पातक केले; परंतु त्याच्या ग्रंथात त्याला किंवा त्याच्या वारसदारांना कुठलीही शिक्षा झालेली नाही. आजही ते सत्तेत आहेत. कालही सत्तेत होते. आजा जातियता अस्तित्वात राहिली नाही. मनुस्मृती कालबाह्य झालेली आहे. एवढेच नव्हे, तर याच मनुस्मृतीला शैक्षणिक अभ्यासक्रमातही त्यांनी काही ठिकाणी समाविष्ट केले आहे. तरीदेखील जनतेने निषेध केलेला नाही. कारण लोकांना धार्मिक गुंतीत गुंतवून ठेवणे हे त्यांचे पिढीजात कौशल्य आहे. एकप्रकारे दहशतवाद आहे.**

भारतातील सर्व समस्यांचे मूळ येथील धर्मव्यवस्था आहे. भारतातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक वा राजकीय व्यवस्थेत जे शोषण, जुलूम वा हिंसा आहे त्याचे कारणदेखील धर्मच आहे. जगात सगळ्यात जास्त लैंगिक अत्याचार भारतातच का होतात किंवा येथील प्रशासनव्यवस्था इतकी भ्रष्ट का आहे, याचे कारणही आपल्या धर्मव्यवस्थेच आहे. भारत देश इतका गरीब का आहे. त्याची वृत्ती, प्रवृत्ती, मूल्यव्यवस्था विकासात्मक नाही. आपली धार्मिकता सर्जनशील नाही, ती विध्वंसक आहे. खऱ्या धर्माचा संबंध आपल्या बौद्धीक आणि नैतिक विकासाशी असतो; परंतु आपला धर्मच जर आपल्याला अनैतिकता शिकवत असेल किंवा आपल्या ज्ञानाचे मार्ग रोखून आपला बौद्धीक विकासच होऊ देत नसेल, तर त्याला कोणता धर्म म्हणता येईल. मनुस्मृतीप्रणित धर्म असा आहे, त्यालाच ते सनातन धर्म म्हणतात.





वैदिक तत्त्वज्ञानात, ईशावास्य उपनिषदादी धर्मग्रंथात सगळीकडे चराचरात तेच एक 'ईशतत्व', 'ब्रह्म' आहे असा उद्‌घोष आपल्याला दिसतो; परंतु ते 'ईशतत्त्व' अस्पृश्यात, शूद्रात किंवा अतिशूद्रात का नाही याबाबतीत कुठला धर्मग्रंथ काही सांगत नाही. त्यांनी कधी समतेचे, समान संधीचे, मानवी मूलभूत अधिकारांचे तत्त्व कधीही मान्य केलेले नाही. 'ब्रह्म सत्य जगनमिथ्या' मध्ये सांगून मानवी समतेला, स्वातंत्र्याला त्यांनी असत्य ठरविले आहे. धर्म जर मानवी अस्तित्वालाच नकार देत असेल, तर तो धर्म नाही. कल्पनेचे एक मायाजाल आहे. असे सांगितले जाते, की एकदा आद्य शंकराचार्यांच्या मागे पिसाळलेला हत्ती लागला तेव्हा ते पळू लागले. तेव्हा लोक हसले. म्हणाले, की हत्ती पण माया आहे आणि माझे पळणेपण माया आहे. प्रत्यक्षात हत्ती अस्तित्वात नाही आणि मी पण नाही. दिसणारे, अनुभवाला येणारे हे जग म्हणजे निव्वळ माया आहे. वैदिकात आणि बुद्धात हा मूळ संघर्ष आहे. बुद्ध मानवी अस्तित्वाची चर्चा करतात. त्याच्या सुखदुःखांची, विकासांची काळजी वाहतात. जगात दुःख आहे हे सनातन आहे.

**धर्म की सैतानाचा बाजार :**

बुद्धाचा सनातन धर्म आणि शंकराचार्यांच्या सनातन धर्मात असा मूलतः फरक आहे. जग जर माया आहे, तर अस्पृश्यतेचे, वर्णव्यवस्थेचे समर्थन कसे करू शकता, असा प्रश्न स्वामी विवेकानंदांनीही विचारलेला आहे. आद्य शंकराचार्य जातीयवादी होते, असेही त्यांनी म्हटलेले आहे. स्वामी विवेकानंदांनी तत्कालीन धर्ममार्तंडांनाही हा प्रश्न विचारलेला होता. ते सर्व म्हणाले, 'धर्म वेगळा आणि व्यवहार वेगळा. त्याची गल्लत कशी करता येईल.' हाच तो दांभिकपणा सर्व धार्मिक व्यवस्थेत भरून आहे. उच्च धार्मिक अध्यात्म आणि अधम वर्तन हे या व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. जगात कुठलाही धर्म आपल्या धर्मबांधवांना पायदळी तुडवत नाही. त्यांचा छळ करीत नाही. त्यामुळे विवेकानंद म्हणाले, हा धर्म आहे की सैतानाचा बाजार. त्याचा माणसांच्या सुखदुःखांशी काहीच संबंध नाही. उच्चवर्णीयांचा धर्म वेगळा, त्यांची मानसिकता वेगळी. वैश्विक शांततेचे तत्त्वज्ञान आपल्याच धर्मात आहे, असे जगभर मार्केटींग करणारे त्यांचे अध्यात्मिक गुरू, बाबा यांचे जगही वेगळे. त्यांचे लक्षावधी भक्त आणि अगणित संपत्ती या अध्यात्मिक भूलभूलैय्याचेच एक प्रॉडक्ट आहे. त्याला अध्यात्मिक भांडवलवाद (Spiritual Capitalism) म्हणता येईल. हिंदू राष्ट्रवादाचे समर्थन करणारा हा वर्ग आहे. त्याची मानसिकता मनुस्मृतीप्रणितच आहे. आहे ती सामाजिक व धार्मिक विषमता टिकवणे आणि वाढवणे

नि त्यातून राजकीय सत्ता हस्तगत करणे हा त्यांचा हेतू असतो.

**हिंदुत्ववाद हे कट्टरपंथीयांचे तत्त्वज्ञान :**

धार्मिक व सामाजिक विषमतेतूनच आर्थिक व राजकीय विषमता वाढते असे डॉ. आंबेडकर म्हणाले आहेत. धर्मग्रंथच विषमतेचे समर्थन करतात. एवढेच नव्हे, तर मनुस्मृतीसारखे ग्रंथच सामाजिक विषमतेची निर्मिती करतात. दंडशक्तीद्वारे ती हाडीमासी रुजवतात. डॉ. आंबेडकरांनी या मानवद्रोही धर्मग्रंथांची सामाजिक व धार्मिक मान्यता रद्द करावी, असे आपल्या 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट्स' मध्ये लिहिले आहे. त्याची आजही आवश्यकता आहे; परंतु दुर्दैवाने आजही येथील आमदार, खासदार रस्त्यावर हनुमान चालिसा म्हणण्याचा आग्रह धरतात. त्यांचा मुख्य उद्देश लोकांमध्ये धार्मिक कट्टरता निर्माण करणे हाच असतो. हिंदुत्ववाद हे कट्टरपंथीयांचे तत्त्वज्ञान आहे. ते मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथाचेच वारसदार असतात, हे उघड आहे. विशेष म्हणजे ते भारतीय घटनेने दिलेली शपथच घेत असतात; परंतु त्यांचे वर्तन पूर्णतः घटनाविरोधी असते. हा विसंवाद भारताच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचा विशेष आहे. आजच्या कट्टरतावादी राजकारणात त्यामुळे धर्माची, धर्मग्रंथांची चिकित्सा करणे कठीण झाले आहे. हा संघर्ष संविधानिक मूल्ये आणि सनातन धर्म यामध्येच आहे. सुदैवाने संविधानिक मूल्यांमुळेच देशातील स्त्री शूद्रांना स्वातंत्र्य मिळालेले आहे. घटना बदलू पाहणाऱ्या लोकांना या जागृत झालेल्या जनतेकडून प्रतिकार निश्चितच होईल. कारण स्वातंत्र्य हे कुठल्याही धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे; परंतु भारतीयांच्या अध्यात्मिक गुलामगिरीमुळे स्वातंत्र्य आणि श्रद्धा यांच्या सीमारेषेवर देश कायम गोंधळलेल्या अवस्थेत राहिला आहे. त्यामुळे आपली सामाजिक व राजकीय ध्येये अद्यापही निश्चित करता आलेली नाहीत.

**मनुस्मृतीत मानवी कल्याणाचा अभाव :**

धर्माच्या नावाने अधर्माचे देव्हारे माजवले जातात. भारतात धर्म नव्हे तर अंधश्रद्धाच धर्म म्हणून पूजल्या जातात. वास्तविक हिंदूधर्म हा बहुदेववादी धर्म आहे आणि त्याचा कुठलाही एक धर्मग्रंथ नाही. सनातनी ब्राह्मणीधर्म हाच कट्टरता शिकवतो. कारण त्याचे मूळ मनुस्मृतीत आहे. मनुस्मृतीला धर्मग्रंथही म्हणता येणार नाही. कारण मानवी कल्याणाचा तिथे कोठलाही विचार नाही. आहे ते एक सत्ताशास्त्र त्याचे मूळ प्रतिक्रांतीत आहे. बहुसंख्य समाजाला शूद्र अतिशूद्र अशा विभागात बंदिस्त करून त्यांना मानसिक, बौद्धीक, नैतिक आणि भौतिकदृष्ट्या पंगू करून त्यांना आपला दास करण्याचा यामागे हेतू आहे. ती एक ईश्वरीय व्यवस्था आहे अशी त्यांची समजूत करणे हे एका मोठ्या बौद्धीक षड्यंत्राचे काम आहे. त्यासाठी अनेक शतके एका बुद्धीमान वर्गाने अहोरात्र प्रयत्न केले आहेत. अनेक दैवी दंतकथा निर्माण करून लोकांना भ्रमित केले आहे. त्यांना शिक्षणाचा अधिकारच नाकारला गेल्यामुळे त्यांची झालेली बौद्धीक फसवणूक त्यांच्या कधी लक्षातच आली नाही. ब्रिटिशांनी येथल्या मागासलेल्या बहुजनांना शिक्षणाची दारे उघडी केल्यामुळेच ही अधर्मी व्यवस्था त्यांच्या लक्षात आली; परंतु तरीही ते मनुस्मृतीच्या प्रयत्नातून मुक्त झालेले नाहीत.

मॅथ्यू अरनॉल्ड यांनी म्हटले आहे, ''हिंदू हे दोन वेगळ्या जगात भटकत आहेत. एक मृत आणि दुसरे जन्माला येण्याची शक्यता नसलेले!'' धार्मिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा प्रश्नच नाही. ती अभिमानाने मिरवते हेच हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व आहे.त्यामुळेच भारत अनेक वर्षे पारतंत्र्यात राहिला. सामाजिक आणि धार्मिक पारतंत्र्यात तो होताच. ब्रिटिश दीडशे वर्षे येथे राज्य करून शकले. याचेही कारण येथील जात आणि धर्मव्यवस्थाच होय. निराद चौधरी यांनी हिंदूंना 'तक्रार न करणारे गुलाम' असेच (Uncomplaining Slaves) म्हटले आहे. त्यामुळेच मनुस्मृतीप्रणित व्यवस्थेला त्यांनी कधी प्रतिकार केला नाही. ''स्वातंत्र्य म्हणजे माणसाचे माणसावरील वर्चस्व संपवणे होय,'' अशी डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्याची व्याख्या केली आहे; परंतु सनातन धर्मव्यवस्थेत मात्र एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर जन्मजात श्रेष्ठत्व मिळवावे आणि दुसऱ्याने कायम त्याचे गुलाम राहावे, अशीच व्यवस्था आहे. बुद्धाने या व्यवस्थेला नाकारले. समता, स्वातंत्र्य, बंधूता नाकारतो तो सनातन धर्म त्याचे मुळ मनुस्मृती आणि तथाकथित धर्मग्रंथात आहे. बुद्धाने त्यामुळेच हे सर्व धर्मग्रंथ नाकारले आहेत. जे. कृष्णमूर्ती नेहरूंशी चर्चा करताना म्हणाले, की भारतात धर्म कोठे आहे, आहेत ती धर्मपीठे. धर्म बुद्धकाळातच होता. त्याचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. बुद्धकाळात भारताची नैतिक, अध्यात्मिक आणि बौद्धीक प्रगती शिखरावर पोहोचली होती. भारतीय धर्म व तत्त्वज्ञानाचे जे अधःपतन झाले आहे, त्याचे विकृतीकरण झाले आहे. त्यामागे एक सांस्कृतिक आणि धार्मिक प्रतिक्रांतीचा उठाव आहे, असे डॉ. आंबेडकर क्रांती-प्रतिक्रांती या ग्रंथात पुराव्यासह नमूद करतात.

**फॅसिझम हा मनुस्मृतीतूनच आला :**

हिंदूधर्म हा बौद्ध धर्माचेच अवनत रूप आहे, असे स्वामी विवेकानंदांनीही म्हटले आहे. सर्व धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष मूलतः राजकीयच असतात. धर्माच्या नावाने सत्तास्थाने बळकावणे अधिक सोपे असते. धर्माचा राजकारणात उपयोग करणे तेव्हापासूनच सुरू आहे. सम्राट अशोकाच्या नातवाचा खून करून पुष्यमित्र शृंगाने प्रतिक्रांती केली. ती बौद्ध आणि वैदिकांच्या संघर्षातून झाली. मनुस्मृती त्या संघर्षाला दिलेले धार्मिक आणि तात्विक अधिष्ठान आहे. तो मूलतः राजकीय ग्रंथ किंवा सत्ताशास्त्र आहे. वंशाधिष्ठीत सत्ता कायमस्वरूपी राबवणे हा त्याचा हेतू आहे. स्वतःच्या जन्मजात श्रेष्ठत्वाची आणि शुद्ध आर्यन वंशांची ती घोषणा आहे. नित्शेला हा ग्रंथ त्यामुळेच आवडला. हिटलरचा फॅसिझम मूलतः मनुस्मृतीतूनच आलेला आहे. शूद्र हे सेवेसाठीच जन्मलेले आणि स्त्रिया फक्त वंशवाढीसाठीच आहेत. त्यांना कुठलाही अधिकार नाही. त्यामुळेच स्त्री शूद्रांसाठी आत्यंतिक तिरस्कार या ग्रंथात आढळतो. शूद्रांचा पदोपदी अपमान आणि त्यांच्यावर लादलेल्या शिक्षा हा मनुस्मृतीचा विशेष आहे.

**ब्राह्मणी ग्रंथांचे समर्थन म्हणजे धड आपले डोके दुसऱ्याचे :**

डॉ. आ.ह. साळुंखे आपल्या भूमिका स्पष्ट करताना लिहितात, ''खरे म्हणजे हिंदू म्हणून राहायचे की नाही हा प्रश्न असंबंध आहे. ज्या ग्रंथांशी बहुजनांचा मानसन्मान निगडित आहे किंबहूना जे ग्रंथ बहुजनांची विटंबना करतात त्या ग्रंथांना विरोध करायचा की नाही, हा प्रश्न आहे.'' आपल्या खांद्यावर आपलेच मस्तक असले पाहिजे.

शिकून, सुसंस्कृत झाल्यावरही बहुजन या ग्रंथांना डोक्यावर घेत असतील, तर त्यांचे डोके तपासले पाहिजे. सद्याच्या 'रामचरित मानस'चा मुद्दाही असाच आहे. त्याने आपल्या ग्रंथात स्त्री शूद्रांची यथेच्छ निंदा केली आहे. त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे जे ब्राह्मण नाहीत ते सर्व शूद्रच आहेत. ईश्वरानेच तुम्हाला शूद्र बनवले आहे आणि जर तुम्ही मनुस्मृतीतील आज्ञांचे काटेकोर पालन केले, तर पुढील जन्मी तुम्हाला उच्चवर्णीय म्हणून जन्म मिळेल. अन्यथा पुन्हा शूद्र म्हणूनच जन्म घ्यावा लागेल. त्यामुळे निमूटपणे आम्ही म्हणू तोच धर्म आणि त्याच धर्माज्ञा तुम्हाला पाळाव्या लागतील. हा त्यांचा कर्मसिद्धांत आहे. पुढे त्याला अधिक सुखकर रूप देऊन तो गीतेत आणलेला आहे.



**मनुस्मृती ही प्रतिक्रांतीचे प्रतिक :**

पुष्यमित्र शुगांच्या काळातच ही मनुस्मृती कुणी भार्गव नावाच्या ब्राह्मणाने लिहिलेली आहे. ती प्रतिक्रांतीचा सूड घेण्याच्या भावनेतून लिहिली आहे. शूद्रांना जसा ज्ञानाचा अधिकार नाकारलेला आहे तसाच हाती शस्त्र घेण्याचा अधिकारही नाकरलेला आहे. यावरूनही या प्रतिक्रांतीचे स्वरूप लक्षात येते. या प्रतिक्रांतीचे स्वरूप धार्मिक आणि सांस्कृतिक वाट असले तरी त्या धर्मांध ब्राह्मणांनी केलेला तो राजकीय उठावच होता, हे उघड आहे. सम्राट अशोकाच्या काळात ब्राह्मणांना महत्त्व मिळत नव्हते, हे उघड आहे. सर्व सत्ता होती बौद्धांचीच. बुद्धाने यज्ञसंस्कृती नाकारली होती. त्यामुळे यज्ञातून मिळणारे आर्थिक लाभ ब्राह्मणांना नाकारले गेले होते. बुद्धाने वेद आणि तत्कालीन सर्व ब्राह्मणी ग्रंथ नाकारले. त्यामागील त्यांची मानवकेंद्री तर्कशुद्ध भूमिका स्पष्ट आहे. माणसाच्या अस्तित्वाची तर्कशुद्ध जाणिव म्हणजेच विद्रोह आहे. सर्व धर्मग्रंथ, धर्म आणि धार्मिक तत्त्वज्ञान मानवनिर्मित आहेत. त्यामुळेच त्यांनी वर्णाश्रमधर्माला कडवा विरोध केला. माणसापेक्षा अमूल्य असे दुसरे काहीही नाही, हीच बुद्धाची भूमिका होती. त्यामुळे सर्व ब्राह्मणी ग्रंथ हे पाखंडी आहेत, हे त्यांनी जाहीर केले. बुद्धांचे हे तत्त्वज्ञान आणि त्यांचा धर्म नष्ट केल्याशिवाय वर्णाश्रमधर्माची स्थापना करता येणार नाही, हे त्यांच्या लक्षात आले. बुद्धानंतर निर्माण झालेले सर्व वैदिक तत्त्वज्ञान हे बुद्धाला विरोध करण्यासाठीच निर्माण झाले, हे आपल्या लक्षात येते. त्यांना असे पाखंडी धर्मग्रंथ निर्माण करून स्त्री शूद्रांची सर्वाथाने पारध केली. त्यांनी त्यांना सामाजिक, धार्मिक, आर्थिकदृष्ट्या गुलाम केलेच, तसेच मनानेही गुलाम केले. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सत्तेवर आहे ते येथल्या बहुजनांच्या मानसिक बंदीस्तीकरणामुळेच (Conditioning) त्यामुळे त्यांना गुलामगिरीही प्रिय आहे. शूद्र अतिशूद्रांमध्ये उभी आडवी फूट निर्माण करून ते आपसातच संघर्ष करत राहतील, अशीही व्यवस्था त्यांनी निर्माण केली. त्यामुळे ते कायम सत्तेत राहिले.

**धार्मिक राष्ट्रवाद वरचढ होतोय :**

मनुस्मृतीचा श्लोक (४.९८) सांगतो, की वेदांचे अध्ययन करताना शूद्र जवळपासही असू नये. शूद्राला ज्ञान देऊ नये. त्याला धर्माचा उपदेश करू नये. जो शूद्राला तसे करील तो मनुष्य त्या शूद्रासह असंवृत्त नावाच्या नरकात बुडेल. ही धर्माज्ञा म्हणावी, की दहशत. शूद्राला ज्ञान द्यावयाचे नाहीच तरीही ज्ञानाचा एखादा कण चुकून त्याच्या कानावर पडण्याची शक्यता निर्माण झाली, तरी तसे न होऊ देण्याची खबरदारी घ्यावी. ब्राह्मणांनी शूद्रांना उपनयन करण्याचा अधिकार नाकारला आणि त्याबरोबरच ज्ञानबंदी लादली. ज्ञानाच्या अभवाने शूद्र खचले हे म. फुल्यांना अधिक स्पष्टपणे कळाले. म्हणूनच ते शिक्षणाकडे वळले. ब्रिटिशांची सत्ता नसती, तर पुण्यातल्या ब्राह्मणांनी महात्मा फुल्यांना हत्तीच्या पायीच दिले असते. अशा या अमानुष धर्मव्यवस्थेला जे आपला गौरवास्पद वारसा मानतात व त्याला राष्ट्रअभ्युदयाशी जोडतात. धार्मिक राष्ट्रवाद आणून सत्तेवर येऊ पाहतात ते पुन्हा एकदा या राष्ट्राला गुलामगिरीत लोटतील, यात शंका नाही. या देशातील तथाकथित शूद्र अतिशूद्रांना याची जाणिव होऊ नये हे लज्जास्पद आहे.

**हिंदुत्व हे ब्राह्मणत्व :**

मनुस्मृतीत प्रत्येक अपराध्याला कठोर शिक्षा आहे; परंतु ती फक्त शूद्र अतिशूद्रांना. ब्राह्मण या व्यवस्थेत अवघ्य आहे. मनुस्मृतीने वंशहत्तेचे पातक केले; परंतु त्याच्या ग्रंथकर्त्याला किंवा त्याच्या वारसदारांना कुठलीही शिक्षा झालेली नाही. आजही ते सत्तेत आहेत आणि कालही ते सत्तेत होते. आता जातियता अस्तित्वात राहिली नाही. मनुस्मृती कालबाह्य झालेली आहे. एवढेच नव्हे, तर याच मनुस्मृतीला शैक्षणिक अभ्यासक्रमातही त्यांनी काही ठिकाणी समाविष्ट केले आहे. तरीदेखील जनतेने निषेध केलेला नाही. कारण लोकांना धार्मिक गुंगीत गुंतवून ठेवणे हे त्यांचे पिढीजात कौशल्य आहे. मनुस्मृतीचे वारसदार या ग्रंथात प्रा. नरहर कुरूंदकरांनी हे वारसदार अतिशय बुद्धीमान आहेत, हे स्पष्ट केलेले आहे. फॅसिझमचे मूळ मनुस्मृतीत आहे. जर्मन वंशवादी विचारवंत नित्शेने मनुस्मृतीपासूनच प्रेरणा घेतलेली आहे आणि पुढे त्यातूनच हिटलर जन्माला आलेला आहे. मुख्य म्हणजे मनुस्मृतीचे समर्थक हिटलरचेही समर्थक आहेत; परंतु ते स्वतःला प्रखर राष्ट्रवादी समजतात, तसेच आपणच विश्वगुरू

आहोत, असेही मानतात. वास्तविक हा सनातनी ब्राह्मणीधर्म कधीही राष्ट्रधर्म होऊ शकत नाही. कारण मूलतः तो वंशवादी आहे. हे बाह्य जग जाणते त्यामुळे तो विश्वगुरूही होणार नाही. ते सामर्थ्य फक्त बौद्ध धर्म आणि संस्कृतीतच आहे. जर्मन तत्त्वज्ञ हे गेल म्हणतो, ''हिंदूत्व हे दुसरे तिसरे काही नसून ब्राह्मणत्त्वच आहे. तो एखाद्या धर्माची निर्मिती करण्याचा एक मिथकीय (MYTH) प्रकार आहे. हे गेलला भारतीय समाजव्यवस्थेची फारशी माहिती नव्हती तरी त्याने लिहिले.'' हिंदू लोक मुंगीवर सुद्धा पाय देणार नाहीत. पण जेव्हा गरिब भटके लोक भूकेने कळवळत असतात तेव्हा मात्र त्यांच्यात काहीच फरक पडत नाही. विशेषतः हे 'ब्राह्मण' लोक अनितिमान असतात. इंग्रजांच्या अहवालाप्रमाणे ते निव्वळ खातात आणि झोपतात. त्यांच्या शास्त्राप्रमाणे ज्या गोष्टींना प्रतिबंध केलेला नाही. त्या सर्व बाबतीत ते आपल्या नैसर्गिक प्रेरणांना अनुसरून अनिर्बंधपणे वागतात. जेव्हा कधी ते एखाद्या सामाजिक गोष्टीत भाग घेतात तेव्हा ते हावरटपणाचे, कपटीपणाचे, भोगवृत्तीचे प्रदर्शन करतात. हे प्रत्यक्ष पाहूनच संबंधितांनी लिहिले आहे, हे उघड आहे. त्यांनी ज्ञानसाधना खूप थोडी केली; परंतु कल्पनारम्य अद्‌भूत ग्रंथ खूप लिहिले ते ब्राह्मण श्रेष्ठत्वांनी भरलेले आहेत. ज्याला कुठलाही वास्तविक, प्रत्यक्षदर्शी पाया नाही असे धार्मिक तत्त्वज्ञान त्यांनी उभे केले ज्याला तर्क आणि विवेकाचा पाया नव्हता. वेद, उपनिषदे, धर्मसूत्रे, रामायण, महाभारत, गीता या सर्व धर्मग्रंथांचा पाया विषमता आणि वंशवादच आहे. राम, परशुराम हे मनुस्मृतीचे कट्टर समर्थक आहेत. कारण ते जन्माने ब्राह्मण आहेत.

**हिंदूंचे धर्मग्रंथ मनुस्मृतीचे वाहक आहेत :**

कृष्ण उदारमतवादी आहे. कारण तो ब्राह्मण नाही. श्रीमद भगवत गीतेच्या काही अध्यायांवर बौद्ध धर्माची छाया आहे, असे काही पाश्चात्य विद्वानांनी स्पष्ट केले आहे. डॉ. आंबेडकरांनीदेखील तेच सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. रामायण, महाभारतात आणि गीतेतही वारंवार बदल करण्यात आले आहेत. त्यामागील मुख्य हेतू वर्णव्यस्थेचे समर्थन आणि संवर्धन हाच आहे. गीतेला वेदांताचा सार समजले जाते, तो वेदांत काय आहे? मूळात ती यज्ञसंस्कृती आहे. बहुतेक देवदेवता आणि रामायण, महाभारतातील महत्त्वाची पात्रे या यज्ञातून जन्माला आलेली आहेत. म्हणजेच नियोग पद्धतीतून जन्माला आलेली आहेत. जन्मदाते ब्राह्मण आहेत. ब्राह्मण हा सर्व वर्णाचा प्रजापती जन्म देणारा आहे व तो श्रेष्ठ आहे, असे शांतीपर्वात म्हटले आहे. आपल्यापेक्षा बलिष्ठांना, उच्चवर्णीयांना नेमके सांगायचे झाल्यास ब्राह्मणांना स्व स्त्री भोगण्यास देण्याची चाल होती. स्त्री एक वस्तू आहे आणि तशाच पद्धतीने तिची विल्हेवाट रामायण, महाभारतातील अनेक प्रसंगात केलेली आपल्याला दिसून येते. स्त्रीच्या अग्रोपभोगाचा अधिकार ब्राह्मणांचा आहे, असे अश्वलायन सूत्र सांगते. तसे दंडक मनुस्मृतीतही आहेत. या स्त्रिया अर्थातच क्षत्रियांच्या, वैश्यांच्या, शूद्रांच्या आहेत. दुसऱ्या बाजीरावाने ही पद्धत अवलंबलेली होती. पेशवाईचा राजधर्म मनुस्मृतीच होता.

**लव्ह जिहादचे कायदे घटनाबाह्य :**

शूद्रांच्या स्त्रियांप्रमाणेच त्यांच्या संपत्तीवर ब्राह्मणांचाच अधिकार आहे, असे मनुस्मृती स्पष्टपणे सांगते. मनुस्मृतीतील श्लोक ३.१८ व ३.१९ प्रमाणे स्त्री ही भोगासाठीच असते आणि शूद्र स्त्रीला रखेल म्हणून ठेवावे, असे निर्देश आहेत. स्त्री शूद्रांविषयीचे मनुस्मृतीचे दंडक अत्यंत किळसवाणे आहेत. त्यांची आत्मसन्मानाची भावनाच मारून टाकणे हा मुख्य उद्देश आहे. केरळमध्ये नंबूद्री ब्राह्मणांकडे नायर स्त्रीयांना जावे लागत असे आणि त्या ब्राह्मणाचे समाधान होईपर्यंत ही पहिली रात्र लांबत असे. अशी ही सनातन व्यवस्था कुठल्याही प्रकारे राष्ट्रीय गौरवाची वा सन्मानाची बाब होऊ शकत नाही. तो वारसा पूर्णतः नाकारणे आवश्यक आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला मात्र तो अभिमानास्पद वाटावा हे साहजिकच आहे. स्त्रीयांना जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हतेच. त्याचे कारण आंतरजातीय विवाहामुळे वर्णव्यवस्था धोक्यात येणारी होती. स्त्रीयांवर त्यामुळे असंख्य बंधने आली. डॉ. आंबेडकरांनी The woman and courts revolution या आपल्या पुस्तकात त्याचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. बालविधवांना लग्न करण्याची परवानगी नव्हतीच तसेच सतीच्या चालीमुळे त्यांना जिवंतही जाळले जात होते; परंतु वृद्ध पुरुषांना मात्र वाटेल तितके विवाह करण्याची परवानगी होती. आज एकविसाव्या शतकातही लव्ह जिहादसारखे कायदे सरकार करीत आहे. वास्तविक, असे कायदे करणे घटनाबाह्य (Ultra vires) कृत्य आहे; परंतु कुठल्याही कोर्टाने असे कायदे रद्द करण्याचे धाडस दाखवले नाही. तसेच जनतेनेही विरोध केला नाही. हीच मनुस्मृतीची मानसिकता आहे. ती बदलल्याशिवाय कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य टिकणार नाही.

**सत्याचा शोध घेण्यास प्रतिबंध :**

घटनेला समताधिष्ठीत समाज वा देश उभा करायचा आहे; परंतु तसे झाले तर यांची सत्ता आणि राजकारण दोन्ही संपुष्टात येईल. विषतामूलक धर्मावरच त्यांना हिंदू राष्ट्राचा पाया उभारायचा आहे. वेद, उपनिषदे, पुराणे, रामायण, महाभारतादी ग्रंथ, गीता कुठल्याही प्रकारे समतेची, स्वातंत्र्याची, सामाजिक न्यायाची किंवा मानवी प्रतिष्ठेची समान दर्जाची घोषणा करीत नाहीत. या सर्व मूल्यांना त्यांचा विरोधच आहे. त्याचा हेतूच मनुस्मृतीचे समर्थन करण्याचा आहे. मनुस्मृती आणि हे सर्व धर्मग्रंथ वेदांपासूनच प्रेरणा घेतात ज्यांना बुद्धाने नाकारलेले आहे. कारण त्यांच्यात प्रज्ञा, शील आणि करूणा यांचा अभाव आहे. बुद्धाने ईश्वरालाही विरोध केला आहे. कारण ईश्वरप्रणित व्यवस्था सत्याचा शोध घेण्यास प्रतिबंध करते.

बाबासाहेबांनी जाती निर्मूलनाचा प्रश्न केवळ धार्मिक व सांस्कृतिक मानलेला नाही. त्याला सामाजिक, आर्थिक, राजकीय संदर्भ आहेत. सामाजिक न्याय, आरक्षण, धर्मातित जीवनदृष्टी, निधर्मी शासन यांनाही मनुस्मृतीचे समर्थक सातत्याने विरोध करतात. भारतात कधी डावी क्रांती झालेली नाही; परंतु उजवी क्रांती प्रत्येक शतकात झालेली आहे आणि तिने वेळोवेळी सर्व पुरोगामी मूल्यांचा, तत्त्वांचा पराभव केला आहे. याचे साधे कारण हे गेल म्हणतो त्याप्रमाणे, येथील शूद्र अतिशूद्रांची मानसिक गुलामी (Spiritual Serfdom) हेच आहे. हे मनुस्मृतीचेच येथल्या व्यवस्थेला आलेले विषारी फळ आहे. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**


# समतावादी तत्त्वज्ञानाचा जाहिरनामा : विनंतीपत्र



प्रा. सुहास नाईक

**गोपाळबाबांनी रोखठोक भाषा, सडेतोड विचार, वैचारिक बंडखोरी आणि निर्भिड मते स्पष्ट करणारे एक छोटे; परंतु मोठा आशय असणारे पुस्तक अर्थातच 'विनंतीपत्र' सन १८८८ मध्ये प्रकाशित केले. या घटनेला आता १३५ वर्षे पूर्ण झाली आहेत. इतका प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतरही या पुस्तकाचे महत्त्व कमी झालेले नाही. या पुस्तकातील विचार नव्या पिढीसाठी दिशादर्शक आणि अंतर्मुख करणारे आहेत. या पुस्तकाचे संकलन आणि संपादन डॉ. प्रेम हनवते यांनी केले आहे.**

एकोणिसाव्या शतकात शोषणमुक्त समाजरचनेचे स्वप्न पाहाणारे समाजसुधारक म्हणजे गोपाळबाबा वलंगकर. आधुनिक महाराष्ट्राचा प्रारंभबिंदू असणाऱ्या काळातील सामाजिक परिघ गोपाळबाबा वलंगकर यांच्या जीवनकार्यानेच पूर्ण होतो. संघर्षाने भरलेले त्यांचे कार्यकर्तृत्व त्यांच्या लेखनातून अधिक ठळकपणे समोर येते.




गोपाळबाबांनी रोखठोक भाषा, सडेतोड विचार, वैचारिक बंडखोरी आणि निर्भिड मते स्पष्ट करणारे एक छोटे; परंतु मोठा आशय असणारे पुस्तक अर्थातच 'विनंतीपत्र' सन १८८८ मध्ये प्रकाशित केले. या घटनेला आता १३५ वर्षे पूर्ण झाली आहेत. इतका प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतरही या पुस्तकाचे महत्त्व कमी झालेले नाही. या पुस्तकातील विचार नव्या पिढीसाठी दिशादर्शक आणि अंतर्मुख करणारे आहेत. या पुस्तकाचे संकलन आणि संपादन डॉ. प्रेम हनवते यांनी केले आहे.

या अत्यंत महत्त्वाच्या पुस्तकापर्यंत पोहचण्याचा प्रवास डॉ. हनवते यांनी संपादकीय भूमिकेमध्ये मांडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. एलिनार झेलियट, डॉ. अनुपमा राव, रोझलिंड ओ हॅनलन यांनी केलेल्या संशोधनातून हे पुस्तक हनवते यांच्या हाती लागले. मात्र 'विटाळ विध्वंसन' नावाने गोपाळबाबांचे पुस्तक हेच 'विनंती पत्र' असल्याचे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. हे या संशोधनाचे बलस्थान आहे. खरे तर, 'विटाळ विध्वंसन' या नावाने गोपाळबाबांची पुस्तके अनेकांनी प्रसिद्ध केली. पण त्यामधील अस्सल आणि महत्त्वाचा भाग 'विनंतीपत्र'च्या माध्यमातून संकलित आणि प्रकाशित करून डॉ. हनवते यांनी एकोणिसाव्या शतकातील सांस्कृतिक संघर्षाचा नवा पदर उलगडून दाखवला आहे. या पुस्तकाला डॉ. हनवते यांनी लिहिलेली अभ्यासपूर्ण आणि प्रदीर्घ संपादकीय, भूमिका मुळातून वाचण्यासारखी आहे. ही भूमिका महाराष्ट्राची समाजसुधारणेची चळवळ स्पष्ट करणारी आणि प्रस्तुत पुस्तकावर भाष्य करणारी आहे.

मूळ विनंती पत्राचे मुखपृष्ठ आशयघन आणि समर्पक आहे. पुस्तकाची दिशा स्पष्ट करणारे आहे. या मुखपृष्ठावर 'हिंदू धर्माचे मुख्य श्रीमंत जगतगुरु शंकराचार्य श्री.मौ. संस्थानिक व सरदार; या.रा.वे.शा.सं. शास्त्री आणि विद्वान मंडळी ब्रह्मसमाज व प्रार्थनासमाज यांचे प्रमुख ह.भ.प.साधु, संत, महंत व इतर पवित्र मंडळी यांचे सेवेत सादर केलेले' असे छापलेले आहे. अर्थात, पुस्तकात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी म्हणून संबंधितांची नावे मुखपृष्ठावर छापलेली आहेत.

विनंती पत्र लिहिण्याचे कारण, दासगावच्या विठ्ठलदास जोशी यांनी बांधलेल्या माडीचे 'पौरोहित्य' हे ठरले. महात्मा जोतिबा फुले यांनी बहुजनकेंद्रीत सांस्कृतिक संघर्ष करताना 'शेठजी, भटजी आणि लाडजी' शोषणाच्या पद्धती प्रभावीपणे मांडल्या. बहुजन समाजाला जागृत करून धार्मिक कार्यात ब्राह्मण हटवण्याची भूमिका घेतली, फुल्यांचा तोच समतावादी वारसा घेऊन या विनंतीपत्राचे लेखन गोपाळबाबांनी केले. विनंती पत्राच्या लिखाणावर महात्मा फुलेंचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

मूळ पुस्तकाच्या प्रस्तावनेत गोपाळबाबांनी महाभारतातील एका सुक्ताचा दाखला देऊन विनंती केली आहेच; परंतु पुस्तकात वेदस्मृती, गीता, ज्ञानेश्वरी, संत वाङ्मय यातील विधानांचा आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ उपयोग केला आहे. त्यातून त्यांची अभ्यासू, चिकित्सक वृत्ती दिसून येते.

पुस्तकाच्या पुर्वार्धात गोपाळबाबांनी शैक्षणिक शोषण, आर्थिक शोषण, धार्मिक शोषण आणि अनेक प्रकारचे निर्बंध या माध्यमातून दिली जाणारी हिनत्वाची वागणूक या अनुषंगाने सडेतोड भाष्य केले आहे.

विनंतीपत्राचा मध्यभाग हा या पुस्तकाचा गाभा आहे. याच भागात तर्कनिष्ठ, बुद्धीप्रामण्यवादी प्रश्न उपस्थित करून गोपाळबाबांनी धर्मग्रंथ आणि धर्मपंडितांवर प्रश्नांचा अक्षरक्ष: भडीमार केला आहे. या प्रश्नांची संख्या २६ इतकी आहे. पाप, पुण्य, मोक्ष पवित्र-अपवित्र, आहार, विटाळ, भेदाभेद, स्वर्ग-नरक, स्पृश्य-अस्पृश्य याचा यथासांग परामर्श गोपाळबाबांनी घेतला आहे. हे प्रश्न केवळ पुस्तकातील प्रश्न नाहीत, तर एकूणच समाजव्यवस्थेतील शोषणव्यस्था आणि स्वरुप यांची चिकित्सा करणारे प्रश्न आहेत. (उर्वरित पान ३८ वर...)

# म्हशी चारणाऱ्या बहिणीच्या एका पराभवात लपलेत अनेक विजय

तिची ओळख होती सुशिक्षित बेकार, दरिद्री आणि पदवीधर... पदवी घेतल्यानंतर कुटुंबाचा आणि स्वतःचा आर्थिक विकास करण्यासाठी तिला हवी होती एक नोकरी.. नोकरी मिळवणं आणि त्यासाठी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणे काही सोपे नव्हते.. तेलंगणाच्या मरिकल (जि. नागरकुर्नुल) खेड्यात जन्माला आलेली ती स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी जी हैदराबादला गेली.. तिच्याप्रमाणे हजारो विद्यार्थी राजधानीत येतात.. रात्रंदिवस अभ्यास करतात.. कष्ट करतात.. तयारीसाठी पैसेही खर्च करतात.. सर्वांच्याच वाट्याला काही यश येत नाही.. जागा मोजक्या आणि त्या मिळवण्यासाठी हजारोंची गर्दी असते.. ज्याला नोकरी मिळते तो जिंकला आणि बाकीचे हजारो हरले असा हा प्रकार असतो.. अपयश नशिबावर लादून विद्यार्थी पुन्हापुन्हा प्रयत्न करतात.. शेवटी पराभव मान्य करून गावाकडे जातात.. पडेल ते काम स्वीकारतात, वांझोट्या जमिनीचा तुकडा फुलवण्याचा प्रयत्न करतात.. काही जण गावाकडे तोंड कसं दाखवायचं म्हणून शहरातच पडेल ते काम करतात.. ज्यांना हे जमत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.. काही जण कोणत्या तरी गँगमध्ये भाई बनायला जातात, तर काही जण स्वतः नापास असतानाही दुसऱ्याला पास करण्यासाठी शिक्षकाची म्हणजे ट्यूशनमध्ये शिक्षकाची नोकरी पत्करतात.. देशातल्या तरुणांच्या आयुष्याच्या आणि स्वप्नांच्या होणाऱ्या चिंध्या व्यवस्थेला कधीच दिसत नाहीत आणि दिसल्या तरी त्या थांबाव्यात म्हणून ती मार्ग काढत नाही. उलट परीक्षा देण्याचे वय वाढवले जाते आणि त्याच स्पर्धेच्या चक्रात त्यांना अडकवून, भरडून काढले जाते.. अशा विद्यार्थ्यांची काही संघटना नाही, त्यांचा कोणी नेता नाही.. देशात तीस कोटी नोकऱ्या तयार करू, अमूक काळात नोकरभरती करू अशी आश्वासने त्यांच्या कानांवर येत असतात.. बोलाची कडी आणि बोलाचा भात याप्रमाणे सारे चालू असते.. एखादा टग्या पुढारी असेल तर या बेकारांच्या नावानं कोणती तरी योजना सुरू करतो.. उद्रेक थांबवण्याचा प्रयत्न करतो.. त्यात यश आलं की पुन्हा दुसरी घोषणा याप्रमाणे खेळ चालूच राहतो. हा सारा खेळ बघतच ती तरुणी सर्वशक्तीनिशी स्पर्धा जिंकण्यासाठी प्रयत्न करत होती.. ती जिंकल्याशिवाय गावाकडे तिच्या फाटक्या घराची डागडुजी होणार नव्हती.. तिचं घर उजळणार नव्हतं.. कुटुंबाचा उद्धार करण्याची संधी मिळणार नव्हती.. ती राबराब राबत होती.. स्वप्नं बघत होती.. ती ज्या परिक्षेला बसणार होती तिच्या उत्तरपत्रिका अगोदरच फुटल्यानं परीक्ष रद्द झाली.. ती पुन्हा कधी घेतली जाईल याची खात्री नव्हती.. शहरात राहण्यासाठी पैसे नव्हते.. मनिऑर्डर येण्याची शक्यता नव्हती.. शेवटी तिनं गावाकडचा रस्ता धरला..



गावात जाऊन तर करायचं काय? तिथं ना नोकरी, ना रोजगाराची अन्य साधनं होती.. शेवटी तिनं म्हशी राखण्याला सुरुवात केली.. अधिकारी होण्यास निघालेल्या आणि परीक्षा रद्द झाली म्हणून गावाकडे परतलेल्या युवतीची ही कथा.. घरातील म्हशींची राखण करून आणि दुधदुभत्यावर कसे तरी जगणाऱ्या या सुशिक्षित युवतीला गावकऱ्यांनी एक नाव दिलं म्हशीची अक्का, म्हशीची बहिण, म्हशी राखणारी हे ते नावं.. या नावानं तिला जणू काही सुशिक्षित वर्गातून प्राण्यांच्या जगात आणलं.. तिनं आपलं मूळ नाव जणू काही या टोपण नावामुळे गमावलं.. तर तिचं मूळ नाव कर्णे शिरिषा.. ती झाली बरेल अक्का.. म्हशीची बहिण.. बेकरीनं तिच्या आयुष्याला असा एक डंख मारून तिला जखमी केलं होतं, की वाहणाऱ्या जखमेत.. वाहणाऱ्या रक्तातून नवं नाव जन्माला आलं, म्हशीची मोठी बहिण.. हेच नाव धारण करून ती जगू लागली.. अगदी पंचवीस वर्षांची झाली.. लग्न करणाऱ्यांच्या दृष्टीनं निब्बार झाली.. लग्न करणाऱ्या पोरांना कोवळ्या काकडीसारखी पोरगी लागते, हे काही सांगायला नको..

म्हशी फिरवता फिरवता बरेलाक्काच्या डोक्यात एक कल्पना आली. दशादशा, चिंध्याचिंध्या झालेल्या आपल्या आयुष्याचा तिनं स्वतःच एक व्हिडिओ तयार केला आणि टाकून दिला सोशल मीडियावर.. बरं आहे प्रत्येकाच्या हक्काचा एक सोशल मीडिया तर शिल्लक राहिलाय.. गोदी मीडियात यापैकी कुणाला स्थान नाहीय.. तर बरेक्काच्या व्हिडिओला प्रचंड प्रतिसाद मिळाला. तो व्हायरल झाला जगभर.. लाखो, कोट्यवधी लोकांनी त्याला प्रतिसाद दिला. तेलंगणात कितीही पदव्या मिळाल्या तरी शेवटी म्हशीच राखाव्या लागतात, असा संदेशही स्वतःच्या फोटोसह तिनं दिला होता. सरकारविरोधी खूप प्रतिक्रिया येऊ लागल्या म्हणून सरकारने तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. कोर्टात खटला लढवण्यासाठी

तिला म्हशी विकाव्या लागल्या. तरी खूप नाराज झाली. तिला काही सुचेना. डिप्रेशनमधून बाहेर कसं पडावं याचा विचार ती करू लागली. काही झालं तरी लढायचं.. आत्महत्या करायची नाही, हे तिच्च पक्कं होतं. डिप्रेशनमधून बाहेर पडण्यासाठी आणि व्यवस्थेचं खरं रूप समाजासमोर मांडण्यासाठी तिनं विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. तोही सोशल मीडियात जाहीर केला. पुन्हा या मीडियावर तिला प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. तिला उभारी आली. तिचा निवडणूक जाहीरनामाही महत्त्वाचा होता. वेळेवर नोकर भरती, रस्ते, गरिबांना घरे, बेरोजगारांना नोकऱ्या आदींचा त्यात उल्लेख होता. युवा पिढीला तो खूपच भावला. अनेक जण तिच्याशी जोडले जाऊ लागले. बरेलाक्काचे यूट्यूब, इन्स्टाग्राम आणि फेसबूक चाहत्यांनी भरून गेले. यूट्यूबवर दीड लाख चाहते तिला लाभले. अनेक मोठमोठ्या माणसांनी तिला पाठिंबा दिला. निवडणूक आयोगासमोर तिनं ठेवलेल्या शपथपत्राची तर जगभर चर्चा सुरू झाली. शपथपत्रात आपली संपत्ती जाहीर करायची असते. आपल्याकडे गावातली निवडणूक लढवणाऱ्याची संपत्ती लाखोंत तर आमदारपद लढवणाऱ्यांची संपत्ती कोटी-कोटी उड्डाणे मारणारी असते. हिच्या शपथपत्रात काय होतं? बँक खात्यात दीड हजार रुपये तर हातखर्चासाठी पाच हजार रुपये.. म्हणजे साडेसहा हजार रुपयांच्या जोरावर ती निवडणुकीत उभी राहिली.. तिचे मुख्य भांडवल होते ती व्यवस्थेविरुद्ध लढणारी, कडवी झुंज देणारी आणि सुशिक्षित बेकारांचा आवाज फोडणारी युवती म्हणून.. आवाज उठवण्याची किंमत ती चुकवत होती.. तिच्याविरुद्धचा खटला चालू आहे.. आपली अब्रू हिने घालवली म्हणून हा खटला आहे.. सरकार कधीपासून अब्रूदार आणि संवेदनशील आहे, या प्रश्नाचे उत्तर सरकारनं कोर्टात दिलेलं नाही. ते काय असेल कुणाला माहीत नाही.. आपला पक्ष भारतभर नेण्याचा आणि तेलंगणाला आपली जहागीर समजणाऱ्या केसीआर यांच्या राज्यातील ही कथा.. ते निवडणुकीत हरले हे बरेच झाले. कारण बरेलक्का विरुद्धचा खटला कोणी गांभीर्याने घेणार नाही.

निवडणूक रिंगणात उतरलेल्या बरेलक्काने अतिशय कष्ट घेऊन प्रचार चालवला. पण त्यालाही मर्यादा होत्या. विरोधातले उमेदवार विमानाने प्रवास करून प्रचार करणार, ही फार फार तर सायकलीवरून. तिच्या विरोधात महाकाय, महाबलवान, महासंपत्तीवान उमेदवार होते. कोटी-कोटी मालमत्तेचे मालक होते. एक वेगळी आणि लढाऊ उमेदवार म्हणून बरेलक्काला प्रचंड प्रसिद्धी मिळाली. अनेक कार्यकर्ते तिच्या प्रचारासाठी आले. खूप प्रचार त्यांनी केला. शेवटी आपली निवडणूक व्यवस्था म्हणजे राजकारण्यांनी तयार केलेलं रिंगण गरिबांच्या बाजूने उभे राहत नाही, ठोस भूमिका घेणाऱ्यांच्या बाजूने उभे राहत नाही आणि बरेलक्का पराभूत झाली. ती ५,६५८ मते मिळवून आठव्या नंबरवर राहिली. काँग्रेसचा उमेदवार ९२,५४० मते मिळवून विजयी झाला. कायद्याने ती पराभूत झाली; पण लौकीकार्थाने ती हजार वेळा विजयी झाली. लोकशाहीचा मार्ग अवलंबून केवळ पाच हजार रुपयांच्या भरोशावर तिने निवडणूक लढवण्याचा प्रयत्न केला. निवडणुकीच्या बाहेरील चर्चेत ती नायिका झाली. विजय काय आणि पराभूत काय, बरेलक्का मात्र भारतीय निवडणुकीच्या राजकारणात नेहमीच तळपत राहील आणि लाखो बेकारांना लढवण्याची उमेद देत राहील यात शंकाच नाही. व्यवस्था हरली आहे आणि बरेलक्का जिंकली आहे, असेच म्हणावे लागेल. बरे झाले. व्यवस्थेनं तिला हरवलं त्यामुळे राजकारणाचे हिडीस आणि पैशावर उभे असलेले स्वरूप तरी लक्षात आले. सारे राजकारण घराणे, जात-पात आणि बाहुबलींच्या मिठीत कसे घुसमटत आहे, हेही लक्षात आले. त्यावर उतारा एकच आणि तो म्हणजे युवकांनी निवडणूक रिंगणात जय-पराजयाचा विचार न करता घुसावं...

# पळून पळून थकतोय महाराष्ट्र बुवा-बाबांत रमतोय महाराष्ट्र

म. फुले, शाहू आणि आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आज नेमक्या कोणत्या ठिकाणी पोहोचलाय, असा प्रश्न कौन बनेगा करोडपतीसारख्या कार्यक्रमात कुणाला विचारला गेला तर तो बुवा-बाबांच्या दरबारात असे उत्तर देईल आणि बक्षिस मिळवून बसेल.. बुवा-बाबाविरुद्ध महाराष्ट्रात संत तुकाराम, फुले, शाहू, आंबेडकर ते गाडगे महाराज यांच्या विचारांच्या जेवढ्या लढाया झाल्या तेवढ्या महाराष्ट्राबाहेर अन्यत्र कुठं झाल्या नसाव्यात. बाहेर विशेषतः उत्तरेत बुवा-बाबांचं प्रचंड पिक येतं आणि ते देशभर पसरायला लागतं.. महाराष्ट्र मात्र अशा बाबांना रोखत असे.. महाराष्ट्रानं सत्य साई बाबापासून बागेश्वर महाराजांपर्यंत अनेकांना आव्हान दिलं. मात्र हेच लोक आता राजकारण्यांच्या मदतीने महाराष्ट्रात हात पाय पसरू लागले आहेत. तुरुंगात असलेल्या आसाराम बापूने तर महाराष्ट्रातील सगळ्या मोठ्या शहरांत आपले मठ काढले होते. राजकीय लोक पुरोगामी विचार सांगणाऱ्या महापुरुषांची रोज नावे घेतात. त्यांची स्मारकेही उभारतात आणि आजुबाजूला ते किंवा त्यांचे पक्ष, कार्यकर्ते बाबांचे फडही लावतात. ज्या महाराष्ट्रात सर्वप्रथम बुवाबाजीविरुद्ध, जादू-टोण्याविरुद्ध कायदा केला तेथेच आता चमत्कार दाखवण्यासाठी बुवा-बाबा येऊ लागले आहेत.

बुवा-बाबांचं एक बरं असतं. ते कसला तरी चमत्कार करतात, गोड वाणी वापरून कशाचं तरी निरुपण करतात, कुणी आपल्यात दैवी शक्ती असल्याचा दावा करतं आणि प्रचंड गर्दी जमा करतात. महाराष्ट्रात जगण्या-मरण्याच्या प्रश्नावरून, महागाई-बेकारीवरून, टंचाईवरून, वाढत्या भ्रष्टाचारावरून कधी लोक गर्दी करून मोर्चे काढत नाहीत, तर ते आता अध्यात्माच्या कारणावरून गर्दी करतात. परिवर्तनाच्या लढाया ते अध्यात्म सांगणारे व्यापाऱ्यासारखे बाबा असा प्रवास महाराष्ट्र कसा काय करतोय आणि त्याचा वाटाड्या कोण, हे कळायला मार्ग नाही. पण तरीही राजकारणातले लोक त्यात ठळक दिसतात. यापैकी कोणी कर्मवीर, कोणी धर्मवीर, कोणी कसले तरी महत्त्व अशा पदव्या धारण केल्या आहेत. हे सारे अध्यात्मात राजकारण पाहतात आणि राजकारणाचेही अध्यात्म करतात. राजकारणाचं एक बरं असतं, ते कशातही सहज मिसळतं आणि तसा रंग धारण करून उभं राहतं. काही जण राजकारणाला बोका म्हणतात. तो कसाही पडला तरी चार पायांवरच उभा राहतो. आपले अनेक नेते आपल्या पुरोगामी परंपरेवर जशी जोरदार भाषणे करतात तशीच ते बुवा-बाबांच्या कार्यक्रमातही बोलतात. राजकारणात ते विकास,

लोकशाही वगैरे शब्द वापरतात आणि तिकडे गेल्यावर सनातन, हिंदूत्व वगैरे शब्द बेमालूम वापरतात. बुवाच्या पायावर नेत्यांनी डोके टिकवण्याचीही परंपरा आपल्याकडे आहे. कोणत्याही पक्षाचे नेते त्याला अपवाद नाहीत. पलिकडे काही तरी आहे, गर्दी आहे, दैवी आहे आणि ते आपल्या राजकारणात आणलं पाहिजे. नव्हे तर त्याचे राजकारणच करून सत्तेत पोहोचलं पाहिजे, असं त्यांना सातत्यानं वाटत असतं. विधानसभेत छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू आणि आंबेडकर यांचे खरे वारसदार आपणच आहोत, असे सांगणारे त्याच ठिकाणी आंबा प्रकरणातील संभाजी भिडे यांचे शिष्य आहोत, असे निर्भिडपणे सांगतात. असेच काही नेते भूतबाधा नाहीशी करणाऱ्या, मनकवडे असणाऱ्या बागेश्वर बाबाच्या दर्शनासाठीही जातात आणि तेथे हद्दपार झालेल्या 'सनातन' धर्मावर भाषण देतात. तसे का तर त्यांचे नेतेही याच विषयावर भाषण देतात.

काही नेत्यांनी मालेगावमध्ये शिवाची पुराणकथा ठेऊन लाखो लोकांची गर्दी जमवली. अर्थात, यासाठी कोट्यवधी रुपयांचा चुराडा करावा लागतो. भक्तीरस लाव्हारसासारखा पसरवून देणग्या गोळा कराव्या लागतात. ज्यांच्याकडे सत्तेची शक्ती असते त्यांना लवकर देणग्या लाभतात. रोज लाखो भक्तांसमोर ते बुवांच्या शेजारी थांबतात. समोरच्या भक्तांत असलेल्या मतदारांचे स्वतः दर्शन घेतात आणि स्वतःचे दर्शन घडवतात. बुवाही एखादा सांकेतिक किंवा स्पष्ट शब्द वापरून राजकारणात विजयी भव! असा आशीर्वाद देतो. दोघांच्याही हिताची गोष्ट एकदम घडते. मग नेत्या-नेत्यांमध्ये मोठा बुवा आपापल्या मतदारसंघात आणण्याची चुरस लागते. जशी ती बागेश्वर बाबाच्याबाबत लागली होती तशीच ती पुराणकथा सांगणाऱ्यांच्या बाबतीत लागली. खरे तर पुराण म्हणजे काही विचार किंवा अध्यात्मातले तत्त्वज्ञान नाही. आपल्याकडे पुराणातली वांगी, पुराणातल्या भाकडकथा वगैरे शब्द त्यातूनच तयार झाले आहेत. पण विचार सांगितल्याने लोक शहाणे होतात आणि कथा सांगितल्याने कोमात जातात. त्यांना अशा कथा ऐकता ऐकता विवंचनामुक्त



झाल्यासारखे वाटते. एकेका दिवशी लाखो लोकांना मोफत जेवण, कोट्यवधीचे मंडप, एवढी मोठी यंत्रणा, डोंगराएवढी बिदागी यासाठीचा प्रचंड पैसा कोठून येतो आणि कसा पळतो याविषयी कुणाला काहीच कल्पना नसते. देवाधर्माचे काम चाललेय असं म्हणत ईडी-बिडी अशा व्यवस्थेत मुरणारा पैसा शोधण्याचा प्रयत्न कधी करत नसते. तसे झाल्यास धर्मद्रोह होतो. आता धर्माचा आणि पुराणांचा संबंध काय. ती सतरा असली काय आणि सत्तर असली काय आपणच त्यांना भाकडकथा म्हणतो. अशा कथा लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रचंड मोठी उलाढाल होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी चोऱ्या होतात. पण बुवाबाबाला चोर कधी दिसत नाहीत. त्याच्या दृष्टीने चोर काय आणि साव काय सगळे सारखेच. काही पुढारी शिवाच्या कार्यक्रमात आपल्या मुलाची वेशभुषा शिवासारखी करतात, काही बाबा देशातला मोठा पुढारी आपला शिष्य आहे असं ठोकून देतात. कोणी कधी चौकशी करत नाही. डोक्यावर फरशी मारून रोग बरा करणारा आणि तुरुंगात जाऊन आलेला बाबा असो किंवा नसलेले भूत पळवणारा बाबा असो, या सर्वांची महाराष्ट्रात चलती चालू आहे आणि त्यांच्या पाळण्यांना पुढारी खांदे देत आहेत.

●●● **- तात्या विंचू**

# समतावादी तत्त्वज्ञानाचा जाहिरनामा : विनंतीपत्र

**(पान ३५ वरून)** म्हणूनच या पुस्तकातील हे प्रश्न समतावादी तत्त्वज्ञानाचा जाहिरनामा ठरावेत इतके महत्त्वाचे आणि मूलभूत आहेत.

पुस्तकाच्या अंत्यभागात धर्माच्या नियमाने अस्पृश्यांची अवस्था कशी दयनीय झाली आहे? धर्माच्या प्रभावाने अस्पृश्यांची दैनंदिन जीवनातील होणारी परवड आणि दुर्दशा यांचे हृदयद्रावक वर्णन गोपाळबाबांनी रेखाटलेले आहे. हे पुस्तक वाचताना महात्मा फुलेंच्या 'गुलामगिरी'ची आठवण होते. जातवर्ग स्त्रीदास्यांतसाठी महात्मा फुले यांनी वेचलेले आयुष्य आणि केलेले वैचारिक मार्गदर्शन क्रांतीकारी स्वरुपाचे आहे. फुल्यांच्या वैचारिक मंथनाचा वसा आणि वारसा घेऊन गोपाळबाबा वलंगकर यांनी लिहिलेले हे पुस्तक स्फोटक आहे. या पुस्तकात गुलामीच्या शृंखला तोडण्याचे सामर्थ्यशाली प्रयत्न शब्दाशब्दातून व्यक्त झाले आहेत.

या पुस्तकातील काही संदर्भ १३५ वर्षांनंतर जरूर बदलले आहेत. जातिव्यवस्था आणि शोषणाच्या स्वरुपात बदल झाले आहेत. अशा बदलत्या काळात हे पुस्तक समतावादी समाजनिर्मितीसाठी मार्गदर्शन करणारे आहे. शोषणमुक्त समाजासाठी लढणाऱ्यांमध्ये धैर्य निर्माण करणारे आहे. हे पुस्तक वाचकांना अंतर्मुख करुन हक्क आणि अधिकारांची जाणीव करून देणारे आहे. राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक अभ्यासक यांनी जरूर वाचावे, असे हे महत्त्वाचे पुस्तक आहे.

●●●

**पुस्तकाचे नाव :**

**गोपाळबाबा वलंगकर यांचे रोखठोक विनंतीपत्र**

**प्रकाशक : यशोदिप पब्लिकेशन,पुणे**

**पृष्ठ : ८८ । मूल्य : १८० रुपये**



# माणूस माणसात कधी येणार

अर्थ हरवलेले शब्द जसे निष्प्राण कलेवर
भावनांचे तरंग की मृगजळाच्या लाटा
दूरस्थ पांगल्या वाटा
पावलांचे उनाड भटकणे
दिशाहिन स्वप्नांची फरपट

अस्थाव्यस्थ व्यवस्थेच्या पायदळीत
स्वप्नांचा तांडा
स्वातंत्र्यालाच फाडून त्याच्या कराव्यात
चड्ड्या व झाकावी लाज
अशी लोकशाही
लोकशाहीलाच्या तोंडाला रंग फासून
धंद्यास बसवणारे दलाल
नोटा घेऊन मतांचा बाजार करणारी जनता
धर्म, जातीत गुंतलेला समाजपुरुष
माणूस माणसात कधी येणार
स्वातंत्र्याचा सूर्य उजेड कधी देणार

**– भीमराव धुळूबुळू, मिरज**

# जग घडवाया हवं...

हवं तसं नाही जग, तसं घडवाया हवं/
विवेकानं विकृतीला, छान बडवाया हवं//

घडा घडवी कुंभार, आत हात वर थापी/
प्रज्ञा, करूणा, मैत्रीनं, दुःख उडवाया हवं//

द्वेष, विद्वेष, मत्सर, विष पेरणारी नीति/
तिला देत मूठमाती, प्रेम जडवाया हवं//

दुःख, अज्ञान, शोषण, काढून ही जळमंट/
स्वच्छ, शुद्ध, अत्तःदीप, असं मढवाया हवं//

धर्म, वर्ण, जातीभेद, नष्ट करून समूळ/
फक्त मानवता मैत्र, जगी वाढवाया हवं//

**– आदिनाथ इंगोले, नांदेड**

# रिल्स बनवणाऱ्या बाया

मोबाईल क्रांतीच्या मुख्य लाभार्थी आहेत
रिल्स बनवणाऱ्या बाया
अभिव्यक्तीच्या मर्यादा
पायदळी तुडवत त्या
उधळतात स्वत:ला
या बिनचेहऱ्याच्या
महाआंतरजालात
प्रथा परंपरा डिलीट करत
त्या ओलांडतात जातधर्मसत्तेचा उंबरा

त्या धार्मिक असतात तशा धर्मविरोधीही
त्या आधुनिक असतात तशा
परंपरावादीही
धर्माचे नीतिनियम तुडवत जातात त्या
मोबाईलच्या कॅमेऱ्यातून आरपार
नीति अनीतिच्या झगड्यात
त्या असतात कायम मध्यरेषेवर
डिजिटल क्रांतीच्या गोंधळलेल्या जगाचं प्रतिक
असतात
रिल्स बनवणाऱ्या बाया

रिल्स बनवणाऱ्या बाया
असतात
सर्व धर्मीय
सर्व जातीय
सर्व वर्गीय सुद्धा
डिजिटल युगाच्या कॅनव्हासवर व्हायरल होण्यास
त्या असतात आतूर

रिल्स बनवणाऱ्या बाया
निर्माण करतात मुक्तीचा आभास
अर्ध/पूर्ण/नाममात्र पेहरावाला त्या म्हणतात
स्वातंत्र्य

डिजिटलाईझ आभासी जगात
ओरिजनॅलीटी कायम ठेवून आहेत बाया
अभिव्यक्तीच्या मर्यादित स्वातंत्र्यात खूष आहेत
बाया
धर्मावडंबराचा उच्छाद मांडण्यात
पुढे आहेत बाया

रिल्स बनवणाऱ्या बाया
रडतात/हसतात/नाचतात
गातात/खिदळतात
तर कधी पाजतात तत्त्वज्ञानाचे डोस
शरीरावयवाचे उत्तान प्रदर्शन करून
कधी भरतात वातावरणात उष्णता
रिल्स बनवणाऱ्या बाया
असतात बेबाक बिनधास्त

रिल्स बनवणाऱ्या बाया
ओरीजनल कंटेंट करतात प्रदर्शित
तोपर्यंतच त्या असतात युझर्सच्या डोळ्यातील
ताईत
जेव्हा त्या होतात सामाजिक/राजकीय
तेव्हा मात्र
त्यांना रिमूव्ह केले जाते
लोकांच्या नजरेसमोरून
कारण
ओरिजनल म्हणजे समाजमान्य
ओरिजनल म्हणजे धर्ममान्य
असाच समज करून घेतलाय
मार्क झुकरबर्गच्या पगारी नोकरांनी
रिल्स बनवणाऱ्या बायांच्या व्हिडिओवर फिरत
असतात त्यांचे अदृश्य हात
विश्वगुरूंचे भक्त ठेवतात
बायांवर करडी नजर
तरी बाया करतात मुजोरी
बाया मानत नाहीत सेन्सॉरशिपला

रिल्स बनवणाऱ्या बाया
मानसिक स्वातंत्र्याचे युद्ध लढण्यासाठी सज्ज होत
आहेत...

**– प्रशांत वंजारे**
**आर्णी, जिल्हा. यवतमाळ**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best
Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

